


Visit us on [www.chitravedh.in](http://www.chitravedh.in)

# संपादकीय

आयुष्यात अनेकदा अशा गोष्टी घडतात, ज्या आपल्यासोबत घडतील असं चुकूनही आपल्याला वाटत नसतं. मला कधीही चित्रपट समीक्षक व्हायचं नव्हतं, पण मी समीक्षक झालो. कधीकाळी तू दिवाळी अंकाचा 'गेस्ट एडिटर' होशील असं कुणी सांगितलं असतं तर मी त्याच्यावर विश्वास ठेवला नसता, पण 'चित्रवेध'च्या या वर्षीच्या दिवाळी अंकाच्या निमित्तानं आणि हा अंक अनेक वर्ष यशस्वीपणे चालवणाऱ्या सुचेता फुले हिच्या आग्रहामुळे हीपण गोष्ट घडली. खरं तर वैयक्तिक आयुष्यातल्या काही अडचणींमुळे आणि व्यावसायिक कमिटमेंट्समुळे मी ही जबाबदारी घ्यायला फार उत्सुक नव्हतो, पण सुचेताच्या आग्रहापुढे माझा नकार टिकला नाही.

मी गेली अनेक वर्षं अनेक वर्तमानपत्रांमध्ये, वेब पोर्टलवर आणि दिवाळी अंकांमध्ये लिखाण करत आहे. हे लिखाण करताना अनेक संपादकांशी संपर्क झाला. काहींशी जवळचे संबंध निर्माणपण झाले, पण संपादक म्हणून काम करणं किती अवघड आह, याची जाणीव या दिवाळी अंकाच्या निमित्तानं पहिल्यांदाच झाली. अंकाची रूपरेषा तयार करणं, कुठल्या विषयावर कोण लेख लिहू शकेल हे ठरवणं, लेखकांमागे तगादा लावणं, डेडलाईनचा पाठलाग करणं (आणि तो कितीही केला, तरी उशीर होतोच! ), मुद्रितशोधन करून घेणं, दिवाळीअंकाच्या मुखपृष्ठाची तयारी करणं अशी असंख्य व्यवधानं असतात.

दिवाळी अंकात फक्त लेखक म्हणून काम करताना आपण तुलनेनं किती रिलॅक्स असायचो हे आता नदीपात्राच्या दुसऱ्या बाजूला आल्यावर जाणवतं. 'चित्रवेध'च्या या अंकानंतर संपादक या जमातीबद्दल अगोदरच जो एक आदर होता, तो अजून कित्येक पटींनी वाढला आहे.

दिवाळी अंकामध्ये लिहिणारे लेखक जितके उत्तम तितका दिवाळी अंकांचा दर्जा उत्तम हे एक उघड गुपित आहे. सुदैवानं या दिवाळी अंकासाठी आम्हाला अनेक उत्तम लेखक मिळाले.

मृणाल काशीकर यांनी आमच्या दिवाळी अंकासाठी 'पुस्तकांचं वेब सिरीजमध्ये झालेलं माध्यमांतर' या  विषयावर अतिशय अभ्यासू लेख लिहून दिला. पुस्तकांचं वेबसिरीजमध्ये रूपांतरण होताना नेमके काय बदल होतात, ती प्रक्रिया कशी असते, शब्दांचं दृश्यांमध्ये रूपांतर करताना लेखक-दिग्दर्शक यांना कुठल्या आव्हानांना सामोरं जावं लागतं, याचा नेमका आढावा मुद्देसूदपणे आणि योग्य उदाहरणांसकट मृणाल यांनी घेतला आहे.

'लेथ जोशी' या अतिशय सुंदर चित्रपटात मुख्य भूमिका केलेल्या चित्तरंजन गिरी यांनी त्यांच्या लेखात त्यांच्या अभिनयाच्या प्रवासाचा अतिशय मनोज्ञ लेखाजोखा घेतला आहे. क्षितिज पटवर्धन हा सध्याचा आघाडीचा लोकप्रिय पटकथालेखक आहे. त्यानं ‘लेखकाच्या आयुष्यातला एक दिवस’ कसा असतो हे त्याच्या लेखात फार सुंदरपणे मांडलं आहे. लेखकाची असुरक्षितता, त्याची तगमग, त्याच्या आयुष्यातली तगमग क्षितिजनं प्रवाही शैलीत लिहिली आहे. क्षितिजनं त्याच्या व्यग्र वेळापत्रातून वेळ काढून ललित लिखाण करायला पाहिजे, हीच प्रत्येक वाचकाची भावना हा लेख वाचल्यावर होईल.

संपादकानं स्वतःच्या अंकात संपादकीय लिहावं आणि लिखाणाचा मोह टाळावा हा संकेत बाजूला ठेवून मीपण ‘नव्वदच्या दशकातलं इंडिपॉप’ या विषयावर लेख लिहिला आहे. प्रसाद कुमठेकर या सध्याच्या लोकप्रिय लेखकानं 'ऑन एयर प्रमोशन' या टेलिव्हिजनच्या वेगळ्या क्षेत्रावर त्याच्या खास मिश्किल शैलीत प्रकाश टाकला आहे. टीव्ही बघताना तुमच्यासमोर जे येतं, ते निर्माण करणारी किचकट यंत्रणा प्रसादच्या लेखणीतून आपल्याला समजते.

मुलाखत घेणं हा प्रकार टेनिसच्या डबल्सच्या सामन्यासारखा असतो. जितका तुमचा पार्टनर चांगला तितका तुमचा खेळ उत्तम होणार आणि तितका सामना रंगणार. राज जाधव या स्वतः उत्तम लेखक असलेल्या मित्रानं चिन्मय मांडलेकरची घेतलेली मुलाखत म्हणजे याचं मूर्तिमंत उदाहरण. चिन्मय सध्या त्याच्या शिवाजी महाराजांवरील चित्रपटांमुळे आणि 'काश्मीर फाईल्स' या चित्रपटातील भूमिकेमुळे प्रकाशझोतात आहे. राजनं एका उत्तम मुलाखतकाराप्रमाणे चिन्मयच्या अभिनेता म्हणून झालेल्या प्रवासावर आणि त्याच्या विचारप्रकियेला ऐरणीवर आणलेलं आहे. चिन्मयनंपण राजच्या प्रश्नांची उत्तरं  तशीच झोकात दिली आहेत. राज जाधवनं

या अंकासाठी एखादा स्वतंत्र लेख लिहावा अशी इच्छा होती, पण त्याच्या कार्यबाहुल्यामुळे ते शक्य झालं नाही.

राजनं कव्हर गर्ल मृण्मयीलाही बोलतं केलंय तिच्या प्रवासाबद्दल. मृणमयीचा टीव्ही ते सिनेमा ते वेबसीरीज ते दिग्दर्शन हा प्रवास अगदीच पठडीबाहेरचा आहे.

कौशल इनामदारचा 'अनप्लग्ड व्हिडिओ सेगमेंट' हा या दिवाळी अंकाचा उत्कर्षबिंदू असावा. कौशलचा पारंपरिक माध्यम सोडून व्ही लॉग्ज, यूट्यूब चॅनल, फेसबुक-ट्विटरवरून त्याच्या श्रोत्यांशी-चाहत्यांशी एक डायरेक्ट कनेक्ट आहे. कौशल कॅमेऱ्यासमोर खुलतो आणि कॅमेऱ्याच्या माध्यमातून प्रेक्षकांशी कसा संवाद साधायचा याची एक दुर्मिळ जाणीव त्याला आहे. वेगवेगळ्या मुद्द्यांवर कौशलनं या सेगमेंटमधून संवाद साधला आहे. तो जितका माहितीपूर्ण तितकाच रोचक आहे.

दिवाळी अंकात एक कविता विभागपण आहे, पण पद्य या प्रकाराशी छत्तीसचा आकडा असल्यामुळे मी त्यात सहभागी नव्हतो हे कबूल करावं लागेल. शर्वरी कुलकर्णी या अभिनेत्रीने सादर केलेली ‘अनय‘ ही अरुणा ढेरे यांची कविता एक नवा दृष्टिकोण देते.

दिवाळी अंक तयार होताना पडद्याआड एक मोठी टीम कार्यरत असते. कव्हरशूट करणारे, व्हिडीओ शूट करणारे, व्हिडिओ एडिट करणारे, ग्राफिक्स करणारे आणि असे कित्येक हे दिवाळी अंकाचे अनाम नायक. सुमीत गुरव आणि त्याच्या टीमचे पण आभार मानावे लागतील. आमचे मुद्रितशोधक अनिल आठलेकर यांनी आमचे लेख घासून पुसून आकारात आणले आणि वाचनीय बनवले. त्यांचेपण आभार. चित्रवेधचे कव्हर हे कायमंच दिवाळी अंकांच्या भाऊगर्दीत उठून दिसतं आणि ह्या वर्षीही ते तसंच जमून आलंय.

मी संपादक म्हणून माझ्यावरच्या जबाबदाऱ्यांना काही कारणांमुळे भरपूर वेळ देऊ शकलो नाही तरी प्रयत्न नक्कीच केलाय, मात्र सुचेताने अथक परिश्रम घेऊन दिवाळी अंक पूर्णत्वाला नेला. हा अंक बनण्यात अर्थातच सगळ्यात मोठा वाटा तिचा आहे.

गेल्या नऊ-दहा महिन्यांपासून हा अंक आमचा होता, पण तो आता तुमचा आहे. वाचकच या अंकाचं तटस्थ मूल्यमापन करणार आहे. आशा आहे, आमचा हा प्रयोग तुम्हाला आवडेल. आता सगळं तुमच्या हाती.



- अमोल उदगीरकर

# अनुक्रमणिका


- **पुस्तक: वाचायचं का बघायचं ?** - *मृणाल काशीकर- खडक्कर* ६
- **कौशल इनामदार: संगीतकार की चिंतक** - *अमोल उदगीरकर* २८
- **करा रे हाकारा ! पिटा रे डांगोरा** - *प्रसाद कुमठेकर* ३०
- **आठवणी, नॉस्टॅल्जिया आणि पूर्ण न झालेल्या शक्यतांचा हुरहुरता कोलाज** - *अमोल उदगीरकर* ३८
- **भूमिकेने आपल्याला निवडायला हवे : चिन्मय मांडलेकर** - *राज जाधव* ५४
- **लेखकाच्या डायरीतला एक दिवस** - *क्षितिज पटवर्धन* ६६
- **जग कवितांचे.** - *तुषार दामगुडे* ७४
- **कुंकू ते मुंबई डायरीज्: मृण्मयीची वाटचाल** - *राज जाधव* ७६
- **बनारस ते मुंबई व्हाया दिल्ली - जीवनाचा अर्थ_शोधणारा प्रवास** - *चितरंजन गिरी* ८२
- **Meet our team** ९४


**व्हिडिओ सदरे:**

या दिवाळी अंकात कौशल इनामदारच्या अनप्लग्ड गप्पा दोन भागात आहेत. त्या पानावर असलेले QR codes स्कॅन करून ते व्हिडिओज बघता येतील.

या दिवाळी अंकात दोन कविता आहेत ज्या शर्वरी कुलकर्णीने सादर केल्या आहेत. त्या पानावर असलेले QR codes स्कॅन करून ते व्हिडिओज बघता येतील.

# पुस्तक: वाचायचं का बघायचं ?

- मृणाल काशीकर- खडक्कर




## पुस्तकं आणि वेब सिरीज

***ओटीटी आणि वेबसिरीज:***

मनोरंजनाच्या क्षेत्रात सातत्यानं बदल होत असतात, नवनवीन प्रयोग होत असतातच, पण प्लॅटफॉर्मचं आगमन झालं आणि मनोरंजनाच्या क्षेत्रात वेबसिरीज या एका नवीन प्रयोगाचा शुभारंभ झाला. आजवर आपल्याला नाटक, सिनेमा, टेलिफिल्म, मालिका, इ. माध्यमातून उत्तम कथानकं बघण्याची सवय होतीच, पण वर वेबसिरीज नामक एक प्रचंड गुंतवून ठेवणारं मनोरंजन माध्यम आलं आणि प्रेक्षक त्याकडे मोठ्या प्रमाणावर आकर्षित झाले. हे माध्यम सिनेमा, नाटक किंवा मालिकांपेक्षा खूपच वेगळं आहे. यात ‘सातत्यानं प्रेक्षकाला खिळवून ठेवणं’ आणि ‘त्यासाठी त्याची उत्सुकता शिगेला पोहोचलेली असणं’ या गोष्टीना प्राधान्य आहे. टीव्हीवरील रटाळ मालिकांना कंटाळलेले प्रेक्षक या मोबाईलवर आपली प्रायव्हसी जपत बघता येणाऱ्या माध्यमाकडे आकर्षित नसते झाले तरच नवल. थोडक्यात संपणारं कथानक, सोयीनं एकत्रितपणे किंवा सवडीनुसार बघता येणारे एपिसोड हेदेखील या माध्यमाचे प्लस पॉइंट ठरले.

अतिशय खिळवून ठेवणारं कथानक आणि त्याची त्याहून अधिक गुंतवून ठेवणारी मांडणी, ही दोन बलस्थानं असल्यावर प्रेक्षकाला मोबाईल किंवा टीव्ही बंद करणं अगदी अशक्य वाटू लागलं आणि हेच वेबसिरीज या माध्यमाचं वैशिष्ट्य आहे. वेबसिरीजचा अजून एक मोठा फायदा असा आहे की या माध्यमातून प्रदर्शित होणाऱ्या कंटेंटला अद्याप सेन्सॉर केलं जात नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर हिंसा, अश्लीलता, शिवराळ भाषा असलेला कंटेंट इथे प्रदर्शित होतो. बहुतांश प्रेक्षक मोबाईलवर खाजगीरित्या ओटीटी माध्यम पाहात असल्याने यावर काहीही निर्बंध नाहीत आणि ते निर्धास्तपणे असा ॲडल्ट कॅटेगरीतील कंटेंट खाजगीत पाहू शकतात. वेबसिरीजच्या विषयांमध्येही तुम्हाला त्याचा परिणाम दिसून येतो. मारधाड, हिंसा, शिवराळ भाषा, अनैतिक गोष्टी, बिनधास्त सेक्स या गोष्टी वेबसिरीजमध्ये सर्रास दिसतात; किंबहुना त्यांचा भरपूर वापर कथानक अधिक आकर्षक बनवण्यासाठी केलेला दिसून येतो असंही आपण म्हणू शकतो.

नवनवीन कथानकं या नवीन फॉरमॅटमध्ये समोर आणताना हळूहळू चॅनेल्सची संख्याही वाढत गेली. तरीही खऱ्या अर्थाने वेबसिरीज फॉर्म लोकप्रिय झाला तो हिंदीतून वरील ‘सेक्रेड गेम्स’ या वेबसिरीजमुळे, असं म्हणता येईल. खरं तर अमेझॉन प्राईमने नावाची वेबसिरीज सर्वात आधी आणली होती, पण तिचं प्रदर्शन वेळेत होऊ शकलं नाही किंवा प्रेक्षकांपर्यंत ती आधी पोहोचू शकली नाही. त्यामुळे ‘सेक्रेड गेम्स’ हीच भारतातील पहिली वेबसिरीज ठरली. २०१८ मध्ये या वेबसिरीजचा पहिला सिझन आला आणि त्यावेळी ही नवीन आणि वेबसिरीज हा प्रकारही नवीन होता. तगडी स्टार कास्ट आणि कथानकातील औत्सुक्य प्रोमोज मधून वाटू लागलं आणि प्रेक्षकांनी सेक्रेड

गेम्सचा सिझन वन डोक्यावर घेतला. माझ्या मते हिंदी प्रेक्षकांसाठी आणि वेबसिरीज हे माध्यम लोकप्रिय होण्यात 'सेक्रेड गेम्स' चा मोठा वाटा आहे. ही Netflix ची ओरिजिनल सिरीज होती. म्हणजे फक्त Netflix वर रिलीज झालेलं कथानक, अशा अर्थानं. ही वेबसिरीज विक्रम चंद्रा यांच्या मूळ इंग्रजी 'सेक्रेड गेम्स' या कादंबरीवरच आधारित होती. तोपर्यन्त ही कादंबरी वाचकांना विशेष माहीत नव्हती. वेबसिरीज आल्यानंतर मूळ कथानक काय आहे, दुसऱ्या सिझनमध्ये काय होणार आहे याची उत्सुकता वाढली आणि हजारो प्रेक्षक वाचकांच्या भूमिकेत शिरून कादंबरी शोधून वाचू लागले. अर्थात हे असं होणंदेखील आपल्याला नवीन नाही. आजवर अनेक दर्जेदार कादंबऱ्यांवर नाटकं, सिनेमे निघाले आहेत. केवळ मराठीच नव्हे तर हिंदी किंवा इतर भाषांतील उत्तम दर्जेदार कथानकांवर आधारित कलाकृती माध्यमांतर होऊन नाटक किंवा सिनेमांच्या रुपात आपल्यासमोर आल्या आहेत आणि त्या तितक्याच प्रेमानं रसिक प्रेक्षकांनी स्वीकारल्याही आहेत. वेबसिरीज हे माध्यमदेखील अशा माध्यमांतराला अपवाद नाही. आपण काही अशाच वेबसिरीजबद्दल बोलणार आहोत, ज्या पुस्तकांवर आधारित आहेत.

Netflix वर सेक्रेड गेम्सचा पहिला सिझन आला त्याच दरम्यान माझ्याकडे 'सेक्रेड गेम्स' या मूळ इंग्रजी कादंबरीचा मराठी अनुवाद करण्याचं काम आलं. मला प्रचंड उत्सुकता होती की नव्याने आलेली वेबसिरीज बघू का आधी पुस्तक वाचू? मी पटकन पुस्तक चाळलं आणि सिझन वन देखील बघितला. मला सगळे एपिसोड्स पाहून लक्षात आलं, की हे नवं प्रकरण आहे. पुस्तकातील कथानक तर अतिशय डिटेल्ड होतंच त्यामुळे कथानक डोळ्यासमोर उभं राहण्याचा अनुभव पुस्तक वाचताना देखील आलेला होताच. पण, स्क्रीनवर ते वेबसिरीज म्हणून उभं करताना त्यात झालेले सूक्ष्मात सूक्ष्म बदल देखील माझ्यातील अनुवादिकेने टिपले. मला कुतूहल निर्माण झालं की हे माध्यमांतर करताना का केलं गेलं असेल? आणि माझा स्वतःचाही त्याबाबत विचार सुरु झाला. सेक्रेड गेम्समुळे मग आता इतरही तशा पुस्तकांवर आधारित वेबसिरीज आल्यावर मूळ कादंबरी वाचण्याकडे माझा कल आपोआप वाढला आणि डोक्यात त्याचा तुलनात्मक विचार एक प्रेक्षक आणि वाचक म्हणून नक्कीच होऊ लागला.

तसं बघायला गेलं तर Netflix हे भारतातलं पहिलं लोकप्रिय ओटीटी चॅनेल आहे असं म्हणता येईल. Netflix हे जगभरातील अनेक देशांत पाहिलं जाणारं चॅनेल आहे आणि त्यावर केवळ भारतीयच नव्हे तर इतर देशांतील मनोरंजक कंटेंट उपलब्ध होतो. इंग्रजी वेबसिरीजदेखील आहेत आणि भारतीयांसाठी ओटीटीवर अनेक देशांतील कंटेंट ही पर्वणीच ठरली. हळूहळू अनेक OTT वाहिन्या आल्या आणि या सर्वांमध्ये कंटेंटकरता प्रचंड स्पर्धाही ओघानंच आली. नव्यानं कथानकं लिहून त्यावर वेबसिरीज निर्माण करण्यासाठी प्रॉडक्शन हाउसेस जोमानं कामाला लागली. त्याशिवाय, उत्तम कादंबऱ्या शोधून त्यावर आधारित वेबसिरीज बनवल्या गेल्या आणि बनवल्या जात आहेत. अशाच काही पुस्तकांवर आधारित असलेल्या आणि गाजलेल्या (न गाजलेल्यासुद्धा) वेबसिरीजबद्दल बोलायचं झालं तर अनेक ... पटकन

नजरेसमोर येतात आणि ती म्हणजे सेक्रेड गेम्स (हिंदी), स्टेज ऑफ सीज (हिंदी), ए सुटेबल बॉय (हिंदी), द मॅरीड वूमन (हिंदी), हॅलो मिनी (हिंदी), रवींद्रनाथ टागोर शॉर्ट स्टोरीज (हिंदी), बार्ड ऑफ ब्लड (हिंदी), सिलेक्शन डे (हिंदी), समांतर (मराठी), द स्कॅम (हिंदी), क्रिमिनल जस्टीस (हिंदी), शॅडो अँड बोन (इंग्लिश), गेम ऑफ थ्रोन्स (इंग्लिश), फौदा (अरेबिक/ इंग्लिश), द हँडमेड्स टेल (इंग्लिश), द फायनल कॉल (हिंदी), लायला (हिंदी), बेस्ट सेलर (हिंदी), इ. पुस्तकांवर आधारित नसलेल्या अनेक वेबसिरीज सुपरहिट ठरल्या जसं की पाताल लोक, पंचायत, दिल्ली क्राईम, मिर्झापूर, सिटी ऑफ ड्रीम्स, जमतारा, आश्रम, ब्रीद, मनी हाईस्ट आणि इतर अनेक. लोकप्रियतेनुसार यातील अनेक वेबसिरीजचे पुढील सिझनदेखील आले. पण, पुस्तकावर आधारित वेबसिरीजबद्दल बोलायचं तर मात्र तशी हाताच्या बोटांवर मोजता येतील अशीच टायटल्स आठवतात.

**साहित्यकृती आणि माध्यमांतर:**

भारतीय प्रेक्षकांना उत्कृष्ट साहित्यकृतीवर आधारित सिनेमा किंवा नाटकं हा प्रकार नवीन नाही. साहित्यकृतींच्या माध्यमांतरांचे अनेक यशस्वी, अयशस्वी प्रयोगांचे आपण साक्षीदार आहोत. माध्यमांतर करताना अनेक बाबींचं  भान लेखक- दिग्दर्शकाला ठेवावं लागतं आणि त्यावर माध्यमांतराचं यशापयश अवलंबून असतं.

पुस्तकवाचन हा एक अनुभव असतो. तो लेखकानं केलेल्या वर्णनावर आधारित एक चित्रनिर्मिती वाचकांच्या मनात तयार करतो. हा अनुभव प्रत्येक वाचकाचा वेगळा असल्यानं त्यानं जे सचित्रीकरण केलं आहे ते दुसऱ्या वाचकाच्या मनातील प्रतिमेपेक्षा वेगळं असू शकतं. तरीही मूळ लेखकानं पुस्तकात पात्र, वातावरण आणि घटना किती तपशीलवार उभ्या केल्या आहेत त्यावर हे सर्व अवलंबून असतं. वाचक आपापल्यापरीनं कादंबरीतील दृश्य अशाप्रकारे मनात उभी करतात. जे चित्र वाचकाच्या मनात उभं राहतं (ज्याला आपण visualisation असं म्हणतो) त्याचा परिणाम खोलवर झालेला असतो. तोच वाचक जेव्हा त्या मूळ पुस्तकावर आधारित कलाकृती बघतो, तेव्हा पुस्तक वाचून त्याच्या मनात तयार झालेली मूळ प्रतिमा आणि पडद्यावर दिग्दर्शकानं त्या प्रतिमेशी मिळतीजुळती अशी उभी केलेली प्रतिमा यांची नकळत तुलना होते. कधी त्याला मूळ पुस्तक जास्त छान वाटू शकतं, तर कधी पडद्यावर उभी केलेली कलाकृती जास्त छान वाटू शकते. कधी कधी ज्या प्रेक्षकांनी मूळ पुस्तक वाचलेलं नसतं, पण त्यांना पडद्यावरील कलाकृती इतकी आवडते की त्यांनाही त्यानंतर मूळ पुस्तक वाचण्याची इच्छा होते, ते वाचतातही! अनेकदा पुस्तकावर आधारित सिनेमा, नाटक किंवा सिरीयल आल्यानंतर मूळ पुस्तकांचा खप वाढलेला दिसून येतो. त्याचं कारण प्रेक्षकांना मूळ साहित्यकृतीबद्दल निर्माण झालेलं आकर्षण असतं. अर्थात, अशावेळी नंतर वाचलेलं पुस्तक मात्र त्यांना आवडेलच असं नाही. कारण, नकळत त्यांनी

पाहिलेल्या प्रतिमेशी मूळ पुस्तकातील प्रतिमा जुळत नाही. हे सर्व आपल्याला प्रेक्षकांच्या विविध प्रतिक्रियांमधून दिसून येतं. अर्थात यात दोष त्यांचाही नसतो. मूळ कथानकातील कथाबीज जर उत्तम असेल तर ज्या माध्यमात त्याची निर्मिती करायची आहे, त्या माध्यमाच्या मागणीनुसार आणि काळानुसार त्यात काही बदल करणं आवश्यक असतं आणि पटकथालेखक आणि दिग्दर्शक ते बदल करतात. हेतू कलाकृती उत्कृष्ट होऊन प्रेक्षकांच्या समोर यावी हाच असतो. बहुतांशी ते साध्यही होतं. म्हणूनच, आजही सर्व माध्यमातील निर्माते नवीन कथानकं लिहून घेण्याच्या बरोबरीनंच उत्तम कथानक असलेल्या पुस्तकांच्या शोधात असलेले दिसतात.

**माध्यमांतर आणि बदल:**

उत्कंठा, सातत्यानं घडत राहणारं, पुढे सरकणारं कथानक, गतिमानता, ही वेबसिरीज माध्यमाची वैशिष्ट्यं आहेत. अर्थात सिनेमा, नाटक या माध्यमातही कथानक गतीनं पुढे सरकत नसेल तर ते रटाळ वाटतंच. पण, आज हातात मोबाईल घेऊन वेबसिरीज बघणारा प्रेक्षक जर काही क्षण कथानक रटाळ वाटलं तर चॅनेल बदलतो. त्याच्यासमोर आज अनेक पर्याय तत्परतेनं उपलब्ध असतात. त्यामुळे गतीनं पुढे जाणारं कथानक, सातत्यानं काहीतरी घडत राहणं, कथानकाला साजेसं पार्श्वसंगीत आणि उत्कंठा या गोष्टी प्रामुख्यानं माध्यमांतर करताना लक्षात घेतल्या जातात. अर्थातच, कलाकार, अभिनय या गोष्टींना तितकंच महत्त्व आहे. सर्व गोष्टींची सांगड घालून समोर आलेलं चटपटीत आणि थोडक्यात संपणारं असं हे गणित जमलं तर वेबसिरीज हिट होतातच.

म्हणूनच पुस्तकावर आधारित वेबसिरीज असं माध्यमांतर करताना, अनेकदा मूळ पुस्तकातील घटनाक्रम तसाच ठेवणं हे योग्य न वाटल्यानं, आपल्याला कथानक उलट सुलट पुढे जाताना दिसतं. सरळसोट जाणारी गोष्ट फ्लॅशबॅक तंत्राचा योग्य वापर करून किंवा पुस्तकातील कथानक आणि उपकथानक हे समांतर रीतीनं घडवत लेखक- दिग्दर्शक ते आपल्यासमोर आणतात. यामुळे वेबसिरीजची पकड प्रेक्षकांवर घट्ट होते. जसं उत्कंठेमुळे पुस्तक हातातून खाली ठेवता येत नाही, तशीच एपिसोडिक असलेली वेबसिरीजदेखील प्रेक्षक एकाच बैठकीत बघून संपवतात, ज्याला आपण म्हणतो. उत्कंठा आणि गतिमानता ही प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यासाठीची उपयुक्त साधनं आहेत आणि वेबसिरीज बनवताना त्यामुळेच अनेकदा कथानकात त्याकरता काही बदल करणं आवश्यक असतं. अर्थात हे सगळं करताना कथानकाच्या मूळ गाभ्याला कुठेही धक्का लागता कामा नये हे देखील बघावं लागतं. कारण, मूळ पुस्तक वाचलेले, किंवा वेबसिरीज बघून पुस्तक वाचणारे प्रेक्षक मूळ कथानक आणि वेबसिरीज यांचं तुलनात्मक मूल्यमापन करतात. त्यामुळे, कलाकृतीत फेरफार करताना ते जुजबी आणि कथेच्या अवकाशाला धक्का न लावणारं असणं हे एक आव्हान असतं.

वेबसिरीज आणि माध्यमांतराविषयी बोलताना मला आवर्जून 'सेक्रेड गेम्स'चं उदाहरण द्यावंसं वाटतं. विक्रम चंद्रा हे जरी अमेरिकन-भारतीय लेखक असले, तरी त्यांच्या घरी साहित्य आणि सिनेमा दोन्हींची पार्श्वभूमी आहे. त्यांनी सेक्रेड गेम्स ही मूळ इंग्रजी कादंबरी लिहितानाच इतक्या तपशीलवार लिहिलेली आहे की त्यातील गणेश गायतोंडे हे केंद्रवर्ती असलेलं पात्र, त्याचं जग, पोलीस इन्स्पेक्टर सरताज सिंग, आणि गणेश गायतोंडेनं दिलेल्या टिपनुसार घडणाऱ्या घटना, त्यांची उकल या सर्व गोष्टींचे इतर बारीक तपशील डोळ्यांसमोर उभे राहतात. कादंबरीमध्ये वेबसिरीज बनण्याचे सर्व आवश्यक गुण असल्यामुळे त्यावर वेबसिरीज बनली यात नवल काहीच नाही. त्याचा स्क्रीन प्ले करताना माध्यमांतर करण्यासाठी आवश्यक बदल केलेले आहेत, जसे की सरताजची आई, तिची फाळणीची पार्श्वभूमी, त्यांचा त्यामुळे झालेला एकूण कौटुंबिक मानसिक, भावनिक संघर्ष, या गोष्टी टाळलेल्या दिसतात. त्यामुळे थोडी लांबड कमी झाली तरी त्या ऐवजी काही नवीन पात्रं आणलेली दिसतात. उदा. वेबसिरीजमध्ये दिसलेले आणि खूप लोकप्रिय झालेले 'कुकू' हे पात्र मूळ कादंबरीत नाही. मात्र, पटकथेत ते अत्यंत चपखलपणे पेरलेलं आहे. ते कुठेही घुसवलेलं वाटत नाही. उलट गणेश गायतोंडेच्या डॉन होण्याच्या वाटचालीमध्ये पडद्यावरील 'कुकू' ची महत्त्वाची भूमिका आहे. ते पात्र त्याच्यातील आत्मविश्वास आणि ईर्ष्या या दोन गोष्टींना खतपाणी घालतं. त्याच्या लैंगिक आयुष्यातील काही गोष्टी ठळकपणे समोर आणण्यासाठी नव्यानं घातलेल्या या पात्राचा वापर पटकथेत चांगल्या रीतीनं केला गेलेला दिसतो. मात्र, बाकी कथानक जसंच्या तसं वेबसिरीजमध्ये दिसतं. मूळ कादंबरीतील काटेकर या पोलिसाचं पात्र जितकं वजनदार होतं, त्याहून अधिक ते जितेंद्र जोशीनं उभं केलं. म्हणूनच गणेश गायतोंडे, सरताज सिंग, भोसले या पात्रांच्या बरोबरीनं काटेकरही प्रेक्षकांना खूप आवडला. सेक्रेड गेम्समधील गुरुजी आणि त्यांचा आश्रम, त्यातील धंदे, या ठिकाणी कथानक जसं मूळ पुस्तकात रेंगाळलं आहे तसंच ते पडद्यावरदेखील रेंगाळलेलं दिसलं आणि म्हणूनच प्रेक्षकांना सेक्रेड गेम्स- सिझन १ जितका अपील झाला, तितका सिझन २ झाला नाही. मात्र, सिझन १ ने प्रेक्षकांवर उत्तम पकड घेतलेली असल्यानं सिझन २ मध्ये काय आहे हे जाणून घेण्यासाठी लोकांच्या मूळ पुस्तकावर उड्या पडल्या आणि मूळ कादंबरी त्यानंतर इतर भाषांमध्येही अनुवादित होऊन तिचा उत्तम खप झाला. अर्थात, उत्तरार्धात रेंगाळलेल्या कथानकामुळे प्रेक्षक आणि वाचक दोघांची निराशा झाली ती गोष्ट निराळी.

अशीच अजून एक भरपूर चर्चिली गेलेली पुस्तकावर आधारित मराठी वेबसिरीज म्हणजे 'समांतर'. नामवंत मराठी लेखक सुहास शिरवळकर यांच्या 'समांतर' या मूळ कादंबरीवर आधारित ही वेबसिरीज प्लेयरवर आली आणि अल्पावधीतच त्याच्या वेगळ्या कथानकामुळे लोकप्रिय झाली. आपल्या भविष्यात काय होणार आहे याचा शोध घेणाऱ्या कुमार महाजन तरुणाला त्याचं भविष्य सुदर्शन चक्रपाणी नावाच्या एका इसमाच्या आयुष्यातील घटनाक्रमांशी तंतोतंत जुळणारं आहे असं समजल्यावर तो सुदर्शन

चक्रपाणीचा शोध घेऊ लागतो. कुमार महाजनची भूमिका करणारा मराठी सुपरस्टार स्वप्नील जोशी इथे त्याच्या नेहमीपेक्षा अगदी वेगळ्या लूकमध्ये दिसला. त्यानं त्याची भूमिका समरसून केली. मात्र, कथानकातील सुदर्शन चक्रपाणी या पात्राबद्दल असलेलं प्रचंड औत्सुक्य हे त्याच्यावर मात करणारं ठरलं. सुदर्शन चक्रपाणीच्या भूमिकेत सर्वांचा लाडका मराठी व हिंदी कलाकार नितीश भारद्वाज होता आणि त्यानं त्याच्याबद्दल निर्माण झालेल्या औत्सुक्याला पूर्ण न्याय दिला. त्याची भूमिका केंद्रस्थानी होती आणि त्याचा अभिनय या दोन गोष्टी भाव खाऊन गेल्या. भविष्य सांगणाऱ्या जयंत सावरकर या ज्येष्ठ कलाकारानंही भूमिका उत्तम केली. मात्र, ओटीटी माध्यमाचा फायदा करून घेण्यासाठी किंवा कथानकात मसाला म्हणून घातलेल्या स्वप्नील जोशी आणि वेबसिरीजमध्ये त्याच्या पत्नीची भूमिका करणाऱ्या तेजस्विनी पंडित यांच्या किसिंग सीन्सवर मात्र प्रेक्षकांनी सडकून टीका केली. केवळ ओटीटीवर चालेल आणि खपेल म्हणून केलेले असे काही किरकोळ बदल कधीकधी प्रेक्षक नाकारतात याचं उत्तम उदाहरण म्हणून 'समांतर'कडे बघता येईल. वेबसिरीज म्हणजे प्रेक्षकांना अनावश्यक हिंसा किंवा सेक्स सीन्स आवडतात या गोष्टीला समांतरच्या प्रेक्षकांनी छेद दिला असंदेखील म्हणता येईल. या वेबसिरीजनंतरही त्याचा दुसरा सिझन येईपर्यंत प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता होती आणि मधल्या काळात ज्यांनी मूळ मराठी कादंबरी वाचलेली नव्हती त्या प्रेक्षकांनी कादंबरी वाचणं पसंत केल्यामुळे मूळ कादंबरीला पुन्हा मागणी वाढली.

अजून एक गाजलेली कादंबरी आणि त्यावर जगभर लोकप्रिय झालेली वेबसिरीज म्हणजे GOT (Game of Thrones) प्रख्यात इंग्रजी लेखक जॉर्ज आर आर मार्टिन यांच्या 'गेम ऑफ थ्रोन्स' या कादंबऱ्यांच्या मालिकेवर आधारित ही वेबसिरीज २०१५ साली HBO वर आली आणि ॲक्शन हा प्रकार आवडणाऱ्या पिढीनं ती जगभरात डोक्यावर घेतली. या वेबसिरीजचे एकूण नऊ सिझन आले. सत्ता आणि संघर्ष हाच मूळ गाभा असलेल्या कथेत नऊ कुटुंबांमधील युद्ध आहे. त्यामुळे त्याची स्टार कास्टही प्रचंड मोठी आणि विविध देशांत त्याचं चित्रीकरण झालं. उत्कंठा टिकवून ठेवणाऱ्या काही सिझन्सनंतर या वेबसिरीजलादेखील टीकेला सामोरं जावं लागलं. प्रेक्षकांना एकदा उत्कंठेची सवय लागली की जेव्हा कथानकात पुढे काय होणार याची उत्कंठा कमी होते, तेव्हा आपोआप सिरीज टीकेस पात्र होते असं दिसून येतं. देखील याला अपवाद नव्हती. तरीही जगभरात लोकप्रिय होणारी पुस्तकांवर आधारित वेबसिरीज म्हणून तिचं महत्त्व अजिबात कमी होत नाही. वेबसिरीजमुळे आधीच प्रसिद्ध असलेल्या कादंबरीचा खप सर्वत्र प्रचंड वाढला आणि प्रेक्षकांनी मूळ पुस्तकं वाचण्यालाही पसंती दिली.

आता असं एक उदाहरण घेऊ की मूळ पुस्तकाचे रिव्ह्यू खास नसताना, वेबसिरीज मात्र प्रेक्षकांना खूप आवडली. अमेझॉन प्राईमवर आलेली 'बेस्टसेलर' ही वेबसिरीज. रवी सुब्रमण्यम यांच्या 'द बेस्टसेलर शी रोट' (The Bestseller She Wrote) या पुस्तकावर आधारित वेबसिरीज प्रेक्षकांना पुस्तकाइतकी रटाळ

वाटली नाही. सर्जनशीलतेत खंड पडलेल्या लेखकाला त्याची चाहती भेटते आणि त्याच्या आयुष्यात उलथापालथ होते. प्रकाशकाची मागणी पूर्ण करण्यासाठी तो आपल्या चाहतीच्या आयुष्यातील गोष्टी कथानकात वापरतो आणि त्याच्या आणि त्याच्या चाहतीला लोकांच्या रोषाला सामोरं जावं लागतं. पुढे अनेक घटना घडतात ज्यामुळे लोकांना रहस्याची उकल होते, इ. या वेबसिरीजची गतिमानता पुस्तकापेक्षा बरी असली तरी अनेक ठिकाणी उत्कंठा शेवटपर्यंत ताणून न ठेवल्यानं आणि अभिनय, दिग्दर्शन, इ बाबीत काही कमतरता वाटल्यानं प्रेक्षकांनी तरीही टीका केलीच. मूळ पुस्तक वाचलेल्या प्रेक्षकांना सिरीज जास्त बरी झाली असं वाटलं तरी ती अजून चांगली होऊ शकली असती असे रिव्ह्यूजदेखील आले. माध्यमांतर करणं ही किती तारेवरची कसरत आहे हे यावरून लक्षात येतं.

तरीही आपल्याला असं दिसून येतं, की सर्वच वेबसिरीज बघणारे प्रेक्षक मूळ पुस्तक वाचण्याला उत्सुक असतात असं नाही किंवा ज्यांनी मूळ पुस्तक वाचलेलं आहे ते हटकून त्यावर आधारित वेबसिरीज बघतात असंही नाही. पुस्तकात असलेला कथानकाचा प्लॉट माध्यमांतर करताना क्वचित बदलला जातो, कधी कधी माध्यमानुसार कथानकाचा शेवट थोडा बदलला जातो. वर उल्लेख केल्याप्रमाणे पात्रं कमी जास्त केली जातात आणि या सगळ्या गोष्टी माध्यमांतराची गरज म्हणून केल्या असल्या तरी मूळ पुस्तकं वाचलेल्या सर्व प्रेक्षकांना दरवेळी रुचतातच असं नाही. त्यामुळे, माध्यमांतर किती यशस्वी झालं हे तसं सापेक्ष मत असेल. मात्र, उत्तम माध्यमांतर करून एखादी कलाकृती प्रेक्षकांसमोर आणणं यासाठी लेखक, पटकथालेखक आणि दिग्दर्शक यांची कसोटी लागते हे मात्र खरं!

# पुस्तकांवर आधारित काही निवडक वेबसिरीज:

## *सेक्रेड गेम्स :*




'सेक्रेड गेम्स'बद्दल बरच लिहिलं आणि बोललं गेलं आहे. विक्रम चंद्रा यांची ही तशी नंतरची कादंबरी. त्यांच्या पहिल्या 'रेड अर्थ अँड पोअरिंग रेन' या कादंबरीला 'कॉमनवेल्थ रायटर्स' पुरस्कार मिळालेला होता. त्यांनतर लिहिलेल्या 'लव्ह अँड लॉन्गिंग इन बॉम्बे' या पुस्तकालादेखील पुरस्कार मिळाला आहे. विक्रम चंद्रा यांनी मिशन कश्मीर सारख्या सिनेमाचे सह-लेखक म्हणूनही काम केलं आहे. त्यांच्या लेखन- पटकथा लेखन अनुभवाची संपूर्ण झलक पुढील 'सेक्रेड गेम्स' या कादंबरीत दिसून येते. कथानकातील गुन्हेगारी पार्श्वभूमीचा खूप खोलवर जाऊन केलेला अभ्यास त्यांच्या तपशीलवार लिखाणातून दिसतो आणि मूळ कादंबरी वाचतानाच पात्रं, कथेचं चित्र डोळ्यासमोर उभं राहतं. त्यांनी वेबसिरीज लिखाणातही सहभाग घेतल्यानं मूळ कथानक बऱ्यापैकी बदल न होता आणि जसंच्या तसं आपल्यासमोर येतं. अर्थात सेक्रेड गेम्सच्या यशात दिग्दर्शक अनुराग कश्यप, विक्रमादित्य मोटवाने, आणि नीरज घायवान यांचाही तितकाच वाटा आहे. पटकथेची गरज म्हणून काही प्रसंग, सेक्स, पात्रं आली असली,

तरी ती विशेष टीकेला पात्र ठरली नाहीत. 'गँग्स ऑफ वासेपूर' मुळे अनुराग कश्यप आणि टीमची वेबसिरीज म्हणजे काय बघायला मिळेल याचा थोडा अंदाज प्रेक्षकांनी बांधलेला होताच आणि त्यांची दिग्दर्शक म्हणून छाप वेबसिरीजवर दिसून येतेच. बेअर ट्रुथ म्हणता येईल असं गुन्हेगारी विश्वातील जीवन, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी टोळ्या, राजकारण आणि राजकारण्यांचा त्यातील सहभाग, बेगडी आध्यात्मिक गुरूंचा या सर्वांवरील पगडा किंवा कंट्रोल, आणि त्याचवेळी माणसांचं माणूस म्हणून भावनिक, आर्थिक, सामाजिक संघर्षासह जगणं हे सगळं एक मिश्रण बनून या वेबसिरीजमधून समोर आलं.

सेक्रेड गेम्स- (मूळ इंग्रजी कादंबरी)- लेखक- विक्रम चंद्रा (२००६)

सेक्रेड गेम्स (हिंदी वेबसिरीज)- निर्माते- विक्रमादित्य मोटवाने, अनुराग कश्यप (फॅन्टम फिल्म्स)

पटकथा- वरूण ग्रोवर, स्मिता सिंग, वसंत नाथ

कलाकार- सैफ अली खान, नवाजुद्दिन सिद्दिकी, राधिका आपटे, पंकज त्रिपाठी, कल्की कोचलीन, रणवीर शोरी, कुब्रा सैत, नीरज काब्री, जितेंद्र जोशी, व इतर अनेक मराठी, हिंदी आणि परदेशी कलाकार.

या वेबसिरीजचं वैशिष्ट्य म्हणजे यातील एपिसोड्सना विशिष्ट नावं होती आणि त्यांचा कथानकाच्या प्रवासाशी संबंध होता. अतापी-वातापी, हलाहल, वगैरे नावांनी असलेले एपिसोड्स हीदेखील प्रेक्षकांसाठी नाविन्यपूर्ण बाब होती. यातील अनेक डायलॉग लोकप्रिय झाले जे मूळ कादंबरीत नव्हते. एकूणच या वेबसिरीजला मिळालेलं ८.५ चं रेटिंग सार्थ होतं असं म्हणता येईल.

## ***समांतर :***



हिंदीनंतर मराठीतही अनेक वेबसिरीज आल्या. त्यापैकी मूळ मराठी कादंबरीवर आधारित असलेल्यांपैकी एक आणि बहुचर्चित वेबसिरीज म्हणजे 'समांतर'. प्रख्यात कादंबरीकार सुहास शिरवळकर यांच्या गूढ विषय असलेल्या 'समांतर' नावाच्याच कादंबरीवर निघालेली ही वेबसिरीज अनेक कारणांनी गाजली. मुळात वेगळा आणि काहीसा गूढ विषय असल्यानं त्यात प्रेक्षकांना बांधून ठेवण्याची क्षमता होतीच. स्टारकास्टदेखील तगडी होती. म्हणजे कुमार महाजन या मुळात नास्तिक असलेल्या, पण आता आपलं भविष्य जाणून घेण्याच्या प्रवासाला निघालेल्या नायकाच्या भूमिकेत स्वप्नील जोशी, भविष्यवेत्त्याच्या भूमिकेत ज्येष्ठ कलाकार जयंत सावरकर आणि ज्या सुदर्शन चक्रपाणीभोवती कादंबरी फिरते त्या सुदर्शन चक्रपाणीच्या भूमिकेत नितीश भारद्वाज. सुदर्शन चक्रपाणी याच्या आयुष्यातील घटना तंतोतंतपणे कुमार महाजन याच्या आयुष्यात घडणार असल्यानं प्रेक्षकांनादेखील सुदर्शन चक्रपाणीचा शोध आणि त्याच्याकडून कुमार महाजनला काय समजणार याची उत्सुकता होती. तिघांनीही त्यांच्या भूमिका उत्तम केल्या. स्वप्नील जोशी त्याच्या चॉकलेट हिरो लूकपेक्षा वेगळ्या लूकमध्ये असल्यानं चर्चेत राहिला. नितीश भारद्वाज यांना अनेक वर्षांनी स्क्रीनवर तेही मराठी स्क्रीनवर पहायला मिळाल्यानं प्रेक्षक खूष होते. पण, वेबसिरीज गाजली ती वेगळ्याच गोष्टीमुळे. स्क्रीनवर स्वप्नील जोशीच्या म्हणजे कुमार महाजन या पात्राच्या पत्नीच्या भूमिकेत तेजस्विनी पंडित होती. तिची आणि स्वप्नील जोशीची ऑनस्क्रीन केमिस्ट्री प्रेक्षकांना विशेष रुचली नाही आणि केवळ ओटीटीवर चालेल म्हणून घातलेल्या त्या दोघांच्या चुंबन दृश्यांमुळे सिरीजवर खूप टीका झाली. अर्थात ते वगळता एका वेगळ्या विषयावरील साहित्यकृती पडद्यावर आणण्याचं श्रेय या वेबसिरीजला नक्कीच जातं. लोकप्रियतेमुळे ही वेबसिरीज नंतर हिंदी,व इतर काही भाषांत डब झाली.

समांतर (मूळ मराठी कादंबरी)- लेखक- सुहास शिरवळकर

समांतर (मराठी वेबसिरीज)- लेखक- अंबर हडप

दिग्दर्शक- समीर विद्वांस

कलाकार- नितीश भारद्वाज, स्वप्नील जोशी, तेजस्विनी पंडित, सई ताम्हणकर, जयंत सावरकर, इ.

समांतर ही वेबसिरीज मराठीतील वेब कंटेंट मध्ये निश्चितच अग्रेसर असे नाव आहे. या वेबसिरीजला प्रेक्षकांनी ८.४ रेटिंग दिलं आहे.

## *द स्कॅम: द हर्षद मेहता स्टोरी :*

आतापर्यंत आलेल्या कादंबऱ्यांवर आधारित वेबसिरीजमध्ये जास्त गाजली ती म्हणजे २०२० मध्ये सोनी लिव्ह या ओटीटी चॅनेलवर आलेली 'द स्कॅम' ही वेबसिरीज! प्रसिद्ध ज्येष्ठ पत्रकार सुचेता दलाल आणि देबाशिष बासू यांच्या '१९९२- इंडियन स्टॉक मार्केट स्कॅम' या पुस्तकावर आधारित असलेली ही वेबसिरीज म्हणजे ९० च्या दशकात गाजलेल्या शेअर मार्केटच्या आर्थिक घोटाळयाची कथा. कथानक हर्षद मेहता नामक शेअर ब्रोकरचा उदय आणि त्याने पैशांच्या नशेमुळे केलेले शेअर मार्केट घोटाळे याचं सत्य शोधणारं आहे. अतिशय गाजलेल्या या घोटाळ्यानं अनेकांना देशोधडीला लावलं होतं. अखेरीस हर्षद मेहताचा अंत शिक्षा भोगताना तुरुंगातच झाला. एकूणच शेअर बाजाराचं गणित आणि त्यातील बारकावे सुचेता दलाल आणि देबाशिष बासू यांनी हर्षद मेहता घोटाळ्याचा अभ्यास करून आपल्यासमोर या पुस्तकात आणले होते. अतिशय अभ्यासपूर्ण आणि दाखल्यांनी भरलेलं हे पुस्तक तसं कुठल्याही दिग्दर्शकासाठी आव्हानच होतं. हंसल मेहता आणि जय मेहता यांनी दिग्दर्शित केलेल्या या वेबसिरीजला प्रेक्षकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. रिस्क है तो इश्क है हा डायलॉग प्रचंड लोकप्रिय झाला. कथेला साजेसं संगीत ही अजून एक जमेची बाजू होती. या सिरीजमुळे हर्षद मेहताच्या भूमिकेतील गुजराती अभिनेता प्रतीक गांधी खूपच लोकप्रिय झाला. मूळ इंग्रजी पुस्तकही वाचकांमध्ये लोकप्रिय होतंच, वेबसिरीजही प्रेक्षकांनी तितकीच पसंत केली.

द स्कॅमः हू वन, हू लॉस्ट, हू गॉट अवे – (मूळ इंग्रजी पुस्तक)- लेखक- सुचेता दलाल, देबाशिष बासू

द स्कॅमः द हर्षद मेहता स्टोरी- (हिंदी वेबसिरीज)- लेखक- सुमित पुरोहित, सौरभ डे, वैभव विशाल, करण व्यास

कलाकार- प्रतीक गांधी, श्रेया धन्वंतरी, हेमंत खेर, सतीश कौशिक, इ.

IMDb वर या वेबसिरीजनं ९.३ इतकं रेटिंग मिळवलं.

# *अ सुटेबल बॉय :*




स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारत, त्यावरील इंग्रजांचा प्रभाव, त्यातील काहीतरी जीवनाला भिडणारी गोष्ट हा दिग्दर्शिका मीरा नायर यांच्या आवडीचा विषय असं त्यांच्या इतर कलाकृतींकडे बघून आपण म्हणू शकतो. मीरा नायर आणि शिमित अमीन यांनी दिग्दर्शित केलेली ही वेबसिरीज विक्रम सेठ यांच्या मूळ 'अ सुटेबल बॉय' नावाच्या कादंबरीवर आधारित आहे. २०२० मध्ये BBC आणि netflix वर आलेली ही सहा भागांची वेबसिरीज थोडी रटाळ वाटली तरी बऱ्यापैकी लोकप्रिय झाली. विक्रम सेठ हे साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक असून त्यांच्या लिखाणावर स्वातंत्र्योत्तर भारतातील जीवनाची छाप आहे. या कादंबरीत त्यांनी आपल्या लता या धाकट्या मुलीसाठी सुयोग्य वर शोधणाऱ्या विधवा आईची धडपड मांडली आहे. ब्रिटीश इंडिया भारतात बदलत असताना समाजात होणारे सूक्ष्म बदलदेखील यात दिसून येतात. १९ वर्षांच्या लताला प्रभावित करू इच्छिणारे तीन तरुण आणि अखेरीस ती कोणाची निवड करते इतकंच कथानक असलं तरी त्याकाळातील जीवनाची झलक आणि तब्बू, इशान खट्टर, तान्या माणीकताला, नमित दास, राम कपूर अशा कलाकारांमुळे ही वेबसिरीज प्रेक्षणीय झाली.

अ सुटेबल बॉय- (मूळ इंग्रजी कादंबरी)- लेखक- विक्रम सेठ

अ सुटेबल बॉय- (वेबसिरीज) लेखक- आंड्र्यू डेव्हीस

दिग्दर्शक- मीरा नायर, शिमित अमीन

कलाकार- तान्या माणीकताला, तब्बू, इशान खट्टर, नमित दास, राम कपूर, दानेश राझ्वी, रसिका दुग्गल, इ.

एक मुलगी आपला वर निवडताना कोणत्या गोष्टींना प्राधान्य देते आणि तिच्या निर्णयांवर कोणत्या बाबींचा प्रभाव असतो हे दाखवणारी मूळ १४५० पानांची अत्यंत रटाळ वाटेल अशी कादंबरी ६ भागांच्या वेबसिरीजमध्ये सामावणं हे मोठंच काम होतं. पण ही वेबसिरीज म्हणून फक्त ६ चे रेटिंग कमावून गेली.

## *द मॅरीड वूमन :*




मंजू कपूर यांच्या 'द मॅरीड वूमन' याच नावाच्या मूळ इंग्रजी कादंबरीवर आधारित ही वेबसिरीज आल्ट बालाजी /झी५ या चॅनेलवर आली. आस्था आणि पीपलिका या दोन स्त्रियांच्या आयुष्यावर बेतलेली ही कादंबरी दोन भिन्न आयुष्य जगणाऱ्या स्त्रियांच्या जीवनात येणाऱ्या परिवर्तनाची गोष्ट सांगते. स्वतःचा शोध घेण्याच्या प्रवासादरम्यान या दोघींना एकमेकींविषयी आकर्षण वाटतं. समलैंगिक संबंध ही संकल्पनाच पूर्णतः नवीन असताना आणि कथानकाच्या पार्श्वभूमीवर बाबरी मशीद पाडण्यासारखी घटना घडत असताना या दोन स्त्रियांचा भावनिक स्वशोधाचा प्रवास या वेबसिरीजमध्ये दिसतो. आस्थाचं पात्र साकारणारी रिद्धी डोगरा आणि पीपलिकाची भूमिका करणारी मोनिका डोगरा या दोघींच्या अभिनयाचं कौतुक झालं आणि कथानकाला समलैंगिक संबंधांच्या दृश्यांची भरपूर फोडणी असली तरी वेबसिरीज तितकी लोकप्रिय झाली नाही. वास्तविक पाहता मंजू कपूर या प्रसिद्ध लेखिका आहेत आणि त्यांच्या पहिल्या कादंबरीला कॉमनवेल्थ पुरस्कार मिळालेला आहे. त्यांच्या 'कस्टडी' या कादंबरीवर आधारित अनेक मालिका हिंदी मराठी माध्यमातून टीव्हीवर आलेल्या आहेत.

'द मॅरीड वूमन'- (मूळ इंग्रजी कादंबरी)- लेखिका- मंजू कपूर

'द मॅरीड वूमन'- (वेबसिरीज)- लेखक- जया मिश्रा, सुरभी सरल सचदेव

दिग्दर्शक- साहीर रझा

कलाकार- रिद्धी डोगरा, मोनिका डोगरा, सुहास अहुजा, इमाद शहा

द मॅरीड वूमन' वर आधारित वेबसिरीजला ६.३ चे रेटिंग मिळाले.

## *लैला :*

प्रयाग अकबर यांच्या २०१७ मध्ये आलेल्या **लैला** या कादंबरीवर आधारित दीपा मेहता दिग्दर्शित लैला ही वेबसिरीज Netflix वर २०१९ मध्ये आली. येत्या काही वर्षांतील भविष्यात असू शकेल अशा पार्श्वभूमीवर कथानक घडतं. २०४० मध्ये नायिका शालिनी तिच्या हरवलेल्या मुलीचा शोध घेतानाचा प्रवास यात सहा एपिसोड्समध्ये दाखवला आहे. धार्मिक कट्टरता, राजकीय अस्थिरता, पर्यावरणाची भविष्यातील स्थिती अशा अनेक गोष्टींच्या पार्श्वभूमीवर कथानक घडतं. हुमा कुरेशीच्या शालिनीच्या भूमिकेसाठी जरी तिचं कौतुक झालं असलं तरी हिंदू धर्मियांच्या भावना दुखावल्या गेल्या कारणानं या वेबसिरीजला प्रचंड टीकेला सामोरं जावं लागलं.

लीला: (मूळ इंग्रजी कादंबरी)- लेखक- प्रयाग अकबर

लीला- (हिंदी वेबसिरीज)- लेखक- उर्मी जुवेकर

दिग्दर्शक- दीपा मेहता, शंकर रामन, पवन कुमार

कलाकार- हुमा कुरेशी, सिद्धार्थ, राहुल खन्ना, संजय सुरी, आरिफ झकारिया, इ.

मूळ कादंबरी अनेक पुरस्कारांसाठी पात्र ठरली असली तरी त्यावर आधारित वेबसिरीज तितकं कौतुक मिळवू शकली नाही. या वेबसिरीजला IMDb वर फक्त ४.९ चे रेटिंग मिळालं.

## बार्ड ऑफ ब्लड :




बिलाल सिद्दिकी या अगदी तरुण लेखकाच्या २००५ साली आलेल्या 'बार्ड ऑफ ब्लड' नावाच्याच इंग्रजी कादंबरीवर आधारित ही वेबसिरीज २०१९ साली Netflix वर आली होती. एकूण सात एपिसोड असलेली ही वेबसिरीज शाहरुख खानच्या रेड चिलीज एंटरटेनमेंटने प्रोड्यूस केली. इंडियन स्पाय थ्रिलर कॅटेगरीतील ही कादंबरी बिलाल सिद्दिकीनं वयाच्या केवळ विसाव्या वर्षी लिहिली आहे. कबीर आनंद नावाच्या पूर्व रॉ एजंट असलेल्या नायकाची ही गोष्ट घडते बलुचिस्तानच्या एका अत्यंत खतरनाक मिशनवर. आयएसआय, भारत पाकिस्तान संबंध, रॉ अशी ॲक्शनची पार्श्वभूमी असलेल्या कथानकावर आधारित वेबसिरीजचं मुख्य आकर्षण होतं - नायकाच्या भूमिकेतील इम्रान हाश्मी. स्क्रीनवर बलुचिस्तानसारखा वाटणारा लेह-लदाखचा भाग, काही पश्तू बोलणारी पात्रं, आणि भरपूर ॲक्शननं भरलेल्या या वेबसिरीजला बऱ्यापैकी लोकप्रियता मिळाली. मूळ कादंबरीच्या लेखकानंच वेबसिरीजची पटकथा लिहिली असल्यानं कथानकात विशेष बदल झालेला दिसत नाही.

बार्ड ऑफ ब्लड- (मूळ इंग्रजी कादंबरी)- लेखक- बिलाल सिद्दिकी

बार्ड ऑफ ब्लड- (वेबसिरीज)- लेखक- बिलाल सिद्दिकी, मयंक तिवारी

दिग्दर्शक- रीभू दासगुप्ता, जयदेव बॅनर्जी

कलाकार- इम्रान हाश्मी, विनीत कुमार सिंग, सोभिता धुलीपालीया, कीर्ती कुल्हारी, जयदीप अहलावत, रजित कपूर, इ.

IMDb वर या सिरीजला ६.८ चे रेटिंग मिळालं होतं.

## *सिलेक्शन डे :*




'सिलेक्शन डे' ही अरविंद अडिगा या 'बुकर प्राईझ' विजेत्या लेखकाची कादंबरी. साउथ एशियन लिटरेचर पुरस्कारासाठीही निवड झालेली साहित्यकृती. अरविंद अडिगा यांच्या पहिल्या वाहिल्या 'व्हाईट टायगर' या कादंबरीलादेखील मॅन बुकर प्राईझ मिळालं होतं. अशा लेखकानं मांडलेला एका चटणी विक्रेत्या मोहन कुमार नावाच्या वडिलांचा प्रवास म्हणजे ही 'सिलेक्शन डे'. मोहन कुमार त्याच्या मंजू कुमार आणि राधा कृष्ण या दोन मुलांना मुंबईच्या अंडर १९ क्रिकेट टीममध्ये सिलेक्शन व्हावं म्हणून प्रशिक्षण देतो. आपली मुलं श्रेष्ठ फलंदाज म्हणून नावाजली जावीत हे त्याचं स्वप्न आहे. तिथे त्याचा जुना स्पर्धक जावेद भेटतो. मंजू कुमार आणि राधा कृष्ण यांचा संघर्ष, क्रिकेटविश्वातील राजकारण, इ. भोवती फिरणारं कथानक असलेली आणि नव्या जुन्या कलाकारांची स्टारकास्ट असलेली ही netflix वर आलेली वेबसिरीज

म्हणावी तितकी प्रेक्षकांना अपील झाली नाही. क्रिकेट हा भारतीयांच्या जिव्हाळ्याचा विषय असला तरी खेळ आणि खेळाडूंचा संघर्ष दाखवण्यात ही वेबसिरीज थोडी कमी पडली असा प्रेक्षकांचा सूर होता.

सिलेक्शन डे- (मूळ इंग्रजी कादंबरी) – लेखक- अरविंद अडिगा

सिलेक्शन डे (हिंदी वेबसिरीज)- मार्स्टन ब्लूम, करण अगरवाल

दिग्दर्शक- उदयन प्रसाद, करण बूलानी

कलाकार- मोहम्मद समाद, यश ढोले, करणवीर मल्होत्रा, राजेश तेलंग, महेश मांजरेकर, रत्ना पाठक शाह, अक्षय ओबेरॉय, इ.

एकूण १२ एपिसोड असलेल्या या वेबसिरीजला ७.३ रेटिंग मिळालं  होतं.

## ***अवरोध: द सीज विदिन  :***

२०१६ मध्ये झालेल्या उरी हल्ल्यावर आधारित असलेली सोनी लिव्ह वर प्रदर्शित झालेली ही वेबसिरीज ॲक्शन थ्रिलर प्रकारातील असून, ती शिव अरुर आणि राहुल सिंग यांच्या 'इंडियाज मोस्ट फियरलेस' या पुस्तकातील काही प्रकरणांवर आधारित आहे. पुस्तक त्यातील भारतीय सेनादलाबद्दलच्या खऱ्या सुपर हिरोजच्या कथांमुळे वाचकांमध्ये लोकप्रिय होतंच. त्यावर आधारित असलेल्या २०२० मध्ये आलेल्या या वेबसिरीजनंदेखील दोन सिझन पूर्ण केले.  राज आचार्य यांनी दिग्दर्शित केलेल्या या वेबसिरीजचं त्यात टिपलेल्या बारकाव्यांसाठीही कौतुक झालं.

इंडियाज मोस्ट फियरलेस- (मूळ इंग्रजी पुस्तक)- लेखक- शिव अरुर, राहुल सिंग

अवरोध: द सीज विदिन- (हिंदी वेबसिरीज)- लेखक- हर्मनजीत सिंघा, सुदीप निगम, अभिषेक चटर्जी, आधार खुराना

दिग्दर्शक- राज आचार्य

कलाकार- अमित साध, नीरज काबी, अनंत महादेवन, आरिफ झकारिया, बिक्रमजीत कंवरपाल, मधुरिमा तुली, इ.

भारतीय सेनादलाबद्दल आदर निर्माण करणाऱ्या आणि तो द्विगुणीत करणाऱ्या या वेबसिरीजला IMDb रेटिंग ७.७ इतकं आहे.

## द फायनल कॉल :




लेखिका प्रिया कुमार यांच्या २०१५ साली आलेल्या 'आय विल गो विथ यू' या कादंबरीवर आधारित 'द फायनल कॉल' ही वेबसिरीज झी५ वर २०१९ मध्ये आली. थ्रिलर प्रकारात मोडणारी ही वेबसिरीज म्हणजे एका वैमानिकानं  वैयक्तिक कारणानं केलेल्या मुंबई ते सिडनी जाणाऱ्या विमान अपहरणनाट्याची कथा आहे. वैमानिक त्या विमान उड्डाणादरम्यान विमानातच आत्महत्या करायचं ठरवतो आणि त्यामुळे विमानातील सर्व प्रवाशांचा जीव धोक्यात येतो. तीन पैकी दोन वैमानिक मृत झाल्यावर आणि आत्महत्या करण्यासाठी इतक्या जणांना वेठीला धरणाऱ्या वैमानिकाचा हेतू लक्षात आल्यावर आपला जीव धोक्यात घालून प्रवाशांचे जीव वाचवण्यासाठी एअरहोस्टेस एअर बेसशी संपर्क साधते आणि मग विमानाचं सुरक्षित लँडिंग होईपर्यंत घडतं फक्त थरारनाट्य. अर्जुन रामपाल, साक्षी तन्वर, नीरज काबी, हर्षद अरोरा, अनुप्रिया गोयंका, जावेद जाफरी अशी तगडी स्टार कास्ट आणि सर्वांचा उत्तम अभिनय ही या वेबसिरीजची जमेची बाजू होती. कथानकात भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांची उत्तम सांगड आणि त्यावरील आध्यात्मिक आणि तत्त्वज्ञानाचं भाष्य हेदेखील त्या थरारनाट्यात छान गुंफलं होते. पुढे काय होणार याची उत्कंठा, सतत ॲक्शन यामुळे या वेबसिरीजला प्रेक्षकांची पसंती मिळाली.

'आय विल गो विथ यू'- (मूळ इंग्रजी कादंबरी)- प्रिया कुमार

द फायनल कॉल- (हिंदी वेबसिरीज)- लेखक- विजय ललवानी

दिग्दर्शक- विजय ललवानी

कलाकार- अर्जुन रामपाल, नीरज काबी, हर्षद अरोरा, साक्षी तन्वर, अनुप्रिया गोयंका, जावेद जाफरी, इ.

या वेबसिरिजचं रेटिंग ७.१ होतं.

## *स्टोरीज बाय रवींद्रनाथ टागोर :*

रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्यकृतींवर आधारित सिनेमे आपण पाहिले आहेत. त्यांच्या काही निवडक कथांवर आधारित वेबसिरीज netflix वर आली. त्यांच्या कथानकांमधील काळ उभा करत त्या गोष्टी सुंदररित्या आपल्या समोर मांडण्याचं काम अनुराग बासू या गुणी दिग्दर्शकानं केलं. ही सिरीज २०१५ मध्ये epic चॅनेलवर आली होती, नंतर netflix वर आली. छोट्या छोट्या गोष्टींमधून मानवी नात्यांची गुंफण उलगडणाऱ्या या गोष्टी २० एपिसोड्समधून आपल्यासमोर आल्या आणि खूप लोकप्रिय झाल्या. या वेबसिरीजमधली राधिका आपटे प्रामुख्यानं लक्षात राहिली. अनुराग बासू यांच्या उत्तम दिग्दर्शनाचा प्रत्यय देणारी ही वेबसिरीज ओटीटी माध्यमावरील एक क्लासिक म्हणून नक्कीच लक्षात राहील.

स्टोरीज बाय रवींद्रनाथ टागोर- (हिंदी वेबसिरीज)-

दिग्दर्शक- अनुराग बासू, देबात्मा मंडल, तानी बासू

कलाकार- राधिका आपटे, श्रेया नारायण, जन्नत झुबेर रहमानी, भानू उदय, सुमित व्यास, रोहन शाह, इ. अनेक

## द ग्रेट इंडियन मर्डर :




तशी इतक्यातच २०२२ मध्ये डिस्नी हॉटस्टारवर आलेली आणि लोकप्रिय झालेली ही वेबसिरीज लेखक विकास स्वरूप यांच्या 'सिक्स सस्पेक्ट्स' या मूळ इंग्रजी कादंबरीवर आधारित आहे. क्राईम मिस्टरी प्रकारातील ही वेबसिरीज छत्तीसगडचे गृहमंत्री असलेल्या जगन्नाथ राय यांच्या विकी राय या मुलाच्या खुनाचं रहस्य उलगडते. विकीनंच आयोजित केलेल्या पार्टीत त्याचा खून होतो आणि खुनाचा तपास सहा संशयितांच्या भोवती फिरू लागतो. विकीच्या खुनामुळे त्याच्या वडिलांच्या राजकीय कारकिर्दीला खो बसतो. विविध राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर घडणारा सहा संशयितांच्या भोवती फिरणारा तपास तिग्मांशु धुलिया यांनी अतिशय उत्कृष्टपणे मांडला आहे. त्यांच्या दिग्दर्शनामुळे मूळ कादंबरीपेक्षा वेबसिरीजला जास्त चांगले रिव्ह्यू मिळाले आहेत.

सिक्स सस्पेक्ट्स- (मूळ इंग्रजी कादंबरी)- लेखक – विकास स्वरूप

द ग्रेट इंडियन मर्डर (हिंदी वेबसिरीज)- पटकथालेखक- तिग्मांशु धुलिया, विजय मौर्य, पुनीत शर्मा

दिग्दर्शक- तिग्मांशु धुलिया

कलाकार- रिचा चढ्ढा, प्रतिक गांधी, आशुतोष राणा, रघुबीर यादव, इ.

एकूण नऊ एपिसोड असलेली ही वेबसिरीज पाहिलेले प्रेक्षक पुढील सिझनच्या प्रतीक्षेत आहेत. या वेबसिरीजला IMDb वर ७.२ चं रेटिंग आहे.

याशिवाय इतर भाषांमध्ये प्रदर्शित झालेल्या पुस्तकांवर आधारित वेबसिरीज म्हणजे गेम ऑफ थ्रोन्स, शॅडो अँड बोन्स, ॲनाटॉमी ऑफ अ स्कॅन्डल, द अंडरग्राउंड रेलरोड, फायरफ्लाय लेन, नाईन परफेक्ट स्ट्रेंजर्स, पिसेस ऑफ हर, द व्हील ऑफ टाईम, द फाउंडेशन प्रेक्षकांसाठी उपलब्ध आहेत. शिवाय अनेक पुस्तकांवर आधारित कथानकं असलेल्या हिंदी, इंग्रजी वेबसिरीज निर्मिती प्रक्रियेत आहेत. याशिवाय, नवीन पिढीतील लेखक अमिश यांच्या पौराणिक कथानकांवर आधारित कादंबऱ्यांवर वेबसिरीज येऊ घातलेल्या आहेत. प्रसिद्ध दिग्दर्शक शेखर कपूर त्याची निर्मिती आणि दिग्दर्शन करत असल्याची चर्चा आहे. अमिश यांच्या तरुण वाचक चाहत्यांसाठी आणि प्रेक्षकांसाठी ही नक्कीच पर्वणी असणार आहे. तसेच, अबंडंशिया एन्टरटेनमेंट या प्रसिद्ध प्रोडक्शन हाउसने अश्विन संघी यांच्या 'कालचक्र' या बेस्टसेलर कादंबरीचे राईट्स घेतले असून त्यावरही लवकरच वेबसिरीजची निर्मिती होणार आहे. तसेच तरुण लेखिका अपेक्षा राव यांच्या 'अलॉंग केम अ स्पायडर' या कादंबरीवरही 'फिल्टर्स' प्रोडक्शन हाउस वेबसिरीज आणत आहे. याच प्रोडक्शन हाउसने विश धमिजा यांच्या 'रिटा फेरेरा' सिरीजमधील 'भेंडी बाजार', 'लिपस्टिक' आणि 'दूसरा' या तीन कादंबऱ्यांचे राईट्स देखील घेतले आहेत.

मूळ पुस्तक वाचलेले असल्याने त्यावर आधारित वेबसिरीज बघण्याकडे कल असणारे वाचक आणि वेबसिरीजमुळे मूळ पुस्तकाबद्दल आकर्षण वाटून ते वाचण्याकडे वळणारे प्रेक्षक दोन्ही रसिकच. नव्याने कथानक लिहिण्याकडे कल असला तरीही उत्तम कथानकं असलेली पुस्तकं शोधून त्यावर आधारित कलाकृती पडद्यावर आणणे हे कधीही स्वागतार्हच म्हंटले पाहिजे. या ट्रेंड मुळे आज एक छोटासा बदल मात्र झालेला दिसतो आणि तो म्हणजे वेबसिरीज निर्मिती होईल अशा प्रकारेच पुस्तक लिहिणे. अर्थात ते देखील स्वागतार्हच.

(लेखिका व्यवसायाने फ्री लान्स लेखिका आणि अनुवादक आहेत. 'सेक्रेड गेम्स' या मूळ इंग्रजी कादंबरीचा मराठी अनुवाद त्यांनी केला आहे.)

***सगळे पोस्टर व पुस्तकांची कव्हर्सः इंटरनेट

# कौशल इनामदार: संगीतकार की चिंतक

- अमोल उदगीरकर



ह्यावर्षीच्या व्हिडीओ सेगमेंटमध्ये कुणाचं अनप्लग्ड करावं यावर खल चालू असतानाच आमच्या डोक्यात पहिलं नाव आलं ते कौशल इनामदारचं. कौशल मित्र आणि परिचित आहे त्यामुळे तो सहज उपलब्ध होईल, असा कोता विचार त्यामागे नक्कीच नव्हता. कौशल हा अतिशय लोकप्रिय संगीतकार आहेच. त्याची कित्येक गाणी मराठी जनतेच्या ओठी रुळलेली आहेत. पण कौशल हा जितका उत्तम संगीतकार आहे, तितकाच तो उत्तम 'चिंतक' आहे. संगीताविषयी आणि अनेकदा संगीतबाह्य मुद्द्यांवरही तो खूप विचार करतो, निरीक्षण नोंदवतो आणि मुख्य म्हणजे तो या निरीक्षणांचं डॉक्युमेंटेशन वेगवेगळ्या स्वरूपात करून ठेवतो. मग त्याला तिथे कुठलाही विषय वर्ज्य नाही. लताबाई असोत, संगीतनिर्मितीची प्रक्रिया असो, गीतरामायण असो, रामलक्ष्मण यांच्यासारखा दुर्लक्षित संगीतकार असो वा गोविंदाचे सिनेमे, कौशल या सगळ्यांवर खूप हटके भाष्य करतो. आम्हाला संपादक म्हणून संगीतकार कौशल इतकाच विचारवंत कौशलमध्ये रस होता. तुझा पहिला सिनेमा कुठला, आगामी सिनेमा कुठला या ठोकळेबाज प्रश्नांपेक्षा कौशलची वेगवेगळ्या मुद्द्यांवरची मतं काय आहेत, हे जाणून घेण्यात आम्हाला रस होता.

कौशलनं आम्हाला निराश करण्याचा प्रश्नच नव्हता. वेगवेगळ्या समाजमाध्यमांमधून चाहत्यांशी-श्रोत्यांशी प्रत्यक्ष संपर्क असणाऱ्या कौशलमधल्या कलावंतामध्ये सोशल मीडियामुळे काय काय आणि कसे कसे बदल झाले, कलावंतांसोबत काम करताना कलावंतानं आपला इगो कामात कितपत येऊ द्यावा, 'बाजारपेठेचा दबाव' नामक गोष्टीशी कौशल कसं डील करतो, कलावंताची प्रतिभा म्हणजे नेमकं काय असतं, हल्ली कुठल्याही कलाकृतीचं 'मासी' आणि 'क्लासी' असं जे ढोबळ वर्गीकरण केलं जातं, अशा वेगवगेळ्या विषयांवर कौशल भरभरून बोलला आहे आणि तेही त्याच्या मुलाशी, अनुरागशी. हे त्याचं रूप मस्त आहे. विषय वरकरणी रुक्ष वाटत असले, तरी कॅमेऱ्याशी उत्तम दोस्ती असलेल्या आणि कॅमेऱ्यासमोर कसं बोलावं याचं भान असलेल्या कौशलच्या रसाळ शैलीमुळे कौशलचा हा एकतर्फी संवाद कुठेही रटाळ होत नाही. व्हिडीओ बघितल्यावर आपण अजून श्रीमंत झालो आहोत ही भावना मनात येते. या गप्पा आपल्याला समृद्ध करतात, हे नक्कीच.



**कौशल इनामदार अनप्लग्ड व्हिडिओज खालील QR code वर बघता येतील**

# करा रे हाकारा ! पिटा रे डांगोरा

- **प्रसाद कुमठेकर**

आम्ही या डिपार्टमेंटमध्ये आलो कारण ...महायुद्धामुळे शिक्षणात खंड पडलेल्या आणि आजारपणामुळे नोकरीकरिता अपात्र ठरलेल्या जॉन लोगी बेअर्ड या अभियंत्यानं त्याच्या बेकारीच्या आणि आजारपणाच्या काळात टीव्ही अर्थात दूरदर्शन या 'दुनियाबदल' यंत्राचा शोध लावला. ग्रेट ब्रिटेनच्या रॉयल इंस्टीट्यूशनमध्ये गप्पा मारत धूम्रपान करणाऱ्या एका व्यक्तीचा हलता डुलता क्लोज-अप एका खोलीतून दुसऱ्या खोलीत प्रक्षेपित करण्यात आला होता. एकोणीसशे छत्तीस साली जनसामान्यांसाठी टीव्हीचं पहिलं प्रसारण बीबीसी वाहिनीनं केलं. अमेरिकेच्या डब्ल्यूएनबीटी चॅनलवर जगातील पहिली टीव्ही जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. बुलोवा नावाच्या घड्याळाच्या कंपनीनं ती दिली. एका बेसबॉल मॅचच्याआधी ती प्रसारित करण्यात आली. फक्त दहा सेकंदाच्या या जाहिरातीसाठी या घड्याळाच्या कंपनीनं नऊ डॉलर दिले होते. उपरोक्त माहितीतील जाहिरात, सेकंद, रुपये एवढ्या तीन गोष्टी अधोरेखित व्हाव्यात कारण तीन गोष्टीवरच टीव्हीची अवाढव्य दुनिया आबाद आहे.

जगातील पहिली टीव्ही जाहिरात आल्यानंतर बरोबर पंधरा वर्षांनी युनेस्कोनं दिलेल्या वीस हजार डॉलर नगद आणि एकशे ऐंशी फिलिप्स टेलिव्हिजन सेट यांच्या जोरावर भारतीय टेलिव्हिजनचा पाया घातला गेला. पु. ल. देशपांडे दूरदर्शनचे पहिले संचालक होते. त्यांनीच टेलिव्हिजनसाठी "दूरदर्शन" असं नाव सुचवलं. दूरदर्शनसाठी बनवल्या गेलेल्या पहिल्या कार्यक्रमात वैजयंतीमालाचा डान्ससुद्धा होता.

दूरदर्शनच्या दुनियेत बरीच छोटी मोठी स्थित्यंतरं झाली. बातम्या आल्या. कृष्णधवल टीव्ही रंगीत झाला. रामायण आलं. महाभारत आलं. चित्रहार, छायागीत, सिनेमा, डेली सोप्स, 'के' सोप्स, टेस्ट क्रिकेट, वन डे, ट्वेंटी ट्वेंटी सगळं आलं. टेलिव्हिजनचा कारभार फो फो फोफावला.

साल ब्याण्णवनंतर प्रायव्हेट चॅनेल्स आले.त्यांनी जाहिरातीचं मार्केट बरोबर हेरलं आणि एका दूरदर्शनसमोर आठ-नऊशे चॅनेल्स उभे राहिले. कार्यक्रमाच्या आधी किंवा नंतर येणाऱ्या जाहिराती कार्यक्रमामध्ये येऊ लागल्या. मधल्या काळात अँटेना गेला, केबल आलं, रक्तरंजित केबलवॉर झाल्या. सेटटॉप बॉक्सची एन्ट्री झाली. फोर जी आलं तसं वायफायवर स्मार्टटीव्ही कनेक्ट करून मोबाइलवर

टीव्ही पाहणं 'इन' झालं. टेबलावर मांडलेला टीव्ही भिंतीवर चढला अन मग त्यानं  तिथून तुमच्या आमच्या खिशातल्या फोनमध्ये उडी मारली.

कधी काळी छोटा स्क्रीन म्हणून हिणवली जाणारी टीव्ही इंडस्ट्री आज घडीला विराट झाली. 'कोटीच्या कोटी उड्डाणे' घेत सत्तर हजार कोटी रुपयांची उलाढाल करत तिनं मोठ्या स्क्रीनला म्हणजे चित्रपट उद्योगालासुद्धा आपल्या पंखाखाली घेतलं आणि फिल्म करण्यासाठी म्हणून आलेल्या कित्येक उदयोन्मुख सर्जनशील व्यक्तींनासुद्धा. पण हे आजचं नाही. उत्तम पैसे आणि खात्रीलायक काम देणाऱ्या या टीव्ही इंडस्ट्रीनं सिनेमाला शाहरुखपासून इरफानपर्यंत कित्येक  चांगले कलाकार दिलेत. अनुराग कश्यप, तिग्मांशु धुलियासारखे कित्येक दिग्दर्शक तगवलेत.

आज चॅनेल्स वाढलेत. काम वाढलंय. धंदा वाढलाय आणि जिथे धंधा तिथे प्रमोशन. आज जीईसी( जनरल एन्टरटेनमेंट चॅनेल) न्यूज चॅनेल्स, मुव्ही चॅनेल्स, म्युजिक चॅनेल्स, कार्टून किंवा ॲनिमेशन चॅनेल्स, रिजनल चॅनेल्स, इंग्लिश चॅनेल्स अशा अनेक टाईपच्या चॅनेल्सनी वेगवेगळ्या पद्धतीचा रोजगार निर्माण केलाय. कधी काळी महानगरातल्या लोकांसाठीच असलेलं हे क्षेत्र हळू हळू परिघावरच्या, गावाखेड्यातून आलेल्या मुलांमुलींनी काबीज केलं. कधी काळी चारपाच  बोटावर संपणारी मास कॉमची कॉलेजीस आता शहरोशहरी झाली. डेली सोप, फिक्शन, नॉन-फिक्शन,रियालिटी शोज, टी आर पी,जाहिराती, प्रोमोज, प्रोडक्शन हाउस, टीव्ही कन्टेट  असे टेलिव्हिजन फ्रेंडली शब्द जनसामान्यांच्या मुखामुखी रुळलेत. तरीसुद्धा चॅनेल्सच्या दरवाजाच्या 'आत' काम कसं चालतं? टीव्हीवर दिसणारी पब्लिक सोडली तर बाकी पब्लिक मोठमोठाल्या ऑफिसात बसून नेमकं काय काम करतं? याच्याबद्दलची फार माहिती प्रसारित झालेली नाही.

मी टीव्हीकर झालो, पण इथे येण्याआधी मलासुद्धा या क्षेत्राबद्दल पुरेशी माहिती नव्हती. 'फिल्म' करायची इच्छा मनी बाळगून मी मास कॉम केलेलं. वाय टू केच्या काळात बहुतेक सगळ्यांचंच हे असं होतं. फिल्म ॲंड टेलिव्हिजमधलं 'टेलिव्हिजन' तितकंसं चंदेरी वाटायचं नाहीच. 'फिल्म बनाने का है' असं म्हणत  मुंबईला आलो आणि इथे कळलं फिल्मचा स्ट्रगल वाईट. टेलिव्हिजनमध्ये तग धरण्याचे जास्त चान्सेस आहेत. रेग्युलर इन्कम आहे. अर्थात टीव्हीवर बातम्या आणि सिरिअल्स येतात या पलीकडे फार माहिती नव्हती. वाटायचं, टीव्हीवर येणाऱ्या सगळ्या सिरिअल्स चॅनेल्सच्या दरवाजाआडच बनत असतील. पण जसंजसं काम करत गेलो तेव्हा कळलं की या सिरिअल्स वेगवेगळ्या प्रोडक्शन हाउसकडे आउटसोर्स करायला दिल्या जातात. चॅनेलची प्रोग्रामिंग टीम तो कंटेंट सुपरवाईज करते. प्रोग्रामिंग टीममधल्या प्रतिनिधीला कार्यकारी निर्माता म्हटलं जातं आणि हा निर्माता 'पगारी' असतो. त्याचं काम समन्वयाचं असतं. या कामात व्यवस्थापनाचा भाग

जास्त आहे आणि या टीमच्या बरोबर आणखी एक डिपार्टमेंट चॅनेलमध्ये असतं ते म्हणजे ओएपी (On Air Promotion) या डिपार्टमेंटचं मुख्य काम म्हणजे 'करा रे हाकारा ! पिटा रे डांगोरा' हेच. कमीत कमी सेकंदाचे ट्रेलर किंवा जाहिराती तयार करून चॅनेलवर येणाऱ्या कंटेंटचं प्रमोशन करणं. जास्तीत जास्त प्रेक्षकांच्या मनात त्या कार्यक्रमाबद्दल कुतूहल निर्माण करून त्यांना तो कार्यक्रम पाहण्यासाठी उद्युक्त करणं. जितके जास्त प्रेक्षक येतील तितका जास्त तुमच्या चॅनेलचा टी आर पी वाढेल आणि जितका जास्त टी आर पी तितक्या जास्त जाहिराती. आणि जितक्या जास्त जाहिराती तितका जास्त नफा, हे धंद्याचं साधं सोपं गणित.

OAP डिपार्टमेंटमधील जाहिरात दिग्दर्शकाला 'जाहिरात निर्माता' म्हटलं जातं. कारण तो फक्त दिग्दर्शनच करत नाही, तर तो करत असलेल्या जाहिरातीच्या बजेटपासून ते फायनल प्रॉडक्टपर्यंत सगळ्याच गोष्टीची जुळवाजुळव करतो. काही वेळेला प्रोमो प्रोड्यूसर जाहिरात दिग्दर्शक आउटसोर्सपण करू शकतो. अर्थात हे फार क्वचितवेळेला घडतं. प्रत्येक नवशिक्या प्रोमो प्रोड्युसरच्या करिअरच्या सुरुवातीला एक गोष्ट पक्की घडते ती म्हणजे शुटींगच्या पहिल्या दिवशी त्याचे सिनिअर्स त्याला बाजारातून  'कलर बार' आणायला लावतात. त्यानं ते एकदा केलं की त्याचं गंडाबंधन झालं!

OAP प्रोड्यूसरला मार्केटिंग आणि प्रोग्रामिंग दोन्ही टीमबरोबर संवाद साधून काम करावं लागतं. दोन्ही टीमकडून नवीन कार्यक्रमाबद्दल किंवा मग चालू असलेल्या शोमधील हाय पॉइंटबद्दलचं ब्रीफ ओएपी टीमला दिलं जातं. सांघिक चर्चेतून कुठल्या गोष्टी प्रमोट झाल्या पाहिजेत, त्या कशा पद्धतीनं प्रमोट केल्या पाहिजेत याचा विचार केला जातो. प्रत्येक चॅनेलची स्वतःची अशी एक आयडेंटीटी, एक बाज असतो. त्याचा विचार करून कल्पना विस्तार केला जाणं अपेक्षित असतं. उदाहरणार्थ, सब टीव्हीचं प्रमोशन नेहमी स्लाईस ऑफ लाईफ आणि विनोदाची झालर असलेलं असतं. तर स्टार टीव्हीचं  ड्रामाकडे झुकणारं आणि चकाचक!

मार्केटिंग टीम त्यांच्या होर्डींग्ज, वर्तमानपत्रातील जाहिरातीतून,  ऑन ग्राउंड इव्हेंटमधून ज्या पद्धतीनं प्रमोट करणार आहे, त्याला सपोर्ट देणारं ऑन एअर कॅम्पेन OAP प्रोड्यूसरकडून अपेक्षित असतं. जेणेकरून कॅम्पेन अधिक प्रभावी ठरेल. मुख्यतः दोन प्रकारची प्रमोशन्स असतात – एक ब्रँड प्रमोशन आणि दुसरं प्रोग्रामिंग प्रमोशन. जेव्हा संपूर्ण चॅनेल ऑन एयर प्रमोट करण्याची वेळ येते त्यावेळी OAP  टीमला मार्केटिंग टीमकडून ब्रीफ येतं. ज्याला 'चॅनेल ब्रँडींग' म्हणतात आणि यासाठी निर्माण केलेल्या जाहिरातींना 'ब्रँड फिल्म' म्हटलं जातं. उदाहरणार्थ, सेट मॅक्सचं 'दिवाना बना दे' ब्रँड कॅम्पेन,  सब टीव्हीचं 'असली मजा सब के साथ आता है', झी म्युझीकचं 'सिनेमा सिनेमा' वगैरे.

जेव्हा एखादा प्रोग्राम प्रमोट करायचा असतो तेव्हा प्रोग्रामिंग टीम OAP टीमला ब्रीफ देते. ब्रीफनुसार OAP टीम वेगवेगळ्या कल्पना तयार करते. साधारणतः तीन प्रकारे टीव्हीवर जाहिरात केली जाते. पहिला प्रकार 'शूट प्रोमो', ज्यामध्ये कार्यक्रमातील पात्रांना घेऊन तीस सेकंद ते एक मिनिटाचा प्रभावी जाहिरातपट शूट केला जातो. दुसरा प्रकार विशिष्ट सिरिअल किंवा शो शूट केला जातो तेव्हा त्याचं काही फुटेज प्रोमो टीमला पाठवलं जातं आणि त्या फुटेजचा वापर करून जी जाहिरात बनवली जाते त्याला 'फुटेज प्रोमो' म्हणतात. तिसरा प्रकार असतो 'ग्राफिकल प्रोमो' ज्यामध्ये ॲनिमेशन ग्राफिक्सचा वापर करून प्रेक्षकांना तो कार्यक्रम कोणता त्याचं नाव ... तो कोणत्या तारखेला, कोणत्या वारी आणि किती वाजता येणार ज्याला शब्द वापरला जातो (DATE, DAY, TIME) सांगितलं जातं. जगातल्या सगळ्या प्रमोशनवाल्यांना बेसिकली हीच एक गोष्ट प्रमोट करायची असते. जितक्या प्रभावीरित्या हे होईल तितके जास्त प्रेक्षक तो कार्यक्रम पहायला येतील हाच एक मुद्दा असतो. कार्यक्रमासाठी प्रेक्षकांना आणायचं हे काम मार्केटिंग आणि वाल्यांचं असतं आणि एकदा कार्यक्रमाला लोक आले की त्यांना धरून ठेवण्याचं काम त्या कार्यक्रमाच्या कंटेटचं म्हणजे प्रोग्रामिंगवाल्यांचं असतं.

ऑन एअर कॅम्पेनसाठी प्रायमरी आणि सेकंडरी असे दोन प्रमोशनल एलिमेंटस वापरली जातात. प्रायमरी एलिमेंटमध्ये प्रोमो क्रिएटीव असते ज्याच्या शेवटी कार्यक्रमाच्या बरोबर चॅनेल लोगो येणं अनिवार्य असतं. जरी प्रोमो त्याच चॅनेलवर चालणार असला तरी अंतिम निवेदनामध्ये( ) चॅनेलचं नाव घेतलं जातं, याला कारण म्हणजे आपल्याकडे टीव्ही पाहण्याबरोबर ऐकलासुद्धा जातो.

सेकंडरी एलिमेंटमध्ये endcard म्हणजे तारीख, वार, वेळ सांगणारी ग्राफिकल प्लेट असते. ॲस्टन (Aston) म्हणजे व्हिडीओवर येणारी बारीक आडवी पट्टी जी साधारण दहा पंधरा सेकंदासाठी येते आणि गायब होते, व्हिडीओ ॲस्टन (video aston) या मध्ये आडव्या पट्टीवर एक छोटी विंडो करून त्यात कार्यक्रमाचं फुटेज टाकलं जातं. बग( bug) टीव्ही स्क्रीनच्या डाव्या, उजव्या, खालच्या, वरच्या कुठल्यातरी एका कोपऱ्यात अचानक दिसून येणारं ग्राफिकल एलिमेंट ज्यामध्येसुद्धा कार्यक्रमाचं इन्व्हाईट असतं. Disrupter - यात चालू स्क्रीनवर डिस्टर्ब करणारं ग्राफिकल एलिमेंट येतं आणि प्रेक्षकांची माहिती देतं. सेकंडरी एलिमेंटमध्ये साउंड वापरला जात नाही. या एलिमेंटसचा उद्देश एकच असतो की पाहणाऱ्या जास्तीत जास्त प्रेक्षकांना कार्यक्रमाची आठवण देत रहावी. कायदा तिथे पळवाट,एका तासात ठराविक वेळेपेक्षा जास्त जाहिरात करता येऊ शकत नाही त्यावर बंदी आहे. त्यामुळे प्रसारणाच्या या नियमांतून वाट काढण्यासाठी सेकंडरी एलिमेंटसचा जन्म झालेला आहे. सेकंडरी एलिमेंटस साधारण दहा ते वीस सेकंदाचे असतात. टिकर किंवा ॲस्टन बँडवर टेक्स्ट (आडवीपट्टी) मेसेज लिहिला जातो त्याला सुपर असे म्हणतात. कोणतंही सुपर प्रेक्षकांना वाचायला

साधारण दोन सेकंद लागतात, त्यामुळे तितका वेळ ते डोळ्यासमोर रहावेत अशी व्यवस्था केली जाते. क्रिएटीवमध्ये वापरला जाणारा फॉन्ट जितका चांगला दिसणं महत्वाचं आहे, तितकाच तो वाचनसुलभ असणं महत्वाचं आहे. प्रमोशनसाठीच्या जाहिराती जितक्या लहान तितक्या जास्त प्रभावी समजल्या जातात. त्याचं महत्वाचं एक कारण म्हणजे त्याला मिळणारं जास्तीत जास्त रोटेशन. On air promotion चा नियमच आहे 'जितनी बार दिखेगा, उतना ज्यादा बिकेगा'.

उत्तम OAP टीम तीच मानली जाते, ज्या टीममध्ये उत्तम संकल्पना मांडणारा लिहिणारा, शूट करणारा, आणि उत्तम एडीट आणि ग्राफिक्स सेन्स असणारा प्रोड्यूसर आहे. ही तिन्ही कौशल्यं एकाच माणसात असली तर उत्तमच, पण तसं नसेल तर टीममध्ये योग्य समतोल हवा.

प्रमोशनमध्ये what पेक्षा how महत्वाचा, म्हणजे 'काय म्हणायचं' पेक्षा, 'कसं म्हणायचं ' जास्त महत्वाचं असतं. टीव्हीमध्ये बऱ्याच वेळेला गोष्टी त्याच त्या असतात. प्रोमोचं कौशल्य असतं ते त्या गोष्टीच्या नवनवीन मांडणीत. एकाच गोष्टीकडे अनेकानेक कोनातून पाहता येतं आणि चांगला प्रोमो प्रोड्युसर तोच ठरतो जो गोष्टीकडे जास्तीत जास्त कोनामधून पाहतो आणि एक कोन निवडतो. मुव्हीज किंवा कार्टून चॅनेलमध्ये तोच चित्रपट किंवा कार्टून शो त्याच्या बदललेल्या वेळेनुसार प्रमोट करायचा असतो. अशा वेळी जुनाच प्रोमो काढून नवी DDT स्लेट लावणे हाडाचा प्रोमो प्रोड्युसर टाळतो. तो त्याच गोष्टीला दरवेळी नवनवीन पद्धतीनं सांगत राहतो. उदाहरणार्थ, 'पकडम पकडाई' नावाचा एक धमाल शो आहे. त्याच्या प्रोमो प्रोड्यूसरनं एकदा एकूण एक एपिसोडमधले रडण्याचे शॉट उचलून त्याच्याखाली 'कभी ख़ुशी कभी गम' टाईप्स फुल ड्रामॅटिक संगीत लावलं आणि 'ये ख़ुशी के आंसू है ..पकडम पकडाई फिर एक बार आ रहा है' असा vo वापरला होता. झी सिनेमावर बाँडपट महोत्सव होता तेव्हा कौशिक बासू नावाच्या प्रोड्युसरनं बाँड VS बाँड या थीमवर प्रमोशन केलं होतं. म्हणजे फुटेजच्या मदतीनं पिअर्स ब्रॉसननचा बाँड आणि डॅनिएल क्रेगचा बाँड यांच्यात झालेल्या धमाकेदार स्पर्धेचा आभास निर्माण केला होता. या प्रोमोला बेस्ट प्रोमोचं अवॉर्डदेखील मिळालं होतं. प्रेक्षकांच्या तोंडावर 'हे प्रमोशन आहे' असं जे प्रमोशन सांगत नाही तेच उत्तम प्रमोशन समजलं जातं. पण हल्लीच्या काळात डायरेक्ट प्रमोशनवर जास्त भार दिला जातो.

प्रोमो प्रोड्युसरचा खरा ताण कॅम्पेन लिहिण्याचा नसतोच. कसोटी असते तुमचं कॅम्पेन तमाम वरिष्ठांकडून (बिजनेस हेड) मंजूर करून घेण्याची. बऱ्याच वेळेला चांगल्या चांगल्या कल्पना या वेगवेगळ्या वरिष्ठांच्या वेगवेगळ्या विचारांच्या गदारोळात धारातीर्थी पडतात. त्यामुळे हताश न होता पुन्हा पुन्हा कॅम्पेन मंजूर होईपर्यंत काम करत राहण्याची चिकाटी असावीच लागते. सर्जनशीलतेसाठी ही प्रक्रिया जरुरी आहे पण बऱ्याच वेळेला प्रोड्युसर कॅम्पेनसाठी काय हवं हे पाहण्यापेक्षा वरिष्ठांना

काय पाहिजे याचा विचार जास्त करू लागतो. नवीन काही करण्यापेक्षा जे केलंय ते विकण्याकडे कौशल्यं जास्त वापरली जातात. थिसीस, अँटी थिसीस आणि सिंथेसिसची विचारप्रक्रिया वापरली जातच नाही. अनमोल धर्माधिकारी नावाचा प्रोमो प्रोड्युसर मित्र हेगेलच्या या थेअरीचं खूप सोपं उदाहरण देतो. ते असं की, दोन मित्र गाडीवर चालले आहेत. एक मित्र दुसऱ्या मित्राला म्हणतो 'ब्रो, तू गाडी अगदीच माझ्या आजीसारखी चालवतोस.' हे थिसीस, त्यावर चालवणारा मित्र म्हणतो 'काहीही हं ! तुझ्या आजीला कुठे गाडी चालवता येते?' हे म्हणजे मांडलेल्या थिसीसला खोडणं म्हणजे अँटी थिसीस. आणि त्यावर पहिला मित्र उत्तरतो 'exactly! म्हणून तर तसं म्हणालो ना!' हा झाला सिंथेसिस.

तुम्हाला काय प्रमोट करायचं आहे हे नेमकं ठरलं की ते कसं करायचं ते ठरवता येतं. पण हल्लीच्या प्रमोशनमध्ये तो नेमकेपणा फार कमी वेळेला दिसतो. रेटिंगबेस मामला असल्यानं आठवड्यागणिक ब्रीफ चेंज होतं. चुकण्याची रिस्क कुणालाच नको आहे. त्यामुळे मग idea must be funny, edgy, slick असं गुळगुळीत सांगत राहतात. अर्ध्या, कच्च्यापक्क्या सांगण्यातूनच प्रोड्युसरनंच ब्रीफ शोधायचं आणि कॅम्पेनच्या कल्पना मांडत रहायच्या. 'मजा नही आया' 'कुछ अलग चाहिये' अशा फेऱ्यातून दमत रहायचं. शूटची डेट फायनल असते. प्रोमो कधी on air जाणार हे फायनल असतं. फायनल नसते ती फक्त प्रमोशनसाठीची आयडिया...

त्यामुळे 'पोस्ट पे देख लेंगे' नावाचा रोग वाढू लागला आहे. बऱ्याचदा शूटींग प्रोमोजसुद्धा एडिट टेबलवर बनवले जातात. स्क्रिप्ट्सचं टायमिंग न करता लिहिलं जातं. तीस सेकंदाचं क्रिएटीव लागणार आहे माहीत असताना, एक एक मिनिटाच्या स्क्रिप्ट्स शूट केल्या जातात. मग त्याचे तीस, वीस, दहा सेकंद कट डाउन केले जातात. अशा पद्धतीनं शूटींग केल्यानं शिफ्ट वाढतात. सेफ्टी सेफ्टी म्हणून भरपूर शूट केलं जातं. सय्यद उस्मानअली नावाचे एक खूप सिनिअर प्रोमो प्रोड्युसर आहेत. ते या सगळ्याचं कारण डिजिटल मानतात. काही अंशी ते खरंसुद्धा आहे. सुरुवातीच्या काळात आम्हाला कॅन मिळायचे. दोन कॅन मिळाले म्हणजे प्रोड्युसरला माहीत असायचं त्याला सोळा मिनिटांचंच फुटेज शूट करता येणार आहे. त्यामुळे त्याचं प्री प्रोडक्शन दक्षपणे झालेलं असायचं. उस्मानअलीची खासियत ही होती की ते त्यांच्या प्रोमोत जर बारा शॉट जाणार असतील, तर ते फक्त बारा शॉट शूट करत. सेफ्टीसाठी दोन एक्स्ट्रा शॉट्स घेताय म्हणजे 'तुमको नही मालूम तुम क्या कर रहे हो' असं ते म्हणायचे. मी जितक्यांदा त्यांच्याबरोबर काम केलं तितक्या वेळी शूटींग्ज अगदी शिफ्टच्या आत संपलेली. पण हल्ली प्रोमोच्या शिफ्ट वाढणं खूप कॉमन झालेलं आहे.

कलर्स मराठी वाहिनीचे OAP हेड राहुल सलगर म्हणतात, " पूर्वी रिजनल चॅनेलला फुटेज बेस कॅम्पेनच करावं लागत असे. पण हळू हळू प्रेक्षक वाढला. बिजनेस वाढला. त्यामुळे त्यांनासुद्धा उत्तम शूटींग बजेट्स मिळतात आणि त्यामुळे मराठी वाहिन्याचे प्रोमो हिंदीच्या तोडीस तोड होतात.''

अर्थात सगळीकडच्यासारखा इथेसुद्धा ब्रीफचा वाढता गोंधळ आहे तो आहेच. त्यामुळे आम्ही एक कॅम्पेनसाठी तीस स्क्रिप्ट्स लिहिल्या, चाळीस लिहिल्या अशा चर्चा ऐकू येतात. मग वाटून जातं, 'सांगायचं काय' हे माहीत नसलं की मग वेगवेगळ्या पद्धतीचं सांगणं ऐकत जायचं. त्या वेळेचा मूड आणि कॅम्पेन शूट करण्यासाठी असलेला वेळ याची गोळाबेरीज करून जे आलंय, त्यातलं एक निवडायचं अशी पद्धत झाली आहे. अर्थात ती चांगली की वाईट हे ठरवणारे आपण कोण?

प्रेक्षकांच्या हातात रिमोट आणि समोर ढीगभर ऑप्शन्स असं असताना, त्यांना तुमच्या कामानं प्रभावित करून तुमचं निमंत्रण मान्य करायला लावणं महाकठीण आणि हे महाकठीण काम अत्यंत चांगल्या पद्धतीनं करत राहणं सोपं नाही.

जगभरातल्या प्रोमो प्रोड्यूसरची परिस्थिती अशीच असते का? असं विचारल्यावर कार्टून नेटवर्कचे एशिया हेड गिरीश जोशी सांगतात, ''नाही. बाहेरचा प्रोमो प्रोड्युसर वर्षातून फक्त दहा ते बारा प्रोमोज करतो. नेमकं काय करायचं आहे याचं ब्रीफ क्लिअरच मिळतं. फक्त तिकडे त्याला एडिट स्वतःच करावं लागतं. आपल्याकडे प्रोड्युसरला एडिटर मिळतो."

हल्ली प्रोमो प्रोड्युसर सर्विस प्रोवायडर झाला आहे. वर्षभरात एक प्रोमोवाला साधारण तीस ते चाळीस प्रोमोज करतो. हा स्पॉन्सर तो स्पॉन्सर, पावर्ड बायचा लोगो धा पैशे मोठा, सोमवार ते शुक्रवार, उद्या, आज, आत्ता असे व्हर्जन्स तर अगणित आणि त्यासाठी त्याला किती वेळेला बदलाच्या चक्रातून जावं लागत याची गणती न केलेलीच बरी. स्टार प्लस, सोनी टीव्ही सारख्या वेगवेगळ्या चॅनेल्समधून काम करणारे, महाभारत, पोरस यासारखे बिग बजेट प्रोमोज ज्यांनी प्रोड्यूस, डिरेक्ट केलेत असे श्रीनिवास गड्डम यावर म्हणतात,

''बीस साल से उपर हो गया, सौ में से नायंटी नाईन टाईम्स प्रोमो प्रोड्युसर को वक्त, बजट और करेक्ट ब्रीफ नहीं मिलता । उसे मिलती है तो बस डेड लाईन... वो लो और काम पे लग जाव!''

वाचणाऱ्याला वाटेल मग अशा घनगंभीर परिस्थितीत काम कसं करतात OAP वाले? महिन्याला सव्वीस एपिसोड, रविवारी महाएपिसोडच्या प्रेशरखाली वावरणाऱ्या प्रोग्रामिंग टीमकडे, सेल्स टार्गेट अचिव करण्यासाठी अहोरात्र मर मर करणाऱ्या सेल्स टीमकडे, तुटपुंज्या मार्केटिंग बजेटमध्ये चॅनेलच्या प्रमोशनसाठी दिवसरात्र एक करणाऱ्या, टी आर पी रेटिंग पाहिलं की गळून जाणाऱ्या

मार्केटिंग टीमकडे पाहिले की आमच्या सारख्या OAP वाल्यांना वाटतं... यांच्यापेक्षा लाख पटीनं बराय नं आपलं काम ... आरामात करत राहू, 'सोमवार ते शुक्रवार फलाण्या वेळेला फक्त आपल्या बिस्तान्या चॅनेलवर...'

बाकीच्यांना पण यांच्याकडे पाहिल्यावर हीच फिलिंग येत असणार...आपलंच बराय! नाहीतर OAP वाल्यांचं काय खरंय!

# आठवणी, नॉस्टॅल्जिया आणि पूर्ण न झालेल्या शक्यतांचा हुरहुरता कोलाज

- अमोल उदगीरकर


**व**र्तमानकाळ अनिश्चततेनं भरलेला असतो आणि भविष्यकाळ धूसर असतो तेव्हा नॉस्टॅल्जियासारखी दुसरी उबदार गोष्ट नसते. कोरोना नावाच्या एका विषाणूनं सगळं जग गुडघ्यावर आणलेलं असताना आणि लॉकडाऊनमुळे मोठी जनसंख्या घरात अडकून बसलेली असताना याची प्रचिती आली. लोकं ओटीटीला शरण गेलेली असताना त्याचवेळेस लोकं मोठ्या प्रमाणावर त्यांच्या टिनेजमधली गाणी आणि सिनेमे बघायला लागली. ही गाणी आणि सिनेमे ही एक संकटकालीन खिडकी होती अनेकांसाठी.सध्याच्या अस्वस्थ वर्तमानापासून एका उबदार भूतकाळात जाण्याची. असा भूतकाळ जो निश्चित होता, आपल्याला माहीत असणारा होता. ज्यातली वळणं माहीत होती. त्या भूतकाळात तुमच्या आमच्यात असंख्य शक्यता होत्या. त्या शक्यता पुढे जाऊन पूर्ण झाल्या की नाहीत हा वेगळा भाग. पण भूतकाळाचा तो रम्य तुकडा पुन्हा आयुष्यात आला हे खरं. लोकं जी गाणी पुन्हा पुन्हा ऐकत होती त्यात इंडिपॉप गाण्यांचा पण समावेश होता. याच काळात घर सोडून  परक्या शहरातून ,गल्ली बोळातून फिरणारा 'तेरे मेरे साथ जो होता है ' असं म्हणणारा नोमॅड लकी अली पुन्हा आयुष्यात आला. केके नावाच्या गायकाचे मंदिरातल्या गाभ्यात घुमणाऱ्या घनगर्द आवाजासारखे 'पल,ये है प्यार के पल' हे सूर पुन्हा पुन्हा ऐकू लागले. त्याचवेळेस लक्षात आलं की 'ये दुरिया' सारखं अफाट गाणारा गायक मोहित चौहान तेव्हापण 'डुबा डुबा रहता हूँ' गात होता. अनामिका, सुनीता राव, इला अरुण, शान, कुणाल गांजावाला आणि कित्येक आयुष्य सुंदर बनवणारे लोक आयुष्यात वापस आले. सक्तीच्या लॉकडाऊनच्या काळ्या ढगाला असणारी ही रुपेरी किनार. या लेखाच्या निमित्तानं इंडिपॉप या फिनॉमेनाचा, त्याकाळातल्या काही गायकांचा, खास त्या काळाचं अपत्य असणाऱ्या व्हिडीओ अल्बम्सचा घेतलेला हा आढावा.

आपण ऑफिसमध्ये आहोत. न आवडणारं कुठलं तरी (ज्या कामानं जगात घंटा फरक पडणार नाहीये, हे आतून फक्त आपल्यालाच माहीत असतं) काम करत. बाहेर पाऊस पडतोय. आत आपल्या मनात वेगळाच पाऊस पडतोय. आपण आयुष्यात स्वतःशी काय काय, कसली कसली भारी प्रॉमिसेस

केली होती आणि आता आपण आयुष्यात काय करतोय? साला व्यर्थ आहे सगळं. ऑफिसच्या कंप्युटरवर यूट्यूब चालूच आहे.प्लेलिस्टवरपण नेमकी दर्दभरी गाणी चालू आहेत. पाऊस उदासवाणा गळक्या नळासारखा गळतच आहे. तितक्यात कानात घुसवलेल्या हेडफोनमध्ये 'जाने क्या ढुंढता है ये मेरा दिल' गाणं घुमायला लागतं. गाण्यात ऐकू येणाऱ्या त्या काहीशा खरखरीत आणि किंचित मिठाच्या कणाइतक्या बेसूर आवाजात कसली तरी जादू आहे. त्या आवाजामुळे बाहेरचा रिपरिप पाऊस आणि उदास आणि ढगाळ वातावरणपण एकदम सुंदर वाटायला लागतं. तितक्यात मित्राचा फोन येतो,"हॅपी अवरमध्ये कलिंगाला भेटतोयस का?" एका सुंदर गाण्यात इतकं जग बदलवण्याचं सामर्थ्य असतं? असं उदासवाण जग क्षणार्धात बदलवणारा आवाज म्हणजे लकी अलीचा आवाज. दुःखाचा,प्रेमाचा, काहीतरी हातातून निसटून जात आहे या वेदनेचा आवाज म्हणजे लकी. लकी अली त्याच्या टीनएजमध्ये पक्का ड्रगिस्ट-चरसी होता. त्याला व्यसनातून बाहेर काढण्यासाठी त्याच्या बापाला, महान कलाकार असणाऱ्या मेहमूदला शेकडो सायास करावे लागले होते. 'दुश्मन दुनिया का' नावाचा सिनेमापण (ज्यात अनु मलिकची काही अमेझिंग गाणी होती आणि शाहरुख-सलमान पहिल्यांदाच एकमेकांच्या समोर आले होते.) पोराच्या व्यसनाधीनतेवर मेहमूदनं काढला होता. नंतर लकी अली व्यसनाधीनतेतून पूर्ण बाहेर पडला. इतका की तो सिगरेट किंवा मद्याला स्पर्श पण करत नाही. पण ती नशा त्याच्या आवाजात कायमचं वास्तव्य करून गेली. साल १९९६. केबल टीव्ही भारतात नुकताच येऊ घातला होता. सोनी टीव्हीवर ओळीनं 'आय ड्रीम ऑफ जेनी' आणि 'थ्री स्टुजेस' हे अमेझिंग विदेशी प्रोग्रॅम लागायचे. ते प्रोग्रॅम भारी होतेच पण ते बघण्याचं अजून एक आकर्षण होतं. त्या प्रोग्रॅमच्या दरम्यान लकी अलीच्या 'सुनो' अल्बममधलं 'ओ सनम' हे out of the world अप्रतिम गाणं ऐकायला मिळायचं. अल्बमचे व्हिडीओ बनण्याचा तो काळ. गाण्यातले ते ईजिप्शियन पिरॅमिड आणि फक्त निळे डोळे दिसणारी सुंदरी जितकी देखणी होती तितकंच हे गाणं देखणं होत. हे गाणं जेव्हा जेव्हा ऐकू येतं तेव्हा मी हातातली सगळी कामं सोडून गाणं ऐकतो. माझ्यासारखे अजून शेकडो लोक असतील. मग 'सिफर' अल्बम लूपवर ऐकण्याचे दिवस आले. मग लकी अलीची भेट व्हायला थोडा गॅप पडला.

एक राकेश रोशन नावाच्या पडेल नटाचा आणि बऱ्यापैकी दिग्दर्शकाचा सिनेमा आला. त्यात त्याचाच ह्रितिक नावाचा पोरगा होता. त्याच्या हाताला सहा बोटं होती म्हणे. त्या नवख्या पोराच्या सिनेमात राजेश रोशननं लकीकडून काही गाणी गाऊन घेतली. राजेश रोशनला संगीत दिग्दर्शक म्हणून पहिला ब्रेक लकी अलीच्या बापानं, मेहमूदनंच 'कुंवारा बाप'मध्ये दिला होता. 'कहो ना प्यार है' रिलीज

झाला, सुपर-डुपर हिट झाला. ह्रितिक नावाच्या सुपरस्टारच्या उदयात राकेश रोशन आणि राजेश रोशन इतकाच लकी अलीचा हात होता.




'ए मेरे दिल तू गाये जा' आणि 'क्यू चलती है पवन' या दोन गाण्यात लकी अलीचा काय सूर लागला होता! लकी अलीचा ज्या दिवशी सूर लागतो त्या दिवशी त्याला तोड नसते. 'गोरी तेरी आँखे कहे' ह्या गाण्यात तो कविता कृष्णमूर्तींच्या तोडीस तोड लागलाय. 'तमाशा' सिनेमा बघून झाल्यावर अनेकजणांनी नोकऱ्या सोडून वेगळं करियर चोखाळलं होतं म्हणे. त्याला इम्तियाज आणि रणबीर इतकंच लकी अलीचं 'सफरनामा' हे अमेझिंग गाणंपण कारणीभूत असावं. 'सूर' हा सिनेमा दिग्दर्शकापेक्षा संगीत दिग्दर्शक एम.एम. क्रीम आणि गायक लकी अलीचा जास्त आहे. 'आ भी जा', 'जाने क्या ढुंढता है ये मेरा दिल' आणि इतर गाणी म्हणजे नोटबंदीच्या काळात क्वचितच एटीएममधून बाहेर पडणारी दोनशेची नोट. काय एकाहून एक गाणी आहेत सिनेमातली!

आमच्या गावाबाहेर एक डोह होता. अमावास्येला म्हणे तिथं भोवरा तयार व्हायचा. त्या भोवऱ्यात जगातली प्रत्येक गोष्ट गायब करण्याची ताकद होत. लकी अलीचा आवाज म्हणजे तो भोवरा. त्या भोवऱ्यात आमचं दुःख, निराशा, खंत,खिन्नता काही मिनिटापुरती का होईना गायब होते. कबीरनं लता मंगेशकर यांच्यावर तयार केलेल्या लघुपटात सज्जाद लता मंगेशकरचं कौतुक करताना एक सुंदर वाक्य बोलून जातातः "लताबाई के आवाज की तारीफ मै क्या करूँ? उनके आवाज की तारीफ तो समुंदर की मछलियां भी करती है...." (संदर्भ -अंबरीश मिश्र यांचं पुस्तक). नुकताच लकी अलीचा गोव्यातला 'ओ सनम ' हे गाणं तरुण प्रेक्षकांसमोर तल्लीन होऊन गाणारा व्हिडीओ वायरल झाला आणि त्या वय

झालेल्या, सूर पहिल्यासारखा न लागणाऱ्या लकी अलीला बघून काळजात लक्क हललं काहीतरी. लकी अली म्हातारा कसा होऊ शकतो ? कुछ भी!

परभणीला दरवर्षी उरूस भरायचा. म्हणजे अजूनही भरतो, पण माझ्या तरी भूतकाळाचा भाग आहे. हा भाग तिथं मिळणाऱ्या रबडी-मालपुवा, जलेबी, आकाशपाळणा, अनेक छोट्या मोठ्या चीजवस्तू, हिरालाल नामक स्मार्ट गाढवाचे शो, तिथल्या मित्राच्या ठेल्यावर बसून कुणाचीतरी बघितलेली वाट अशा अनेक असंख्य गोष्टींनी लखलखलेला आहे . तिथं दहा रुपयात एक माईकसारखा दिसणारा प्लास्टिकचा भोंगा मिळायचा. त्यात तोंड घालून गाणं म्हणलं की आवाज घुमायचा आणि मग गारगार वाटायचं. अशाच एका उरुसातल्या उनाड धूळभरल्या दुपारी मी 'युफोरिया' ऐकला होता. तो भोंगा विकणारा सतरा अठरा वर्षाचा पोरगा तल्लीन होऊन युफोरियाचं 'मायेरी ' गाणं म्हणत होता.

त्याच गाण्यातल्या

अब क्या कहूं

का से कहूं ओ मायेरी...

या ओळी त्यानं इतक्या तन्मयतेनं म्हटल्या की, मी त्याच्याजवळ जाऊन तो भोंगा विकत घेतला आणि त्याला पुन्हा ते गाणं म्हणण्याची शिफारस केली, पण मला त्यानं क्रूरपणे तोडून टाकलं आणि दुसरीकडे जाऊन उभा राहिला. पण या गाण्यानं आणि त्यातल्या गायकाच्या रखरखीत आवाजानं मला कायमचं झपाटून टाकलं आणि या गाण्याची आणि गायकाची पाळंमुळं शोधण्याची धडपड सुरु झाली. गाणी इंटरनेटवर, एका टिचकीवर सहज उपलब्ध नसण्याचा तो सुंदर काळ होता. एका चॉकलेटच्या जाहिरातीत टॅगलाईन होती− You have to earn it. गाणी 'earn' करण्याचा तो संथ चालणारा काळ. गाणी मिळवण्याचे, शोधण्याचे रिसोर्स बोटावर मोजण्याइतके. मग हक्काचा शर्मा कॅसेट सेंटर (गाणी कॅसेटमध्ये रेकॉर्ड करून देणारा. एका कॅसेटीमध्ये बारा गाणी. एक गाणं तीन रुपये रेट) मदतीला धावून आला. 'मायेरी' गाणं मग आयुष्यात आलं आणि पाठोपाठ हलक्या पावलांनी 'युफोरिया' नावाचा झपाटून टाकणारा सबंधपण.

ए .आर. रहमानला 'रॉकस्टार' च्या रिलीजच्या वेळेला एका पत्रकारानं विचारलं होतं की आपल्या देशात कधी 'रॉकस्टार' का निर्माण झाला नाही. त्याला रहमाननं भारतीय जनतेच्या मनोव्यापाराचं विश्लेषण करणारं उत्तर दिलं होतं. पण 'युफोरिया'ची गाणी ऐकणाऱ्यांसाठी/बघणाऱ्यांसाठी तो बँड

रॉकस्टारच होता. असं विनोदानं म्हणलं जायचं की, शंभर कोटींच्या देशात वेगवान गोलंदाज आणि म्युझिक बँड्स तयार होत नाहीत. गेल्या काही वर्षात पहिला विनोद कालबाह्य झाला, पण दुसरा विनोद अजूनही टिकून आहे. बाजूचा टीचभर पाकिस्तान सातत्यानं अव्वल दर्जाचे म्युझिक बँड्स तयार करत आहे, पण आपल्याकडे दोन तीन अपवाद वगळता याबाबतीत दुष्काळ आहे. 'युफोरिया' या मोजक्या अपवादांपैकी एक. 'धूम' अल्बमनं युफोरियाचा कल्ट तयार होण्याची सुरुवात झाली. मग नंतर 'मायेरी', 'तुम', 'अब ना जा' ,'मेहफुज', 'कभी आ ना तू मेरी गली', 'अलविदा' या गाण्यांनी प्रचंड लोकप्रियता मिळवली.





युफोरियाच्या बहुतेक गाण्यांमध्ये पाश्चात्य वाद्य आणि भारतीय वाद्यांचा मेळ असतो. सगळी गाणी पलाश सेननं कंपोज केली  आणि लिहिली असली तरी हा काही वन मॅन शो नाही. 'युफोरिया' हे एक उत्तम टीमवर्कचं उदाहरण आहे. युफोरियाच्या गाण्यांमध्ये हवंहवंसं दुःख, काहीतरी निसटून जात आहे असलं फिलिंग आहे. या जगाला कुणाच्याही कन्फर्मेशनची गरज नव्हती. ते दुःख स्वतःमध्येच परिपूर्ण होतं. 'देवदास कॉम्प्लेक्स ' जोजवत राहणाऱ्या जनतेला हवंहवंसं. 'युफोरिया' हा जितका ऐकण्याचा विषय आहे, तितकाच बघण्याचा. याचं कारण संगीत सुश्राव्य असण्यासोबत बघण्यासारखंपण असायला हवं, याची त्यांना असणारी जाणं. युफोरियाच्या गाण्यांचे बहुतेक व्हिडीओ प्रदीप सरकारनं दिग्दर्शित केले आहेत. या गाण्यांच्या व्हिडीओजना स्टोरी असायची. या व्हिडीओमधली पात्रं दुःखी, अपरिपूर्ण, मृगजळाचा

पाठलाग करणारी आणि कन्फ्युज होती. कमाल म्हणजे या 'ऑल मॅन बँड'च्या सगळ्या कथा स्त्रियांभोवती फिरणाऱ्या होत्या. सगळ्या ठिकाणी स्त्रिया केंद्रवर्ती. 'मायेरी' गाण्यात रेल्वेच्या जनरल कंपार्टमेंटमधल्या प्रवासात नायकाला आयुष्यात येऊन न आल्यासारखं करणारी प्रेयसी आठवत आहे. 'पिचक धूम' गाण्यात विदेशी स्थायिक असणारी नायिका वाराणसीच्या घाटावर आपल्या मुळांच्या शोधात फिरत आहे. 'कभी आना तू मेरी गली' गाण्यात नायिकेचं (या गाण्यात चक्क विद्या बालन होती) मनाविरुद्ध लग्न होतंय. 'मेहफुज' गाण्यामध्ये नायिका जगातून गेलेल्या आपल्या प्रियकराला विसरू शकत नाहीये. 'युफोरिया'च्या फार थोड्या गाण्यांना हॅपी एंडिंग आहे. बहुतेक गाण्यांमध्ये दुःख भरून राहिलंय आणि आशादायक शेवट नजरेस पडत नाहीये. 'अब ना जा' गाण्याच्या व्हिडिओमध्ये जुन्या मित्रांच्या रियुनियनमध्ये नायक नायिका पुन्हा भेटतात, तेव्हा आपलाच ऊर भरून येतो. युफोरियाची बहुतेक गाणी शहरी सेन्सिबिलिटीजची आहेत असं म्हटलं जातं, पण आमच्या परभणीसारख्या निमशहरी भागातपण त्यांची गाणी वाजायची म्हणजे हे विधान तितकंसं खरं नसावं. 'युफोरिया ' मध्ये सगळं आलबेल नाही अशी वदंता होती. कागदोपत्री कुणीही कबूल करत नसलं तरी या बँड्सच्या सदस्यांमध्ये मतभेद आणि फाटाफूट होती. त्यातून त्यांनी बरीच वर्ष काही केलं नाही. मध्यंतरी पलाश सेननं 'फिलहाल' सिनेमात काम केलं. यात त्यानं 'ले चले डोलियो में तुम्हे' (अनु मलिक) हे सुंदर गाणंपण म्हटलं, पण मी आणि माझ्यासारखे कित्येक 'युफोरिया' ला मिस करत होतो.

तर आनंदाची गोष्ट अशी की 'युफोरिया' टीमचं पुन्हा रियुनियन होत आहे. युफोरिया त्यांच्या नवीन अल्बमवर काम करत आहेत. 'रॉक ऑन' सिनेमाचं कथानक युफोरिया बँडवरच आधारित आहे, असा एक प्रवाद आहे. पण सिनेमाची हॅपी एंडिंग प्रत्यक्षात उतरण्याची शक्यता आहे. ते पुन्हा जुनी जादू रिक्रिएट करू शकतील का? मला अपेक्षा नाहीत. कारण अपेक्षा आल्या की अपेक्षाभंग आला. नकोच ती रिस्क. माझा एक गावाकडचा मित्र वर्षांतले काही दिवस अस्वस्थ असतो. त्याच्या समोरच राहणारी त्याची 'एक्स' वर्षांतले काही दिवस माहेरी येते तेव्हा तो कावराबावरा होतो आणि कॉर्नरवरच्या पान टपरीवर स्वस्त सिगरेटी फुंकत जास्तीत जास्त वेळ काढतो. तिच्या मुलाला चोरून लांबून न्याहाळतो. आणखी एक ऑफिसमधला सहकारी आठवतो. त्यानं आपल्या मुलीचं नाव आपल्या 'एक्स'वरून ठेवलं होतं. आपल्या 'एक्स'ला जळवण्यासाठी सोशल मीडियावर आपल्या 'आनंदी' आयुष्याचं प्रदर्शन मांडून बसलेला आणखी एक मित्र आठवतो. हे सगळे पुरुष कधी आपल्या 'एक्स' नावाच्या भूतकाळातून बाहेर आलेलेच नाहीत. बायका या 'कॉम्प्लेक्स' असतात असं विधान करता करता, आपण त्यांच्यापेक्षा दहापट 'कॉम्प्लेक्स' बनत चाललो आहोत हे त्यांना कधी आकळतच नाही. समोरच्या बाईला गृहीत धरून आणि तिला खलनायक बनवण्याचा प्रयत्न करता करता आपण हास्यास्पद बनत जातो, हे एक तर त्याला कळत नसावं किंवा कळवून घेण्याची त्याची इच्छा नसावी. भारतीय पुरुष हा 'देवदास सिंड्रोम' मनापासून

एन्जॉय करणारा. दारू पीत किंवा सिगरेट ओढत 'एक्स'च्या नावाचे कढ काढायला त्याला मनापासून आवडतं. ही लोकं आहेत तोपर्यंत 'युफोरिया' ची चिरंतन दुःख सांगणारी ऐकवणारी गाणी अमर आहेत हे नक्की.

सोनू निगम हा ट्रान्सफॉर्मेशनच्या पिढीतल्या लोकांचा गायक आहे. ऐंशीच्या दशकात जन्मलेल्या लोकांनी सानू -उदितला आयुष्यभरासाठी बोकांडी चढवून घेतलं आहे. २००० नंतरच्या पिढीला केके-शान आहेत. मी मागे शाहिद कपूरला सँडविच ऍक्टर असं नाव दिलं होतं. सोनू निगम हा असाच सँडविच गायक आहे. पण कुठल्याही एका पिढीनं त्याला दत्तक घेतलं नसलं तरी तिन्ही पिढ्यांमध्ये त्याच्याबद्दल प्रचंड प्रेम आहे. म्हणजे कुणाचाच नाही पण सगळ्यांचाच आहे असलं विचित्र त्रांगडं. पण मासेसशी (म्हणजे मोठ्या शहरातल्या, ग्रामीण निमशहरी भागातल्या , पिटातल्या प्रेक्षकांशी ) कनेक्ट असणारा तो शेवटचा गायक असावा. असा गायक की एखादं गाणं ऐकलं की पब्लिक उत्स्फूर्तपणे म्हणतं, 'अरे हे तर सोनूचं गाणं'. असं गायकाच्या नावावरून गाणं ओळखलं जातं असा हा शेवटचा गायक. वर्ग ,जात, धर्म, प्रांत यांच्या भिंती भेदून सर्वत्र पोहोचलेला शेवटचा गायक. ट्रान्सफॉर्मेशनमधला गायक असल्यामुळे कॅसेट रेकॉर्ड करून घेतलेल्या पिढीनंपण सोनूच्या आवाजातली गाणी भरून घेतली आहेत आणि स्पॉटिफाय पिढीने पण सोनूची प्लेलिस्ट बनवली आहे. हे भाग्य केके,शान, मोहित चौहान, अरिजित यांच्या नशिबी नाही.




सोनू निगमच्या आवाजात एक जुन्या जगातलं दुःख आहे. ते काही पिढयांना हातातून निसटू द्यायचं नाहीये. ते दुःख चिरंतन आहे. पण त्याच आवाजात एक नव्या जगाचीपण झिंग आहे. ज्यात

आशा आहे आणि पहिल्या प्रेमाचा आनंदपण. भारतीय मासेसला जिंकायचं असेल तर हिरोला ऍक्शन मुव्ही करणं गरजेचं असतं आणि गायकाला sad song म्हणणं आवश्यक असतं. सोनूची सगळ्यात लोकप्रिय तीन गाणी हा नियम सिद्ध करतात. 'अच्छा सिला दिया तूने मेरे प्यार का' हे गाणं ग्रामीण निमशहरी भागात वाजत नाही असा एकही दिवस जात नाही. प्रेमभंगाचं ग्लोरिफिकेशन झालेल्या देशाच्या एका मोठ्या भागानं हे गाणं उराउरी कवटाळून ठेवलं आहे. 'कल हो ना हो' हे गाणं वरवर खूप जीवनविषयक तत्वज्ञान सांगत असलं तरी या गाण्याला उदासवाणी, दुःखाची डूब आहेच. नायकाचा अटळ असणारा मृत्यू सावलीसारखा गाण्यावर आहे. तिसरं म्हणजे नवीन 'अग्निपथ' मधलं 'अभी मुझ में कही' हे गाणं. बहिणीला अनेक वर्षांनी भावाची ओळख पटली आहे आणि ती भावाला कडाडून मिठी मारते. या पार्श्वभूमीवर 'कुछ ऐसी लगन, इस लम्हे में है, ये लम्हा कहा था मेरा' अशी आर्त साद सोनूचा आवाज घालतो तेव्हा मनात सल बाळगणारा माणूस विदीर्ण होतोच. मग सोनूची असंख्य हिट गाणी आहेत, पण ही तीन गाणी म्हणजे कमाल. तिन्ही sad songs.

सोनू हा एकमेव असा गायक असेल जो जवळपास अस्तंगत इंडिपॉपमध्येपण मोठा स्टार होता आणि फिल्म म्युझिकमध्येपण. त्याचबरोबर तो खऱ्या अर्थानं पॅन इंडियन गायकपण आहे. हा गायक बनण्यात त्याच्या 'दिवाना' या इंडिपॉप अल्बमचा मोठा वाटा आहे. 'दिवाना तेरा', 'दिल से दिल तक बात पहुंची'. 'इस कदर प्यार है तुमसे ए सनम' ही गाणी प्रचंड गाजली. अतिशय साधे सरळ शब्द, सहज गुणगुणता येण्यासारख्या मेलोडियस चाली आणि सोनू निगमचा आवाज या घटकांमुळे या गाण्यांना सर्व थरांमध्ये प्रचंड लोकप्रियता मिळाली. त्याचबरोबर गायक हा ‘शो मन’ असतो ही जाणीव रुजवण्यात सोनूच्या 'दिवाना' अल्बमचा मोठा वाटा आहे. देखणं रूप, मुख्य म्हणजे देखण्या रूपाची असलेली जाणीव, शारीरभाषा, आत्मविश्वास हे सोनूला परफेक्ट कॉम्बिनेशन बनवतं. भारतासारख्या देशात रॉकस्टार का बनत नाहीत अशी खंत एकदा रहमानने व्यक्त केली होती. सोनू हा आपला रॉकस्टार बनू शकला असता. तो तसा का बनला नाही याची कारणमीमांसा पुन्हा कधी तरी.

पुराणकाळात राक्षस किंवा एखादा ऋषी खूप कठोर तपस्या करायचा. मग देव प्रसन्न होऊन त्याला वर द्यायचा . मग त्या वरामुळे राक्षस/ऋषी भयानक उन्मत्त व्हायचा आणि लोकांना त्रास द्यायला लागायचा. मग ज्या देवानं वर दिलाय तोच अवतार घ्यायचा आणि त्याला संपवायचा. तुमचा निर्मिकच तुम्हाला नष्ट करू शकतो. सोनूलापण टी सिरीजनेच 'दिवाना' मधून निर्माण केलं आणि त्यांनीच सोनूला संपवलं. ही सोनूच्या आयुष्यातली फिल्मी/पुराणकालीन ट्रॅजेडी.

अनेकदा परीकथेच्या हॅपी एंडिंगनंतर खरा डार्क भाग सुरु होतो. केके नावाच्या परीकथेचंपण असंच झालं. पण हा गडदपणा सोसावा लागतोय त्याच्या गाण्यांवर पोसलेल्या पिढीला. मी काही वर्षांपूर्वी केकेचा एक कॉन्सर्ट अटेंड केला होता. केकेचा परफॉर्मन्स भारी होताच, पण सगळ्यात भारी गोष्ट कुठली होती माहितीये का? एवढी हजारोंची गर्दी असूनपण मला वाटतं होतं की तो फक्त माझ्यासाठी परफॉर्म करतोय. माझ्या मनातलीच गाणी म्हणतोय. नंतर लक्षात आलं की इथं जमलेल्या सगळ्यांनाच तसं वाटतंय. केकेचा त्याच्या फॅन्सशी असा वैयक्तिक कनेक्ट होता.




केके नावाचा कल्ट निर्माण होण्यात 'तड्प तड्प के इस दिल से' आणि 'छोड आये हम वो गलियाँ' पेक्षा जास्त वाटा केकेच्या 'पल' अल्बमचा असावा. केके नावाचा एक गायक आहे आणि तो खूप उत्तम गातो ही ब्रेकिंग न्यूज आमच्या पिढीला कळाली ती 'पल' अल्बममुळे. या ब्रेकिंग न्यूजवर मोहोर उठवली ती केकेने इम्रान हाश्मी आणि पर्यायानं विशेष फिल्मसाठी (मुकेश भट आणि महेश भट) गायलेल्या गाण्यांनी. केकेची गाणी दोन प्रकारच्या प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय होती. पिटातल्या प्रेक्षकांमध्ये आणि हार्मोन्स धडका मारत असणाऱ्या वयोगटातले तरुण. आम्ही दोन्ही वर्गात मोडणारे होतो. २००१ ते २०१० या काळात पिटातले प्रेक्षक असणारे मल्टिप्लेक्समध्ये रेलून सिनेमे बघायला लागले आणि त्याकाळात हार्मोन्स उतू जाणारे आता लग्न करून रिटायरमेंटच्या प्लॅनिंगला लागले. पण केके अजूनही त्यांच्या आयुष्याचा महत्वाचा भाग आहे. केके गेल्यानंतर दुःखाची त्सुनामी आलीये या वर्गांमध्ये.

कलाकाराचं वैयक्तिक आयुष्य मेसी असतं, सतत होणारे mood swings असतात आणि तो मानसिकदृष्ट्या अस्थिर असतो असा एक समज प्रचलित आहे. या अस्थिर वागण्याचं ग्लोरिफिकेशनपण झालंय. केके हा खूप संतुष्ट आणि स्थिर असावा असं वाटायचं. एक शांततेचा तवंग चेहऱ्यावर तरंगत असायचा. त्याला कुठल्याही शिड्या चढून वर जाण्याची घाई नसावी आणि कुठलाही साप आपल्याला गिळेल आणि आपण पुन्हा खालच्या पायरीवर फेकले जाऊ अशी भीतीपण नसावी. त्यानं त्याच्या समकालीन गायकांच्या तुलनेत मोजकीच गाणी का गायली याचं उत्तर त्याच्या या संतुष्ट स्वभावात असावं. तो तसा कधीच सोशल नव्हता. चित्रपटसंगीतातून तो तसा बऱ्यापैकी अडगळीला पडलाच होता. पोटापाण्यासाठी कॉन्सर्ट करायचा-लोकांना गाण्यातून उमेद द्यायचा. पण त्याला जमलं असतं तर कदाचित एका निवांत ठिकाणी जाऊन तो राहिला असता. लोकांपासून-सोशल मीडियापासून दूर. आपलीच गाणी म्हणत. मान्सूननं ज्या दिवशी भारतात प्रवेश केला, त्याचदिवशी केके गेला हा एक दुर्दैवी पण काव्यात्मक योग. हा मान्सून काय काय दाखवणार आहे यावर्षी कुणाला माहीत ?

ती फ्लूट वाजवून शहरातून सगळे उंदीर पळवून लावणाऱ्या फ्लूटवादकाची गोष्ट आपण सगळ्यांनीच वाचली, ऐकलेली असते, पण या परीकथेला एक डार्क शेवट आहे. त्या फ्लूटवादकाला इनाम देण्यास शहरानं नकार दिला. एका झटक्यात उपकार विसरले ते त्याचे. मग वादकानं क्रूर बदला घेतला. एके दिवशी त्यानं फ्लूट वाजवायला सुरुवात केली, पण यावेळेस त्याच्या मागे मंत्रमुग्ध होऊन चालायला लागली शहरातली लहान मुलं. वादक त्या मुलांना आपल्या धूनमागे भुलवून शहराच्या बाहेर निघून गेला. नंतर ती मुलं कधीच कुणाला दिसली नाहीत. केके हा तो फ्लूटवाला (बदल्याची भावना वजा करून ) आहे . तो वाजवत गेला आणि आम्ही मिलेनियल्स त्याच्यामागे मंत्रमुग्ध होऊन चालत गेलो. आमचं भागधेयच होतं ते. आता केकेसोबतच आमच्या पहिल्या पहिल्या प्रेमाच्या आठवणी, प्रेमभंगांच्या आठवणी, मित्रांच्या आठवणी, उदासवाण्या संध्याकाळच्या आठवणी, प्रेरित होण्याच्या आठवणी सगळ्या गायब झाल्या. खरंच  परीकथेच्या हॅपी एंडिंगनंतर त्या गोष्टीचा खरा डार्क भाग सुरु होतो.

मानसशास्त्रात 'पीटर पॅन सिंड्रोम' नावाची संकल्पना आहे. शारीरिक वय वाढलेला पण मनाने वाढण्यास नकार देणारा पुरुष म्हणजे 'पीटर पॅन सिंड्रोम' ग्रस्त पुरुष . अजून एक चांगला शब्द म्हणजे मॅन-चाईल्ड. ऐंशी आणि नव्वदच्या दशकात जन्माला आलेले बहुतेक पुरुष ह्या सिंड्रोमने ग्रस्त असावेत. ह्या सिंड्रोमची काही ठळक लक्षण आहेत. एक म्हणजे त्याला घरातल्या जबाबदाऱ्या नको असतात. घरची कामं करण्यापेक्षा त्याला मित्रांसोबत चकाट्या पिटायला आवडतात किंवा क्रिकेटची मॅच बघायला आवडते. वयाच्या तिशीत पण सुपरहिरो मुव्हीज आणि कार्टून्स त्याला तुफान आवडत असतात. स्ट्रेस किंवा तणावापासून त्याला तोंड देण्यापेक्षा दूर पळण्याची वृत्ती असते. घरातल्या स्त्रिया यांच्यावर कुठल्याही कामासाठी

विसंबून राहू शकत नाहीत. कारण स्वतःची ऐश/मौजमजा ही यांची (खरं तर आमची ) प्राथमिकता असते. एकूणच यांच्या आयुष्यातल्या प्राथमिकता मॅन चाईल्ड नसलेल्या पुरुषांच्या दृष्टीनं गंडलेल्या असतात. महत्वाकांक्षेचा अभाव असतो. ऑफिसमध्ये ओव्हरटाईम करून बॉसचा आवडता बनण्यापेक्षा त्यांना घरी आपल्या छकुल्याकडे लवकर जाण्यात किंवा मित्रांसोबत बारमध्ये घुसण्यात जास्त रस असतो. Emotionally Vulnerable असतात. अजूनही बरीच लक्षणं आहेत. या अशा लोकांचा आवाज म्हणजे मोहित चौहानचा आवाज. ह्याचं सगळ्यात मोठं कारण म्हणजे त्याने रणबीर कपूरच्या अनेक उत्तम गाण्यांना आवाज दिला आहे. रणबीरची बहुतेक पात्रं बहुतेक मॅन-चाईल्ड स्वरूपाची आहेत, पण रणबीरपुरतंच मोहितला मर्यादित ठेवण्यात अर्थ नाही. 'मै, मेरी पत्नी और वो' या चंदन अरोराच्या अफाट सिनेमातलं गाणं केकेच्या पात्राच्या तोंडी आहे. हे कसं आहे ते पात्रं? एकटं, मनमुराद आयुष्य जगणारं. 'ये जवानी है दिवानी ' मधला रणबीरचा नायक कसा आहे? कुठल्याही बंधनात अडकायला नकार देणारा. पायात बेड्या अडकवून घ्यायला ठाम नकार देणारा. हे गाणं मोहित चौहाननं त्याच्या अल्बमसाठी केलेलं होतं, जे नंतर या सिनेमात आलं. या सिनेमातलं 'शामे मलंग सी ,राते सुरुंग सी' हे गाणं मोहितशिवाय अजून कुणीही गाऊ शकत नाही .'कमीने' मधला शाहिद लग्नाला एकदमच तयार नाहीये, पण विशालच्या 'पहली बार मोहोब्बत की है' या गाण्यात मोहितचा आवाज सुटेबल वाटायला लागतो. 'रॉकस्टार ' मधली 'कलाकार बनण्यासाठी भग्न व्हावं लागतं ' ही फिलॉसॉफी मानणाऱ्या रणबीरच्या जनार्दन जख्खरच्या तोंडी बहुतेक गाणी मोहितचीच आहेत. 'कुन फाया कुन' हे ट्रान्सला नेणारं गाणं हे मोहितचंच. घराबाहेर काढलेल्या आणि कलावंताचं जीवघेणं एकाकीपण घेऊन जगणाऱ्या जॉर्डन उर्फ जनार्दन जख्खरच्या तोंडी येणारी 'साड्डा हक, एथे रख' आणि 'तुम हो' ही गाणी मोहितचीच. 'लैला मजनू'ची कथा काश्मीरच्या पार्श्वभूमीवर हीच टेम्प्टिंग आयडिया आहे. 'हाफिज हाफिज' या गाण्यात मजनूचं भ्रमिष्ट होत जाणं एकदम अंगावर येणारं दाखवलं आहे. कसली तरी झिंग आहे गाण्यात. मोहितच्या व्यावसायिक आयुष्यात हे गाणं हा हायपॉईंट आहे. 'लव्ह आज कल' मधला सैफचा नायक, प्रेमाला खेळ वगैरे मानत असत, पण आयुष्याच्या एका टप्प्यावर झटका बसल्यावर तो गंभीर होतो आणि प्रेमाची 'अहमियत' त्याला कळायला लागते आणि पडद्यावर प्रीतमच्या 'ये दुरियां' या अप्रतिम आतडं सोलवटून टाकणाऱ्या कंपोझिशनला मोहितचा आवाज फिट बसतो. सांख्यिकीय निकषांवर मोहितची गाणी बाकीच्या गायकांपेक्षा कमी असतील पण सोन्याच्या खाणी दगडांच्या खाणीपेक्षा कमीच असतात की मोहितच्या सांगीतिक कारकिर्दीचा गाळीव अर्क?

माझा एक मित्र स्पायडरमॅनचा फॅन आहे. त्याला बेसिनच्या वाहत्या पाण्याखाली हात ठेवून, पाणी आपल्या हातातूनच बाहेर पडत आहे अशी स्वतःची समजूत करून घ्यायला आवडतं. स्पायडरमॅनच्या हातातून जाळं बाहेर पडतं तसं. एका मित्रानं नवीन फ्लॅटमध्ये पार्किंग घेण्यापेक्षा त्याच पैशात घरात

बार बनवून घेण्यास प्राधान्य दिलं. अजून एकजण त्याच्या पोराच्या रिझल्टपेक्षा पुढच्या बॅटमॅन सिनेमाच्या रिलीजची जास्त वाट बघत आहे. आज सकाळीच बायकोनं मला खड्डू 'टेस्ट' करताना 'रंगेहाथ' पकडलं. आमच्या ना धड तरुण,ना प्रौढ, ना वृद्ध अशा अधांतरात लटकलेल्या आणि मनातलं मुलं जिवंत असणाऱ्या पिढीचा आवाज म्हणजे मोहित चौहानचा आवाज. मोहित चौहानला एका अख्ख्या 'मॅन-चाईल्ड' पिढीकडून मानाचा मुजरा.




नव्वदच्या दशकातील इंडिपॉप यावर बरंच बोललं जातं, पण त्याचे गाण्यांचे व्हिडीओ हा एक न लिहिला आणि बोलला गेलेला विषय आहे. त्यावेळेस व्हिडीओला कथानक असायचं किंवा कथानक नसलं तरी ती गाणी फार सुंदर चित्रित केलेली होती. त्या काळी प्रदीप सरकार हा सध्याचा आघाडीचा दिग्दर्शक फार छान गाणं चित्रित करायचा. त्याची एक विशिष्ट शैली होती. 'युफोरिया'ची बहुतेक गाणी त्यानं शूट केलेली होती. 'कभी आना तू मेरी गली ' (यात विद्या बालन होती) या गाण्यात एका मुलीचं लग्न ठरलेलं असतं, पण तिला तिच्याच गल्लीतला 'विदूषक' म्हणून ओळखला जाणारा संगीतकार आवडत असतो. त्या गाण्यात दोघांचं प्रेम फार सुंदर दाखवलेलं होतं. 'मायेरी' हे गाणंपण अप्रतिम शॉट-टेकिंगचं उदाहरण आहे. केकेच्या 'पल' अल्बममधलं 'आपकी दुआ है प्यार हुआ' भन्नाट गाणं आठवतं का? प्रेमात पडल्याची नवलाईची भावना त्या गाण्यात जबर दाखवली होती. 'युफोरियाचंच 'अब ना जा ' गाणं सरकारचं होतं का ते कन्फर्म आठवत नाही. पण जुन्या मित्रांच्या गेटटुगेदरमध्ये जुनं प्रेम अनपेक्षितपणे पुन्हा भेटणं, ही सध्याच्या पिढीला हुरहूर लावणारी भावना त्या गाण्यात तरलपणे चित्रित केली आहे. हरिहरनच्या 'काश' अल्बममधल्या 'मैकदे बंद करे' गाणं अप्रतिम चित्रित केलेलं आहे. बघितलं नसेल तर आवर्जून युट्युबवर शोधून बघा. जिमी शेरगील तेव्हा अनेक अल्बमच्या व्हिडीओमध्ये असायचा. जोजोच्या 'वो कौन थी ' गाण्यात तो होता. जगजीतच्या एका दाम्पत्याच्या आयुष्यातला एक दिवस दाखवणाऱ्या 'शाम से आंख में नमी थी' या गाण्यात तो कहर दिसलाय. उस्ताद सुलतान खान यांच्या अल्बममधली दोन

गाणी मला चित्रीकरणासाठी फार आवडतात. पहिलं म्हणजे 'पिया बसंती रे' हे गाणं. एका अतिरेक्याची आणि सर्वसामान्य मुलीची प्रेमकथा दाखवणाऱ्या या गाण्यात धबधब्याजवळ पहिला शॉट आहे. तो बघूनच डोळे निवतात. हे गाणं पण बहुतेक प्रदीप सरकारनंच केलं होतं. दुसरं म्हणजे 'काटे ना ही रात मोरी' हे गाणं. दुरावलेला नवरा आणि खुणावणारं नवीन प्रेम यांच्यात अडकलेल्या एका मध्यमवयीन बाईच्या द्विधा मनस्थितीचं चित्रण फार सुंदर केलं होतं. 'परी हूं मैं' हे गाणंपण हिट होतं. अजूनही दांडियामध्ये आणि अनेक ठिकाणी ते वाजतं. पंकज उदासच्या 'और अहिस्ता' गाण्याचा व्हिडीओ ओ हेन्रीच्या शॉर्ट स्टोरीवर (ज्यावर रितुपर्ण घोषचा 'रेनकोट' सिनेमापण आधारित आहे) पण बराचसा ट्विस्ट करून बनवला आहे.




लकी अलीच्या गाण्यांची निर्मितीमूल्यं चकचकाटी आणि श्रीमंत होती. 'तेरे मेरे साथ जो होता है' गाण्याचा व्हिडीओ बघा. त्यावेळेस इंडिपॉप गाण्यांचे अल्बम बनवणारे बरेच लोक इंडस्ट्रीमध्ये सेटल झाले. पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलं. इंडिपॉपच लयाला गेलं, पण त्याकाळातले गाण्यांचे व्हिडीओ दीर्घकाळ लक्षात राहतील हे नक्की.

माझा सगळ्यात आवडता व्हिडीओ अल्बम एका फारशा न गाजलेल्या गाण्याचा आहे. तो फोटोग्राफर आहे. त्याचा एक चांगला स्वतःचा स्टुडिओपण आहे. धंदा बराच चांगला चालू असावा. कारण सतत लोक फोटो काढायला येत असतात. स्टुडिओची भिंत त्याच्या उत्कृष्ट फोटोजनी भरलेली आहे. फक्त मध्यभागी असणारी एक फ्रेम रिकामी आहे. हे सगळं असूनपण तो फोटोग्राफर एकटा असावा. त्याच्या चेहऱ्यावरून आणि बॉडी लँग्वेजवरून तरी तसंच वाटतंय.

एके दिवशी त्याच्या स्टुडिओमध्ये अशी अजून एक एकटी मुलगी येते. तिला तिच्या जोडीदारासोबत फोटो काढून घ्यायचा आहे. ती वाट बघत आहे, पण कुणी येतच नाहीये. दरम्यान तिथे अजून भरपूर लोक येऊन जातात फोटो काढायला. वेगवेगळ्या वर्गातले, वेगवेगळ्या आकाराचे,वेगवेगळ्या रूपाचे. ती सगळ्यांना हरखून बघत आहे. पण आतून खूप खिन्नपण आहे. एकलकोंडा फोटोग्राफर आणि रिसेप्शनवर बसलेली सुंदर पोरगी या वाट बघणाऱ्या पोरीकडे थोड्या सहानुभूतीनं थोड्या प्रेमानं बघत आहेत. रात्र होते. स्टुडिओ बंद होण्याची वेळ झालीये. रिसेप्शनिस्ट निघून गेलीये. आता स्टुडिओमध्ये फक्त फोटोग्राफर आणि ती पोरगी उरलीये. ती पोरगी सोफ्यावरच झोपलीय. झोपेतच तिच्या डोळ्यात पाणी वाहतंय. फोटोग्राफर सरसावतो आणि तिच्या डोळ्यातला अश्रू झेलतो. मग तिचा लटका विरोध डावलून तो त्यांचा एकत्र फोटो काढतो. तो त्याचा दिवसातला सगळ्यात भारी फोटो असतो. ही एका नवीन गोष्टीची सुरुवात असेल? किंवा नसेलपण. पण स्टुडिओच्या मध्यभागी असणारी रिकामी फ्रेम आहे, तिथं या दोघांचा फोटो आहे आता.

नव्वदच्या दशकातला इंडिपॉप आणि त्याचे व्हिडीओज हा फार प्रेमाचा विषय आहे. तीन-चार मिनिटात फार सुंदर गोष्टी सांगायचे. या गाण्यातल्या गोड पोरीच्या डोळ्यांखाली पिशव्या आहेत. इरफानसारख्या. गाण्यातला फोटोग्राफर हा 'जब वुई मेट'मधला अंशुमन. गीत ज्याला फोनवर शिव्या घालते आणि शेवटी डंप करते तो. 'जब वुई मेट' मध्ये शेवट चांगला नसला तरी इथं त्याच्यासाठी शेवट भारी आहे. गायक पंकज सरवगी नंतर कुठं गायब झाला माहीत नाही. पण गाणं जितकं मेलोडियस आहे, तितकाच व्हिडीओ भारी आहे.

'मुझे प्यार है तुमसे,

के जब भी कोई आहट हुए

तो लगे के तुम आए'

युट्युबरवर जाऊन गाणं बघाच.

एका अख्ख्या पिढीला भुरळ घालणारा हा 'इंडिपॉप फिनॉमेना' बघता बघता गायब झाला. आता शिल्लक आहेत फक्त त्याचे अवशेष. इंडिपॉपच्या अस्ताची अनेक कारणं आहेत. बॉलिवूडची आणि एकूणच चित्रपटसंगीताची भारतीय प्रेक्षकांवर असलेली भुरळ हे महत्वाचं कारण. इंडिपॉप हा अनेक गायकांसाठी-संगीत दिग्दर्शकांसाठी फक्त एक 'स्टेपिंग स्टोन' होता. पैसा,प्रसिद्धी आणि मोठ्या प्रमाणावर स्वीकारार्हता

मिळण्यासाठी आपल्याला सिनेमाच्या वळचणीला जायला लागणार ही अपरिहार्य अटळता होती त्यांच्यासाठी. पण जाऊ दे. आता तरी आर्थिक -सामाजिक विश्लेषणात जायला नको. आताशा विश्लेषणं नकोशी वाटतात. त्यांच्यामध्ये आठवणींना आणि पलायनवादाला टाचणी लावण्याची क्षमता असते. इंटरनेटनं इंडिपॉप पुन्हा बघण्याची-ऐकण्याची संधी दिली हेच एक मोठं वरदान आहे. ही गाणी ऐकताना पुन्हा एकदा शक्यतांच्या प्रांतात पुन्हा जायला मिळतं. आता हेच खूप आहे.

***अल्बम पोस्टर: इंटरनेट

# भूमिकेने आपल्याला निवडायला हवे : चिन्मय मांडलेकर

- राज जाधव




**सध्या तुम्ही मालिका, नाटक, सिनेमा या सगळ्या क्षेत्रात अढळपणे उभे आहात, हा प्रवास खरोखर वाखाणण्याजोगा आहे, पण याचे बीज कुठे रोवले गेलं? सुरुवात कशी झाली आणि महत्वाचे म्हणजे हे क्षेत्र हीच माझी पंढरी, हा साक्षात्कार कधी झाला?**

शाळेत असताना असं काही ठरवलं नव्हतं, पण मुंबईच्या ज्या भागात मी राहिलो, लहानाचा मोठा झालो, त्या गिरगावात सांस्कृतिक वातावरण होतं . त्यामुळे तिथे वेगवेगळे सण साजरे केले जायचे. आमच्याकडे शिवजयंती, गणेशोत्सव आणि नवरात्र खूप मोठ्या प्रमाणात साजरे केले जायचे. हे तीनही सण वर्षातल्या वेगवेगळ्या महिन्यात येत असल्याने वर्षभर आमच्याकडे काहीतरी सुरु असायचं. शाळेत मी फार काही ऍक्टिव्ह नव्हतो, मी कॉन्व्हेंटमध्ये होतो. शाळेत फक्त मजा केली, मी ऍव्हरेज टाईपचा विद्यार्थी होतो. गमतीशीर गोष्ट अशी होती की, माझे वडील बँकेत होते आणि माझी आई वकील होती. माझ्या घरातून कुणीच या क्षेत्रात नव्हते. नाही म्हणायला माझा मामा जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये होता, त्याला भेटायला वगैरे अभिनेते यायचे, तेव्हा त्याचे अप्रूप वाटायचं.

दहावीनंतरही मला आर्टस् घ्यायचं होतं. एक तर 'इतिहास' हा विषय घेऊन पुढे शिकायचं किंवा मग लॉ करायचं, असं मी ठरवलं होतं. आई वकील असल्यानं आणि मलाही लॉची आवड असल्यानं मलाही वकील व्हायचं होतं. पण झालं असं की  मला दहावीला चुकून जास्त टक्के मिळाले (ऐंशी टक्के). मग बाबा म्हणाले की सायन्सला जा, ज्यात मला इंटरेस्ट नव्हता. मग आम्ही एक मांडवली केली. आर्टस् नाही, सायन्स नाही, मी कॉमर्स घेतलं आणि एम. एल. डहाणूकरला येऊन पोचलो आणि आज मी हे ऑन रेकॉर्ड सांगू शकतो की मी जर डहाणूकरला आलो नसतो तर कदाचित मी या क्षेत्रातच नसतो आलो.

मी इथे कसा आलो, त्याचीही एक गंमत आहे. डहाणूकरला खूप मोठं कल्चरल बॅकग्राऊंड आहे. तिथे गेल्यानंतर एकांकिका म्हणजे काय हे पहिल्यांदा कळलं.

असाच एके दिवशी मी माझ्या एका मैत्रिणीसोबत गेलो होतो, कारण तिला एकांकिकेत भाग घ्यायचा होता. तिथे आम्ही मागे बसलो होतो. मला अजून आठवतं आहे 'तुझे आहे तुजपाशी' हे पुलंचं नाटक आहे, त्यातला एक संवाद वाचायचा होता. मी मागे बसून काहीतरी कॉमेंट केली. माझ्यामागे आमचे दिग्दर्शक बसले होते, त्यांनी ती ऐकली आणि मला म्हणाले, 'तू जा, तू वाचून दाखव'. मी म्हटलं , 'मी नाही आलोय ऑडिशनला', पण ते काही ऐकेनात. मग मी, फक्त 'वाचायचंच आहे ना, ठीक आहे', म्हणत गेलो आणि घडाघडा वाचून दाखवलं. तर ते म्हणाले, 'ठीक आहे, ये उद्यापासून'. मला इंटरेस्ट नाहीये, असं सांगूनही त्यांनी मला यायला सांगितलं आणि मी गेलोही. तर ही अशी सुरुवात झाली या सगळ्याची.

तशी सिनेमाची आवड आधीपासून होती आणि घरीही याची कल्पना असायची. माझ्या घरी 'जी', 'चित्रलेखा' नावाची मॅगेझिन्स येत, त्यांचं अकाउंट बाबांच्या बँकेत होतं, त्यामुळे आमच्या घरी दर आठवड्याला ती मॅगेझिन्स येत. ती मी वाचायचो, तसं  पोषक वातावरण होतं घरी.

मी आठवी-नववीपासून एकटा जाऊन थिएटरमध्ये सिनेमे बघायला लागलो. याच्यावरही घरच्यांचा कधी आक्षेप नव्हता. जानेवारी ९४ च्या दरम्यान 'डर' रिलीज झाला. जानेवारी ९४ ते मार्च ९४ मी तो ३३ वेळा थिएटरला पाहिला, तेही दहावीच्या वर्षात, घरी सांगून. म्हणजे गिरगावात असताना मेट्रो, सेंट्रल प्लाझा, स्टर्लिंग, कुर्ल्याला कल्पना आणि कामरान नावाची दोन थिएटर्स होती, मी तिथे जाऊनदेखील सिनेमे पाहिले. तर सांगायचा मुद्दा हा की, आवड प्रचंड होती, पण आपण या क्षेत्रात येऊ असे कधी वाटलं नव्हतं, करियर वगैरे तर लांबच. पण डहाणूकरमुळे एकांकिका पहिल्यांदा पाहिली, पहिल्यांदा स्टेजवर पाऊल ठेवलं. आमची जेव्हा रिहर्सल सुरु झाली तेव्हा विनय आपटे येऊन बसले होते, एकदा सचिन खेडेकर आले. असे बरेच लोक यायचे. मी INT स्पर्धेसाठी रविंद्रला गेलो, तेव्हा मराठीतले अनेक दिग्गज बघायला आले होते. तेव्हा असं लक्षात आलं की हे जे काही चाललं  आहे ते मोठं काहीतरी आहे आणि आपण हे फक्त टाईमपास म्हणून करता कामा नये.

पण कॉलेज झाल्यानंतर मी त्या सगळ्यातून बाहेर पडलो, बरेच जण कॉलेज झाल्यावरही येत राहतात आणि त्यातून त्यांना बाहेर पडता येत नाही. त्यानंतर मी १९९७ साली एक वर्कशॉप अटेंड केलं. कीर्ती कॉलेजमध्ये निर्मल पांडे आणि किशोर कदम येणार होते. आमच्या कॉलेजमध्ये त्याचं पोस्टर लागलं होतं. गमतीचा भाग असा की नाटकाचे वातावरण असणारं कॉलेज असूनही तिथे मी सोडून अजून कुणीही गेलं नव्हतं. तेव्हा निर्मल पांडे यांचे 'बँडीट क्वीन' आणि 'इस रात की सुबह नही' नुकतेच आलेले, त्यामुळे त्यांचं नाव खूप मोठं होतं. पण त्याला अख्ख्या कॉलेजमधून फक्त मीच कसा गेलो, आजवर हे मला न सुटलेलं कोडं आहे. माझ्यासोबत माझा एक मित्र सुनील भोसले होता, जो सध्या एक मोठा निर्माता आहे. तिथे पहिल्यांदा मी निर्मल पांडे यांच्या तोंडी 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा' चे नाव ऐकल, की असं एक काहीतरी आहे जिथे नाटक शिकण्यासाठी जातात. त्या यावेळेस माझं ठरलं  की मला हे करायचं आहे.

एफ.वाय.ला असताना मला कळलं की तिथे जाण्यासाठी ग्रॅज्युएट असणं गरजेचं होतं. मग मी ते संपवायचं ठरवलं. त्यानंतर मी माझे टी.वाय.चे सगळे पेपर पास होण्याइतपत दिले. यासाठी घरच्यांची समजूत काढणं, हे फार अवघड काम होतं. कारण, हौस म्हणून करत होतो तोवर त्यांचा काही आक्षेप नव्हता, पण जेव्हा मी ते करियर म्हणून करायचं ठरवलं  तेव्हा वडील फार काळजीत होते. त्यांची काळजी मी आत्ता समजू शकतो. आत्तासारखी परिस्थिती तेव्हा नव्हती. तेव्हा हिंदी चित्रपट हे एकमेव माध्यम होतं. आत्ता असंख्य पर्याय आहेत.




**डहाणूकर कॉलेज ते NSD ते मालिका, नाटक, फिल्म्स या सगळ्या प्रवासात लेखनाची सुरुवात कशी झाली.**

मला लेखन वगैरे काहीच माहीत नव्हतं, जमतही नव्हतं. NSD ला तिसऱ्या वर्षाला असताना योगायोगानं एक नाटक लिहिलं होतं. तिकडे तिसऱ्या वर्षाला डिरेक्शनचे जे विद्यार्थी असतात त्यांना एक डिप्लोमा प्रोडक्शन करावं लागतं. त्यावेळी सुनील हुडगी म्हणून माझा एक बॅचमेट होता, त्याला वेगळं काहीतरी करायचं होतं. शिवपुराणावर काहीतरी करायचं त्यानं ठरवलं. सुरुवातीला, माझा उद्देश फक्त त्यात एखादा रोल मिळावा इतपत होता, पण त्यानं ती गोष्ट सांगितल्यावर मी ते शिवपुराण पूर्ण वाचलं. मग आम्ही ते लिहून काढायचं ठरवलं. ते अस्खलित हिंदीत लिहिलं, 'अयज्ञ' नावानं. त्यात मग मी अभिनय केला नाही, पण त्यात माझं प्रथम लेखक म्हणून नाव लागलं. पण तेव्हाही आपण लेखक आहोत असं काही वाटलं नव्हतं.

मी मुंबईला आलो आणि खऱ्या अर्थानं स्ट्रगल सुरु झालं. मुंबईला आल्यावर सगळ्यात आधी जी गोष्ट मला जाणवली, ती म्हणजे मी तीन वर्षांपूर्वी जेव्हा गेलो होतो तेव्हा हिंदी चित्रपट हे एकमेव माध्यम होतं किंवा हिंदी मालिका थोड्याफार. २००३ मध्ये जेव्हा मी आलो तेव्हा अचानक माझ्या लक्षात आलं की मराठी मालिका ही एक छोटेखानी इंडस्ट्री उभी राहिली आहे. त्याच्याआधी मराठी कलाकार हे नोकरी करायचे. ती सांभाळत ते नाटक किंवा सिनेमा करायचे. मराठी मालिका हे नोकरी असल्यासारखं एक माध्यम झालं होतं.

मी NSD ला गेलो तेव्हा 'दामिनी' नुकतीच सुरू झालेली. मी आलो तेव्हा ती लोकप्रिय झाली होती, 'आभाळमाया' सुरु होती. अल्फा टीव्ही, ई टीव्ही मराठी प्रस्थापित झाले होते. मी ठरवून आलो होतो की आपण फक्त चित्रपट करणार, पण नंतर असं लक्षात आलं की हे खूप मोठं क्षेत्र आहे, सो मी ऑडिशन्स द्यायला सुरुवात केली. मला पहिलं काम विनय आपटेंनी दिलं, एक टेलिफिल्म होती, फेब्रुवारी 2004 मध्ये शूट झालं त्याचं आणि त्याच्याआधी, 'वादळवाट' जो माझा पहिला शो आहे, त्याची ऑडिशन दिली होती. माझी निवडही झाली होती, पण आमचं शूटिंगच सुरू होत नव्हतं, कारण सुबोध भावेच्या तारखा नव्हत्या. आता अडचण अशी होती की, वादळवाट ज्यांची पहिली सिरियल होती, त्या सगळ्यांनी एक कॉंट्रॅक्ट साईन केलं होतं, त्याखेरीज दुसरं काही करणार नाही. त्यामुळे काम मिळाले होतं, पण मी घरी बसून होतो. मोठा प्रश्न होता की आता करायचं काय? म्हणून आम्ही एक नाटक केलं. एकपात्री होता, जोकरचा. त्याचा एक प्रयोग कुठेतरी लांब करत होतो आम्ही, तिथे योगायोगाने वादळवाटचे लेखक, अभय परांजपे आले होते. त्यांनी विचारलं, "लिहिलं कुणी आहे?" माझ्याबद्दल कळल्यावर त्यांनी मला भेटायला बोलावलं. भेटल्यानंतर ते म्हणाले, संवाद लिहिशील का? मी म्हटलं , 'मला लिहिता येत नाही, मी आयुष्यात कधी काही लिहिलं नाहीये'. पण त्यांनी आग्रह केला आणि मीही तयार झालो आणि अशी सुरुवात झाली माझ्यातल्या लेखकाची. यानंतर दोन गोष्टी जाणवल्या, एक मला लिहिता येतं आणि दोन, यात पैसे आहेत आणि यानं जर मला आर्थिक स्थैर्य मिळत असेल तर मला स्वतःला अभिनेता म्हणून एखादं काम करायचं आहे की नाही, हा चॉईस आहे. मग मी ते सुरू ठेवलं. 'वादळवाट' मी तीन वर्षं सरांबरोबर लिहिली. जसं माझं तीन वर्षे NSD मध्ये अभिनेता म्हणून ट्रेनिंग झालं, तसं हे तीन वर्षं लेखक म्हणून माझं ट्रेनिंग अभय परांजपे सरांसोबत झालं.

त्याच्यानंतर 2004 मध्ये मी माझी पहिली फिल्म केली 'क्षण' नावाची. मग 'असंभव' आली. असंभवमुळे लेखक म्हणून खूप मोठं नाव झालं. असंभवचीपण गंमत अशी की ती सिरियल मी संवाद लेखक म्हणून सुरू केली आणि गिरीश जोशी लेखक होते. गिरीश जोशी त्यांच्या फायनल ड्राफ्टच्या शोसाठी अमेरिकेला गेले असताना त्यांचा लॅपटॉप चोरीला गेला. त्यावेळेस काही महिने त्यांच्या विनंतीला मान देऊन मी बदली रायटर म्हणून मी ती लिहिली. मग नंतर ते मीच लिहित गेलो, त्यांना आवडलं असेल. त्यानंतर मग सिरियल , फिल्म, नाटक हे सुरू झालं आणि मग माझ्या हे लक्षात आलं की मी हे दोन्ही करू शकतो, लेखनही करू शकतो आणि अभिनयही करू शकतो.

**अभिनय आणि लेखन यात प्रायोरिटी कशाला आहे?**

असं काही नाहीये. प्रोजेक्टनुसार ठरवतो मी. लेखन ही एक अशी गोष्ट हे जिथे तुम्हाला फिजिकली अवेलेबल राहणं गरजेचं नाहीये, तुम्ही कुठेही बसू शकता, लिहू शकता. प्रायोरिटीचं म्हणशील तर मी आत्ता हे ठरवू शकतो की मला एखाद्या प्रोजेक्टमध्ये लिहायचं आहे, अभिनय करायचा आहे, प्रोड्यूस करायचं आहे की डायरेक्ट करायचं आहे. मी शक्यतो दोन गोष्टी एकत्र करत नाही आणि केल्याच तर ती तशी प्रायोरिटी असते की मला यात काम करायचं आहे. 'दुनियादारी' फिल्म मी लिहिली, इतके लोक होते त्यात, मी एकदाही डायरेक्टरला असं सांगितलं नाही की हा रोल मला द्या, कारण मला तसं वाटलं नाही. माझ्या अनेक अशा फिल्म्सदेखील आहेत त्यात मी फक्त अभिनय करतोय, लेखन-दिग्दर्शन माझं नाही. 'झेंडा' आहे, 'मोरया' आहे.

**शिवराज अष्टक ही संकल्पना आणि ही मालिका याची सुरुवात कशी झाली?**

ही कल्पना, हे व्हिजन पूर्णता दिग्पालचं आहे. आम्ही 'तू माझा सांगाती' सिरियल एकत्र करत होतो, संत तुकाराम महाराजांवर आधारित होती ती. यात तो संवादलेखन करत होता. शिवाय त्यात तो माझ्या मोठ्या भावाचं कामदेखील करत होता. आम्ही त्या सेटवर पहिल्यांदा भेटलो, आमची चांगली मैत्री झाली. तेव्हा त्यानं मला फर्जंदचं स्क्रिप्ट वाचायला दिलं. तेव्हा मला हे माहीत नव्हतं की मी फिल्ममध्ये आहे की नाही. मी त्याला एकच सांगितलं की प्लीज हे चांगल्या निर्मात्याकडे ने, कारण हे खूप भव्य आहे. तेव्हा त्यानं मला हेही सांगितलं की जर हे सक्सेसफुल झालं तर त्याच्या डोक्यात छत्रपती शिवाजी महाराजांवर पूर्ण मालिका आहे. त्यावेळी मला वाटलं की मराठीसाठी ही सध्या खूप मोठी गोष्ट आहे. दिग्पालचा स्ट्रगल खूप मोठा आहे. त्यानं बऱ्याच ठिकाणी खस्ता खाल्ल्या, बरेच असेही भेटले की, तू स्क्रिप्ट आम्हाला दे, आम्ही डिरेक्ट करतो. पण तो प्रामाणिकपणे झगडत राहिला आणि अखेर त्याला निर्माते मिळाले. मग त्याने मला विचारलं की 'तू रोल करशील का?' मला वाटलं की मला कुठलातरी मुघलाचा वगैरे रोल देईल, पण त्यानं मला छत्रपती शिवाजी महाराज रोलसाठी विचारलं. नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता, मग आम्ही लूक टेस्ट केली आणि आमचं ठरलं. त्याच्यानंतर मी त्याच्या व्हिजनचा एक भाग झालो. मला अजूनही आठवतं की 'फत्तेशिकस्त' केला तेव्हा मी एका वेगळ्या प्रोजेक्टवर होतो आणि त्याच्यासाठी मला भारताबाहेर जाणं आवश्यक होतं आणि नेमक्या तेव्हा फत्तेशिकस्तच्या तारखा होत्या. तेव्हा माझ्यासमोर कोणता तरी एक पर्याय निवडणं गरजेचं होतं. मी याला निवडलं . त्यानंतर त्यानं 'पावनखिंड' केला. आता तर 'शेर शिवराज' पासून आम्ही प्रोड्यूसर झालोय. या मधल्या काळात आम्ही एकत्र खूप काम केलं. कंपनी प्रस्थापित केली. आता जरी मी त्याचा भाग असलो तरी ते व्हिजन

पूर्णतः दिग्पालचंच होतं. महाराजांवर काहीतरी करावं हे प्रत्येक मराठी माणसाचे स्वप्न होतं, पण ते कसं असायला हवं यामागचा जो काही ध्यास आहे, तो दिग्पालचाच आहे. त्याचा आम्ही फक्त भाग होत गेलो.

**शिवराज अष्टक या चित्रपटांच्या मालिकेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज साकारत असल्यानं त्या इमेजमध्ये अडकण्याची भीती वाटली नाही का?**

जेव्हा मी पहिल्यांदा छत्रपती शिवाजी महाराजांचा रोल केला तेव्हा मी खूप आनंदी होतो कारण हा रोल करायला मिळणं हेच फार मोठं भाग्याचं काम होतं. दुसऱ्या फिल्ममध्येही मीच महाराज होतो, पुढच्या फिल्ममध्येदेखील मीच असणार आहे आणि टाईपकास्ट होण्याबाबत म्हणशील तर, 'If an actor decides to break it, he can break it'. जेव्हा मी तुकाराम महाराज करायचो, त्याच्या आधी मी 'तू तिथे मी' नावाचा शो करायचो, तो लिहिलाही मीच होता. त्या सिरियलने मला अभिनेता म्हणून खूप काही दिलं. त्यामध्ये मी एका अत्यंत तिरसट माणसाचा रोल करायचो. माझं कास्टिंग जेव्हा तुकाराम म्हणून झालं तेव्हा बऱ्याच लोकांचं हे म्हणणं होतं की ही निवड चुकीची आहे. फक्त दिग्दर्शक संगीत कुलकर्णी यांचा विश्वास होता की हे काम मी करू शकतो. मी चार वर्षं तुकाराम केलं, चौथ्या वर्षापर्यंत लोक मला असे सांगायला लागले की तुमच्या शिवाय दुसऱ्या कुणाची तुकाराम म्हणून कल्पना करवत नाही. मी जेव्हा तुकाराम करत होतो तेव्हा मी 'मग्न तळ्याकाठी' नावाचं एक नाटक करत होतो, ज्यात मी एका शिवराळ, बंडखोर तरुणाचा रोल करत होतो. त्याच्यानंतर मी छत्रपती शिवाजी महाराज साकारले आणि नंतर 'काश्मीर फाईल्स' केला. आता खरं तर माझ्याबाबत ही इमेज असेल की, याचा काय भरोसा नाही, हा काहीही करू शकतो.

माझ्यासमोर जेव्हा काश्मीर फाईल्स आला तेव्हा एक सेकंदही विचार केला नाही. हे मला करायला पाहिजे की नाही, असं काही माझ्या डोक्यात आलंच नाही. मला दिसलं की कडक रोल आहे आपण करायला पाहिजे.

काश्मीर फाईल्सच्या आधी मी अजून एक हिंदी फिल्म केली राजकुमार संतोषींसोबत. तो अगदीच वेगळा रोल आहे, त्याला अशी कुठलीही शेड नाहीये. त्याआधी मी 'हलाल' नावाचा सिनेमा केला होता. मी केला आहे म्हणतोय म्हणजे मला हे रोल ऑफर होत होते. रोलनं ॲक्टरला निवडायला हवं. पत्रकार विचारतात, 'तुम्ही कसा रोल चुज करता,' आपण नाही, रोलनं आपल्याला 'चुज' करायला हवं. नाहीतर, काश्मीर फाईल्स माझ्याकडे येण्याचा काय संबंध?

मला कास्ट करण्याचा निर्णय हा पूर्णपणे पल्लवीजींचा होता, विवेक अग्निहोत्रीदेखील म्हणाले होते की, 'हा कसा काय करणार? हा मराठी आहे'. मग मी ऑडिशन दिली, ऑडिशन बघितल्यावर त्यांना पटलं की हा करू शकेल. तुम्ही होता टाईपकास्ट, पण ते तुमच्या हातातही तितकंच असतं. क्राईम पॅट्रोलचे मी काही भाग केले होते, त्यानंतर दोन ते तीन वर्षं सलग, कधी कधी अजूनही, इन्स्पेक्टरचे रोल्स येतात. मग मीच कास्टिंग डायरेक्टरला सांगायला सुरुवात केली की पोलिसाचा रोल असेल तर मला करायचा नाहीये, मला ऐकायचादेखील नाहीये. त्यामुळे आता त्यांच्यामध्येही हे पसरलं आहे की याला काहीतरी वेगळं शोधायला हवं. मी सध्या नेटफ्लिक्सवर एक शो करतोय त्यात मी डॉक्टर आहे. ते माझा या रोलमध्ये विचार करू लागले कारण मी नाही म्हणायला शिकलो. त्यामुळे मला वाटतं की टाईपकास्ट होणं न होणं हे अभिनेत्याच्याही हातात असतं.

**तुम्ही हिंदीमध्येही काम केलं आहे. तेरे बिन लादेन, शांघाई आणि भावेश जोशी हेही महत्वाचे आणि दमदार रोल्स होते. दिबाकर बॅनर्जी आणि विक्रमादित्य मोटवानेसोबत काम करण्याचा अनुभव कसा होता?**

हिंदीत मी सर्वात आधी 'तेरे बिन लादेन' फिल्म केली, मग 'शांघाई' आणि 'भावेश जोशी सुपरहिरो.' मी समीर नावाची एक हिंदी फिल्म केली ज्यात मोहम्मद झिशान अयुब आहे, फार कमी लोकांना माहीत आहे ही फिल्म.

मोटवाने सुपर्ब डायरेक्टर आहे, खूप छान अनुभव होता तो. भावेश जोशीचं साधारण अकरा महिने शूटिंग चालू होतं. कारण त्यात हर्षवर्धन कपूरचे वेगवेगळे लूक होते. खूप चांगला डायरेक्टर आहे विक्रमादित्य, थोडासा इन्ट्रोव्हर्ट वाटतो, पण सेटवर आल्यावर त्याला माहीत असतं की त्याला काय हवं आहे. माझ्यासाठी तर एक मेमरेबल अनुभव होता. सिनेमात कुणी मोठा स्टार नसल्यानं एक खेळीमेळीचं वातावरणपण होतं. जे काही शूट मी केले ते खूप एंजॉयेबल होते. त्यात ऐंशी टक्के शूटिंग रात्रीची आहे. त्यात एक चेस सिक्वेन्स आहे, जो आम्ही सलग अठरा दिवस शूट करत होतो, वेगवेगळ्या ठिकाणी ब्रीज, रेल्वे प्लॅटफॉर्मवर. खूप मजा मजा आली ते सगळे करताना.

विक्रमादित्य मोटवानेच्या कामाचा ग्राफ फार वेगळा आहे. तीच गोष्ट दिबाकर बॅनर्जींची, शांघाईचा रोल तसा छोटा होता, पण मी ती फिल्म केवळ दिबाकर बॅनर्जींसाठी केली. त्यांच्यासोबत काम करायला मिळतं आहे, हे माझ्यासाठी खूप महत्त्वाचं होतं.

**काश्मीर फाईल्ससाठी अनेक चांगले-वाईट अभिप्राय आले असतील. त्याविषयी काही सांगाल?**

चांगलेच अभिप्राय आले. मला एकही वाईट अभिप्राय आला नाही. सुदैवानं मी फेसबुक आणि ट्विटरवर नाहीये, म्हणजे मी तो दरवाजाच बंद ठेवला आहे. मी फक्त इन्स्टाग्रामवर आहे. जेव्हा फिल्म रिलीज झाली तेव्हा माझ्या बायकोनं मला सांगितलं की के. के. मेनन, अर्जुन रामपाल यांनी तुझं नाव घेऊन खूप कौतुक केलं आहे, पण तू नाहीयेस ट्विटरवर, ते टॅग करू शकत नाहीयेत. म्हणून तिनंच माझं एक अकाउंट उघडलं. ते मी तिसऱ्या दिवशी डिलीट करून टाकलं.

पर्सनल लेव्हलवर मला एकही चुकीचा अभिप्राय नाही आला. आम्हाला फिल्म बघून तुझा खूप राग आला, हे आले. पण ही तर कौतुकाची थाप आहे, असं मी मानतो. निगेटिव्ह असा एकही मेसेज, अभिप्राय आला नाही.

**एकाच वेळी महाराज आणि बिट्टा या दोन विरुद्ध टोकाच्या भूमिका करताना दोन्हीच्या शुटिंग्स कधी ओव्हरलॅप झाल्या का?**

नाही, सुदैवानं, असं कधी नाही झालं. पावनखिंड आम्ही कोव्हिडच्या आधी शूट केला होता. काश्मीर फाईल्स कोव्हिडच्या दोन लाटांच्यामध्ये शूट झाला. पावनखिंड फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये शूट झाला. काश्मीर फाईल्स १६ डिसेंबर नंतर शूटिंग सुरु झाली. शेर शिवराज तर अगदी यांच्या पुढच्या वर्षी आला. पण रिलीज सगळे एकामागोमाग एक झाले.

**बिट्टाच्या रोलसाठी काय तयारी केली? काही रिसर्च मटेरियल दाखवण्यात आलं होतं का?**

मला ऑडिशनच्या वेळेला पल्लवीजींनी एक लिंक पाठवली. तो यासिन मलिकचा 'आपकी अदालत' मधला इंटरव्यू होता. तो मी पाहिला आणि जेव्हा माझं सिलेक्शन झालं तेव्हा विवेकजींनी मला बोलावून असे सांगितलं की हे पात्र दोन व्यक्तींचं मिश्रण आहे, यासिन मलिक आणि फारूक मलिक बिट्टा. यासिन मलिक हा इंटेलैक्च्युअल आहे, तर बिट्टा हा हेंचमन आहे. विवेकजींनी सांगितलं की आपण ही दोन्ही पात्रं एकत्र करूया. मी यासिनचे जवळजवळ सगळे इंटरव्यू बघितले. ते डोळे अलगद मिटण्याचा जो प्रकार आहे तो यासिनचा आहे. मी बेसिकली व्हिडीओ बघत होतो ते भाषेसाठी. कारण प्रत्येक माणसाची हिंदी बोलण्याची वेगवेगळी पद्धत आहे. आपण मराठी माणसं वेगळं बोलतो, नॉर्थ इंडियन वेगळं बोलतात, साऊथ इंडियन वेगळं बोलतात, काश्मिरी वेगळं बोलतात. तर ते नेमकं कसं बोलतात यासाठी मी ते

व्हिडीओ बघत होतो. एका पॉईंटनंतर मी बघायचे बंद केले आणि फक्त ऐकत राहिलो. सो त्याचा फायदा झाला आणि आमचं ठरलं होतं, कॉपी नाही करायची. मी विवेकजींनादेखील म्हणालो होतो, मी कुठल्याच अँगलनं काश्मिरी दिसत नाही, मी काळा आहे, ते गोरे असतात. माझं नाक सरळ आहे, माझे केससुद्धा आम्ही स्ट्रेटन करून घेतले होते, माझे केससुद्धा कुरळे आहेत. विवेकजींनी केवळ इतकंच सांगितलं होतं की आपल्याला अजिबात मिमिक नाही करायचं आहे, त्या पात्राचं सायकिक कितपत इंटर्नलाईज करू शकतोस इतकंच बघ. आम्हाला त्याला मिमिकही करायचं नव्हतं आणि त्याला गब्बर सिंगही बनवायचं नव्हतं.

**बिट्टामुळे देशात आणि देशाबाहेर अभिनेता म्हणून एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. तो अनुभव कसा वाटला? त्यामुळे काही वेगळे रोल्स ऑफर होत आहेत का?**

रिस्पॉन्स नक्कीच जास्त आहे. काश्मीर फाईल्सचा रिच खूप जास्त आहे. माझे आधीचे जे चारही चित्रपट होते, त्यात हिट म्हणता येईल असा एकही चित्रपट नव्हता, त्यातल्या त्यात 'तेरे बिन लादेन' ऍव्हरेज चालला. पण बऱ्याच लोकांना मी त्यात आहे हेच माहीत नाही. त्यामानानं तो रोल खूप प्रॉमिनंट होता. त्याचा डायरेक्टर अभिषेक शर्मा NSD मध्ये माझा सिनियर होता म्हणून मला तो रोल मिळाला. तो स्ट्रगल करत होता तेव्हापासून माझा या फिल्मशी संबंध आला होता.

काश्मीर फाईल्समुळे एक झालं आहे की, ''कोण आहे हा?", "काश्मीर फाईल्स मधला व्हिलन आहे..." "ओह अच्छा.'' तेवढं एक झालं आहे. मी अजिबात असं म्हणणार नाही की काश्मीर फाईल्स रिलीज झाला आणि माझ्या घराबाहेर रांग लागली. पण काश्मीर फाईल्स रिलीज झाल्यावर मी २ वेब शोज केले, एमएक्स प्लेयरची एक आणि नेटफ्लिक्ससाठी एक. काही लोकांनी समोरून विचारलं. काही दिग्गज लोकांनी फक्त कौतुक केलं, जसं की राम गोपाल वर्मा आणि सुभाष घई. एके दिवशी माझ्या मोबाईलवर मेसेज आला. 'हाय धिस इज राम गोपाल वर्मा, कॅन आय कॉल यु?' माझा विश्वासच बसत नव्हता. माझ्या बायकोच्या तर डोळ्यात पाणी आलं. मग मी त्यांना फोन केला आणि ते बराच वेळ बोलले. सुभाषजींनी तर भेटायला बोलावलं, बराच वेळ गप्पा मारल्या. त्यातल्या कुणीच म्हटलं नाही की आता तू माझ्या फिल्ममध्ये आहेस. पण त्यांचं बोलावणं आलं हीच आपल्या कामाची पावती आहे. म्हणजे आम्ही स्ट्रगलर असताना बोलायचो ना, 'अरे एक दिन सुभाषजीका फोन आयेगा', ते सत्यात उतरलं होतं. एक चांगली गोष्ट ही झाली आहे की, काश्मीर फाईल्सनंतर, 'सर वो एक आतंकवादी का रोल है, आप करोगे?' असं काही अजून तरी आलेलं नाहीये. झेंडानंतर ते झालं होतं. मोरया आणि झेंडा एकाच अंतरानं आले. तेव्हा फोन यायचे, 'सर एक रोल आहे, गावाकडचा एक माणूस...' माझा ना तिथेच

मूड जायचा. काही काही तर सरळ सांगायचे, 'झेंडासारखं, सेम झेंडासारखं आहे'. मला अक्सेंट पकडता येतो चांगला, कदाचित त्यामुळे असे रोल्स येत असावेत माझ्याकडे.

**राजकुमार संतोषीसोबत काम करण्याचा अनुभव कसा होता?**

फार ग्रेट माणूस. मी पार्ल्यामध्ये बसलो होतो तेव्हा मला पहिल्यांदा कास्टिंग डायरेक्टरचा फोन आला की 'राजकुमार संतोषी आप से मिलना चाहते है'. मी लिटरली, 'हां, ठीक है', म्हणून फोन ठेवून दिला. मला वाटलं कुणीतरी प्रॅन्क करतंय. लगेच परत फोन आला.

"हॅलो सर, चिन्मयजी बोल रहे है ना, राजकुमार संतोषी आप से मिलना चाहते है."

मी म्हटलं , "कौन? खाकी? घायल, घातक? वो राजकुमार संतोषी?"

तो म्हणाला, "हां वही."

मी तरीही त्याला विचारलं,

"कशासाठी?"

'कामासाठी बोलावलं आहे' म्हटल्यानंतरही, मी 'उद्या येतो' म्हणून सांगितलं. खरं तर, मी त्यांच्या घरापासून पाचव्या मिनिटाला बसलो होतो. मी तिथे जाईपर्यंत माझा विश्वास नव्हता. गेलो, राजजी स्वतः होते तिथे. मला वरपासून खालीपर्यंत बघितलं. म्हणाले,

"इसको बता दिया ना, क्या करना है?"

तोवर मला काही सांगितलं गेलं नव्हतं. मग त्यांनीच अख्खी फिल्म मला नरेट केली. ऐकल्यावर मी विचार करत होतो, अख्खी फिल्म तर सॉलिड आहे, पण यात आपण काय करणार, हे मला कळेचना. मी त्यांना विचारलं तर त्यावर ते म्हणाले,

"वही मेन रोल, करोगे?"

मला काय बोलावं ते कळत नव्हतं. त्यांनी परत विचारलं, ''कर लोगे ना?'' मी म्हटलं , "हां, कर लुंगा.'' मी निघताना त्यांना बोललो, सर मी या फिल्मचा भाग होईन की नाही हे मला माहीत नाही, पण तुम्ही फिल्म बनवत आहात ही आमच्यासाठी, तुमच्या फॅन्ससाठी खूप मोठी गोष्ट आहे. मला वाटलं

ऑडिशन वगैरे काहीतरी असेल, पण काही नाही. त्याच्यानंतर शूट केली आम्ही फिल्म. कमाल माणूस, कमाल! पुढे फिल्म शूट करताना मला कधी कधी याची जाणीव व्हायची की ज्या माणसानं अमिताभ बच्चन, आमिर, सलमान, सनी, रेखा, ऐश्वर्या, अजय देवगण, अक्षय कुमार अशा मोठमोठ्या स्टार्ससोबत काम केलं आहे, त्याच्यासोबत आपण काम करतोय आणि यात कुणीच स्टार नाहीये. राजकुमार संतोषी इज दि स्टार ऑफ दि फिल्म. पण परफेक्शनिस्ट म्हणजे परफेक्शनिस्ट. त्यांचा ॲव्हरेज ओके टेक सोळावा किंवा सतरावा असतो.

तशी फिल्म सॉलिड आहे, रहमानचं म्युझिक आहे, पण फिल्ममध्ये कुणी स्टार नाहिये, म्हणून मी तेव्हा त्यांना विचारलं, 'सर ओटीटीवर रिलीज करूया का?' तेव्हा ते म्हणाले,

"बेटा कैसी बात करते हो, ओटीटी क्या होता है, बडे परदे की फिल्म है."

त्यानंतर एके दिवशी मला त्यांचा फोन आला, टीजर दाखवायला बोलावलं होतं मला आणि जो काय टीजर पाहिला मी, म्हटलं , 'खरंच बडे परदे की ही फिल्म है.'

**अभिनेता आणि लेखक म्हणून स्वतःसाठी काही गोल्स सेट केले आहेत का?**

राजकुमार संतोषी यांच्यासोबत काम करतोय हे तर 'ड्रीम कम ट्रू' मोमेन्ट आहे. तसेच राम गोपाल वर्मा आहे. लोकांना आश्चर्य वाटेल पण माझा खूप आवडता डायरेक्टर करण जोहर आहे. त्यानं डायरेक्ट केलेल्या फिल्म्स आवडतात मला. नवीनमध्ये तर खूप आहेत. शकुन बात्रा, अनुराग कश्यप आहे, माझी लिस्ट म्हणशील तर मार्टिन स्कॉर्सेसीपर्यंत गेली आहे. मी हार्वे कायटलसोबत एक फिल्म केली आहे. क्रांती कानडेनं एक 'गांधी ऑफ दि मंथ' नावाची फिल्म बनवली होती, जी कदाचित आलीच नाही की पूर्णच झाली नाही, माहीत नाही. माझा एकच सीन आहे त्यात. क्रांतीनं मला भेटायला बोलावलं. तो एफटीआयचा आहे. मला म्हणाला 'एकच सीन आहे करशील का?' मी सुरुवातीला एक सीन म्हटल्यावर थोडे नाक मुरडलं, पण हार्वे कायटलबरोबर आहे, हे सांगताच त्याला सांगितलं, 'मी करतोय'. पुढे मी काही विचारलंपण नाही, काय सीन आहे वगैरे. पाचगणीला आम्ही शूट केला होता. ज्या माणसानं मार्टिन स्कॉर्सेसीबरोबर फिल्म केल्यात त्याच्याबरोबर आपला एक सीन असणंदेखील पुष्कळ आहे. दुर्दैवानं ती रिलीजच नाही झाली.

कामाच्या बाबतीत, मी खूप फ्लेक्सिबल आहे. कधी कधी खूप नवीन डायरेक्टर असतो पण आपली ट्युनिंग जुळून जाते. दिग्पालसोबत तेच झालं. मी 'गजर' नावाची फिल्म केली होती, जी माझ्या

काळजाच्या खूप जवळची फिल्म आहे. त्या डायरेक्टरनं त्याच्याआधी काही केलं नव्हतं आणि दुर्दैवानं नंतरही काही केलं नाही.

**याशिवाय लेखक, अभिनेता, दिग्दर्शक म्हणून कोणते नवीन प्रोजेक्ट येत आहेत? सध्या काय चालू आहे?**

दिग्दर्शक म्हणून 'स्ट्रगल' आणि अभिनेता म्हणून एमएक्स प्लेयरची एक सिरीज आहे 'धारावी बँक' नावाची. त्यात सुनील शेट्टी, विवेक ओबेरॉय आहेत. नेटफ्लिक्सची 'कालापानी' नावाची सिरीज करतोय.

**हिंदीत तुमच्या अभिनयाची जादू तर आम्हाला पहायला मिळाली आहे, हिंदीत दिग्दर्शन करण्याची संधी मिळाली तर करायला आवडेल का?**

स्वप्नं  तर खूप आहेत आणि मला वाटतं की संधी येत नसते, ती तयार करावी लागते. प्रयत्न चालू आहे. पाहूया.

**लेखकांसाठी आणि कलाकारांसाठी ओटीटी कंटेंट, वेब सिरीज ही नवी दालनं खुली झाली आहेत, त्याबद्दल काय वाटतं?**

ज्यांना टेलिव्हिजन ऍक्टर म्हणून काम करायचा कंटाळा आलाय, अशांसाठी वेब शो एक उत्तम पर्याय आहे. जो मला आला होता एका पॉईंटनंतर. मी आठ वर्षं टेलिव्हिजन करत होतो, क्राईम पेट्रोल चालू होतं, डेली सोप्स केल्या, फिजिकली आणि मेंटली दमलो होतो. जर शंभर चांगल्या फिल्म बनत असतील, तर माझ्यासारख्या अभिनेत्याला पाचच मिळण्याची शक्यता आहे. त्यात माझ्यासारखे अजून पाचशे आहेत. तर मला ती फिल्म मिळण्याची प्रोबॅबिलिटी काय आहे? पण वेब शो मुळे ते स्प्रेड झाले. दहा वर्षांपूर्वी ज्या संधी निर्माण होत होत्या, त्यापेक्षा आता अधिक पर्याय उपलब्ध आहेत.

# लेखकाच्या डायरीतला एक दिवस

- क्षितिज पटवर्धन




**मा**झ्या डायरीतला एक दिवस सांगण्याआधी या ‘एक दिवसापर्यंत’ मी कसा आलो हे सांगणं जास्त महत्त्वाचं आहे. सिनेमाच्या भाषेत बोलायचं तर या एका दिवसाची बॅकस्टोरी फार महत्त्वाची आहे.

माझी पहिल्यापासूनच 'लेखक' म्हणजे कुणीतरी 'अस्ताव्यस्त टेबलावर ठेवलेल्या शुभ्र कागदावर, वळणदार अक्षरात एकटाकी लिहिणारा प्रौढ माणूस' अशी समजूत होती. त्यात भरीस भर म्हणून लेखक हा मुख्यतः अजागळ, बेशिस्त, चहासाठी तहानलेला, सिगरेटसाठी सदैव तयार असणारा आणि धीरगंभीर असतो अशी दुसरी समजूत तयार झाली. (मला अजूनही, "अरे तू सिगरेट पीत नाहीस, मग तू कसला लेखक?" असं म्हणणारे लोक भेटतात!) पण जसं जसं वय वाढत गेलं तशी गैरसमजुतीची

ही पुटं पडायला लागली आणि लेखन हे मुळात आपल्या अनुभवण्याचं आणि कल्पनाशक्तीचं बायप्रॉडक्ट आहे असं वाटायला लागलं. एखाद्या कल्पनेनं किंवा भावनेनं टिळांटिळ (आईचा हा शब्द मला फार आवडतो) भरल्यानंतर मोकळं होण्यासाठी जेव्हा मी लिहायला लागलो तेव्हा जो अनुभव आला तो विलक्षण होता. एकाच वेळी रिकामं होण्याची आणि भरून पावण्याची संधी लेखन देतंय याची जाणीव वाढायला लागली त्यातून ते जास्तीत जास्त करायची इच्छा तयार झाली.

एकांकिका, पत्रकारिता, जाहिरात, व्यावसायिक नाटक, गाणी आणि सिनेमा ह्या प्रत्येक वळणावरचे लेखनाचे दिवस मात्र अतिशय वेगवेगळे होते. कधी सगळे झोपल्यानंतर रात्रभर शांतपणे नाटकाचा एकच सीन अनेक वेळा लिहिणं (ज्याला आपण false start म्हणतो तसं), कधी जाहिरात कंपनीत सगळ्यांच्या आधी अर्धा तास जाऊन स्वतःसाठी खटपट्या जाहिराती लिहिणं, केवळ दुसऱ्या कोणी डिस्टर्ब करू नये म्हणून एखाद्या कॅफेमध्ये हेडफोन्स लावून, पण त्यात गाणी न लावता, दिवसभर स्वतःसाठी सिनेमाची पटकथा लिहिणं असे अनेक उपक्रम मी वेगवेगळ्या टप्प्यांवर केले. त्यातूनच गोष्टी घडल्या, कामं मिळाली, थोडंफार नाव मिळालं. ***तेव्हाचा डायरीतील दिवस हा, झोपेतून उठणं, मित्र भेटणं, दिवसभर काम आणि टिंगलटवाळ्या दोन्ही करणं आणि स्वप्नरंजन करत घरी जाणं असा असायचा.***

मुंबईला गेल्यानंतर सुखवस्तू मध्यमवर्गीय स्ट्रगल करताना, दिवसाला बारा ते चौदा तास लिहायची सवय लागली. एकाच वेळी दोन-दोन, तीन-तीन सिनेमांची कामं सुरु झाली. व्यसन करत नसल्यामुळे चहा आणि खाणं या दोनच गोष्टींची तल्लफ व्हायची, याच धुंदीत सात आठ सिनेमे, दोन नाटकं आणि जवळपास पंधरा एक सिनेमांची गाणी लिहिल्यानंतर मला विलक्षण पोकळ, बोजड आणि अस्वस्थ वाटू लागलं.

पस्तिशीचा टप्पा पार केल्यानंतर, आपल्या अनुभवातली अनेक पात्रं आणि कथा सांगितल्यानंतर, वाचन पूर्णपणे बोंबलल्यानंतर, शरीराचा ताबा सुटल्यानंतर, सोशल मीडियासारख्या जंजाळात पूर्णपणे अडकल्यानंतर, प्रस्थापित समजून लोकांना उपदेशाचे डोस पाजल्यानंतर, 'आता आपल्याला मराठीत काय मिळवायचं आहे?' अशा निरागस पण बेफिकीर थाटात वावरल्यानंतर मला स्वतःचा रोजचा दिवस जेव्हा पूर्णपणे शिळा वाटायला लागला, तेव्हाच कोविडसारखं महाभयंकर संकट दाराशी उभं राहिलं. मला माहीत नव्हतं मी कुठं कुठल्या कसोटीतून जाणार होतो.

एक दिवस सगळं ठप्प झालं. हातातोंडाशी आलेले प्रकल्प थांबले, काही सुरु होते ते लोकांच्या निर्णयाअभावी लांबले, बँकेत खडखडाट झाला, डोक्यात प्रचंड कोलाहल आणि मनात रोजची भीती. अशा काळात लिहायचं काय? लिहायचं कोणासाठी? या दोन्ही प्रश्नांनी मनात घर केलं होतं. लिहायला तर हवं होतं. कुठे लिहायचं?? फेसबुक विचारवंत होण्यात दडलेला धोका मी याआधी अनुभवला होता. तुमची कर्तृत्वहीनता झाकण्यासाठी आणि काही दिवसातच तुम्हाला तुम्ही कोणीतरी महत्त्वाचे आहात असं वाटण्यासाठी अतिशय फसवं माध्यम म्हणजे फेसबुक याची जाणीव झाली होती त्यामुळे त्या वाटेला जायचं नाही असं ठरवलं. ट्विटर हा तोवर अक्षरशः तोफगोळा झाला होता. एक दिवस तुम्ही झाडणारे असता आणि दुसऱ्या दिवशी तुम्हीच झेलणारे. त्यामुळे तिथेही माघार घेतली. नाही म्हणायला छोट्या छोट्या गोष्टींचे फोटो काढून इंस्टाग्रामवर टाकून मन रमवलं, पण स्वतःसाठी लिहिण्याची उर्मी उसळी मारून वर येत राहिली.

मग असा विचार केला की, आपण आपल्या या रुपाला भिडायला घाबरतो आहोत. कारण हे रूप प्रस्थापित आणि पोक्त आहे, आधीच्यासारखं प्रयत्नवादी आणि कोवळं नाही. आता आपल्याला मोबदला हवा. पैसा हवा, नाव हवं, किमान लाईक हवा, शेअर हवा, किंवा गेलाबाजार फॉलोअर हवा. तळापाशी गेल्यावर वाटलं आपली गोची यामुळे झालीय का, की आता आपल्याला इंप्रेस करण्यासाठी समोर कुणीच नाहीये? मग प्रामाणिक विचार सुरु झाला. आपल्या आत दडून राहिलेल्या माणसांचं, घटनांचं गोष्टींचं या कोलाहलात आपल्याला काही करता येईल का? त्यातून फायदा होईल का? माहीत नाही. ते कोणी पाहील किंवा वाचेल का? माहित नाही. त्याला कौतुक, मानसन्मान प्रेम मिळेल का? माहीत नाही. पण ते करून आपल्याला बरं वाटेल का? तर नक्कीच! इथून हा प्रवास सुरू झाला, माझ्या मनात खोलवर दडलेल्या खूप साऱ्या गोष्टींना मी बाहेर काढायला सुरुवात केली. वाचायला सुरुवात केली, पॉडकास्ट ऐकले, उत्तम कंटेंट पाहिला, वेगवेगळया माणसांचे जगण्याचे संघर्ष कानावरून गेले आणि जगण्याबद्दलची आस्था वाढली.

अर्धवट शिजलेल्या, दुर्लक्ष केलेल्या, कमर्शिअली काहीही होणार नाही म्हणून बाजूला ठेवलेल्या, अशा पाच गोष्टी मी या काळात लिहून पूर्ण केल्या, कुठल्याही मानधनाशिवाय, कुठल्याही कॉन्ट्रॅक्टशिवाय आणि कुठल्याही निर्मिती संस्थेशिवाय. (आधीपासून ज्यांचं काम सुरु होतं, त्या निर्मात्यांनी या काळात पैसे द्यायची माणुसकी दाखवली त्यामुळे घर चाललं!) फक्त स्वतःसाठी. फॉरेन्सिकसारख्या विषयात परदेशातल्या दोन विद्यापीठांचे ऑनलाईन कोर्सेस पूर्ण केले. लेखकांसाठी काहीतरी करायचं होतं म्हणून writer first हे युट्युब चॅनेल काढलं. स्वतःची एनर्जी आणि वेळ पुन्हा एकदा तयार करण्यात घालवायला लागलो. स्वतःला बांधायला घेतलं, यात कधी पडलो, कधी अडलो. दिवसाचा दगड पुढे सरकवण्याचा जोरदार झगडा चालूच होता कारण अनेक गोष्टी आणि माणसं जागची ढिम्म हलत

नव्हती. यातच कधी माणसं दुरावली, कधी दुखावली, पण मी प्रामाणिकपणे धडका मारत राहिलो. ***तेव्हाचा डायरीतील दिवस हा 'सकाळी लवकर उठणं, व्यायाम करणं, मोजक्या गोष्टी वापरून जेवण बनवणं, लिहिणं, वाचणं, इतरांची विचारपूस करणं आणि लेखकांसाठी सुरु केलेल्या युट्यब चॅनेलसाठी मुलाखती घेणं' असा होता.***

मग दोन वर्षांनी मळभ दूर झालं, या सगळ्या सिनेमांची जवळपास ३५ ते ४० वेळा विविध नट, नट्या, दिग्दर्शक, निर्माते यांच्याकडे वाचनं केली, असंख्य नकार आणि मोजके होकार मिळवले. त्याचे पुन्हा पुन्हा ड्राफ्ट्स काढले (अजूनही काढतो आहे.) आणि आज त्यातले बहुतांश प्रकल्प मार्गी लागतायत. लेख प्रकाशित होईपर्यंत त्यांच्या घोषणाही झाल्या असतील. २०२० ला प्रचंड भीतीपासून सुरू झालेला हा प्रवास २०२२ मध्ये या सुंदर वळणावर आलाय तो केवळ डायरीतल्या एक एक दिवसामुळेच. आता या दिवसाकडे वळूया.

***सध्याचा एक दिवस वेगवेगळ्या घटनांनी, माणसांनी आणि शक्यतांनी भरलेला आहे.***

***सध्याचा एक दिवस उत्सुक आणि कोवळा आहे.***

***सध्याचा एक दिवस निर्मितीच्या भट्टीत वितळून लख्ख उजळणारा आहे.***

***सध्याचा एक दिवस हा पॅशनेट आणि कंपॅशनेट दोन्ही आहे.***

**सत्र सकाळचं: ६.३० ते १०**

दिवसाची सुरुवात लिखाणानं आणि दिवसाचा शेवट वाचनानं करायचा हे मनाशी ठरवलं आणि हळूहळू बदल घडायला लागला. आता सगळ्यात आधी जे मनात येईल ते लिहितो, मोकळा होतो आणि दिवस सुरु करतो. सकाळी जग उठायच्याआधी, दिवसातलं सगळ्यात महत्त्वाचं काम करायचं हा गेल्या काही महिन्यात मी पाडलेला पायंडा मला सुखद धक्के देऊन जातोय. व्यायाम, बायकोसोबत वेळ घालवणं, चांगला अर्धा तास पेपर वाचून त्यातील आपल्या विषयाशी निगडित गोष्टी टिपून ठेवणं, आवडीचा पदार्थ बनवून खाणं या सगळ्या गोष्टी सकाळच्या पहिल्या सत्रात केल्यानं दिवसाला आकार यायला लागलाय.

हे महत्वाचं काम म्हणजे नवीन कथा, पटकथा, संवाद, पात्र, घटना यांची निर्मिती करणं. आपल्या विषयाशी अनुरूप संगीत मागे लावून त्या गोष्टीत, तिथल्या माणसांच्या मनात शिरण्याचा प्रयत्न करणं, त्यांच्याकडे पाहणं, त्यांचं निरीक्षण करणं, त्यांच्यासोबत घडणाऱ्या घटनांचा क्रम आणि त्यातून त्यांचं बदलत जाणं याचा विचार करणं आणि हे सगळं कागदावर उतरवणं. या मध्ये ही 'पॅशन आणि कंपॅशन' दोन्ही कामाला येते. ती तुम्हाला माणूस म्हणून टवटवीत ठेवते. पटकथा लिहून झाली असेल तर संवादावर काम करणं, प्रत्येक पात्राचं मूल्य, भाषा, लकब, मत या सगळ्याचा अंदाज घेत घेत ते लिहिणं हेसुद्धा तितकंच फॅसिनेटिंग काम. या सकाळच्या सत्रात गोष्ट फार वेगाने पुढे सरकते.

**सत्र मधलं: ११ ते ४**

११ वाजता एकदा मोबाईल सुरु झाला की ३० सेकंदांचं एक रीलसुद्धा तुम्हाला उचलून तुमच्या विश्वातनं बाहेर फेकून देतं. त्यामुळे कामाचे फोन, मेसेजेस, मेल्स यांना रिप्लाय करून, मिटिंग असेल तर मिटिंगसाठी निघायचं. वाचन असेल तर (दोन अडीच तास सलग सिनेमा वाचण्यासाठी पुष्कळ मेहनत लागते.) तशी तयारी करून निघतो. सध्या एक हिंदी सिनेमाची रायटर्स रूम चालू आहे. त्यासाठी रोजच्या रोज आपल्या मुद्द्यांची टिपणं तयार करून ठेवतो. ('रायटर्स रूम' म्हणजे एका प्रकल्पासाठी लेखकांच्या समूहाने एकत्र येऊन त्यावर चर्चा आणि लिखाण करण्याची जागा! ह्यात अनुभव, संस्कृती, विचार यांची सुंदर देवाणघेवाण होते आणि प्रचंड शिकायला मिळतं!) इथे जायचं आणि हिरीरीने सहभाग घ्यायचा. गोष्ट आणि ती सांगू पाहणाऱ्या अनेक गोष्टी यांचं अव्याहत विणकाम इथे सुरु असतं. इथं मन पूर्णपणे मोकळं करून गेलं की भरभरून परत येता येतं.

**सत्र तिसरं: ६ ते इन्फिनिटी.**

संध्याकाळी घरी आल्यांनतर किंवा त्याच कामावरून म्युझिक सिटिंगला गेल्यांनतर गाण्यांचं काम सुरु होतं. नवीन गाण्याची ब्रीफ मिटिंग (जी कधीच ब्रीफ होत नाही.) नवीन चालीची आणि त्याच्यासोबत शब्दांची निर्मिती, मग त्या गाण्याचा पूर्ण ग्राफ तयार करणं, त्याला एखादी थीम किंवा सेंट्रल आयडिया देता येईल का याचा विचार करणं आणि मोबाईलवर गाणी लिहिणं. (मला हे अतिशय डिस्ट्रेसिंग वाटतं! गाडी नसताना अनेक गाणी मी रिक्षात बसून मोबाईलवर लिहिलेली आहेत. नुकतंच ज्या गाण्यासाठी हिंदी फिल्मफेअरचं नामांकन मिळालं ते हसून दिलरुबाचं 'फिसल जा तू' सुद्धा!) हे सेशन कधी १०, कधी ११ पर्यंत लांबतं, त्यातून कधी हाताला काही लागतं कधी नाही. पण उमेद कमी

होत नाही. एखाद्या दिवसाला गाण्याचा चेहरा मिळतो, एखाद्या दिवसाला हातपाय. ते मनातल्या मनात जोडत रहायचं.

**सत्र शेवटचं:**

घरी येऊन झोपायच्या आधी उद्याची तयारी करतो, एक पान का होईना वाचतो आणि पाठ टेकतो. दिवसभरात आलेले विचार, भेटलेली पात्रं, लिहिलेली वाक्यं, सुचलेल्या ओळी, आलेले अनुभव यांचा आढावा घेतो आणि दुसऱ्या दिवसाला नव्यानं सामोरा जातो.

या सगळ्या सरळसोट वाटणाऱ्या दिवसात स्वतः मुंबईत गाडी चालवणं, पार्किंग मिळवणं, मीटिंग्जना वेळेवर पोहचणं, जिभेवर ताबा ठेवणं, वेळी-अवेळी आलेल्या कॉल्स आणि मेसेजेसना चिडचिड न करता रिप्लाय करणं, नकार पचवणं, कामात बदल हवे असतील तर तातडीनं करून देणं, कधी तक्रारपेटी, तर कधी मार्गर्शन केंद्र बनणं, ऑनलाईन चाललेल्या गोष्टींचा स्वतःवर आणि कामावर कमीत कमी परिणाम होऊ देणं आणि सगळ्यात महत्त्वाचं स्वतःच्या वाढीसाठी वेळ देणं हे सगळं एकत्र चालू असतं.

---

***अनेक 'रफ' पानांवर खाडाखोड, गिचमिड होते तेव्हा कुठं जाऊन एक पान 'फेअर' होतं. अशी अनेक वर्षांची, अनेक दिवसांची 'रफ' पानं आजच्या दिवसाच्या 'फेअर' पानाच्या मागे दडलेली आहेत, या लेखाच्या निमित्ताने ती चाळता आली, त्यावर मायेचा हात फिरवता आला, हे काय कमी आहे?***

# जग कवितांचे

- तुषार दामगुडे

शर्वरी कुलकर्णी ही एक गुणी अभिनेत्री मन उडू उडू झालं या मालिकेतून घराघरात पोचली आहे. या झगमगाटात तिने तिचा स्वतःचा असा एक कवितेचा कोपरा जपून ठेवला आहे. कवितेतून व्यक्त होणे हे सगळ्यांनाच जमतं असं नाही. शर्वरी स्वतः कविता करते आणि त्यातून तिची वेगळी अशी ओळख तिने जोपासली आहे.
चित्रवेधच्या दिवाळी अंकासाठी तिने अरुणा ढेरे यांची **अनय** ही कविता सादर केली आहे. राधेच्या नवऱ्याचा इतका प्रगल्भ विचार साहित्यात खूप क्वचित केला गेला. त्याचबरोबर शर्वरी ने स्वतःची एक कविताही सादर केली आहे. मुक्तछंदातील या दोन्ही कविता निश्चितच मराठीतील सौंदर्यस्थळं टिपतात.

बालसाहित्य, कथा, कविता, कादंबरी, ललित, संशोधनपर लेख अशा सर्वच साहित्यप्रकारात आपल्या शैलीनं वाचकांवर भुरळ घालणाऱ्या कवयित्री, लेखिका म्हणजे अरुणाताई ढेरे.

पौराणिक स्त्रीपात्रांची वर्तमानाशी सांगड घालून त्यातील प्रेम, माया, व्यथा सारं स्त्री-तत्व सुस्पष्ट करणं यात त्यांचा विशेष हातखंडा. त्यांच्या या नावलौकिकास रुपेरी किनार देणारी कविता म्हणजे 'अनय...'

एका पुरुषाच्या अव्यक्त प्रेमाची ही कविता!

'कृष्णमय राधा' ज्यानं कल्पनेत नाही तर स्वतः अनुभवली असा हा दुसरा पुरुष! होय! तोच 'दुसरा' होता. राधेशी लग्न होऊनही जो तिला कायम परका राहिला! पुराणकथांनीही ज्याचं पुरुषत्व नाकारलं असा तो 'अनय' अरुणाताईंच्या या कवितेत मात्र वेगळा वाटला.

प्रेमाचं प्रतीक म्हणून राधाकृष्णाच्या अनेक कथा आपण वाचल्या आहेत, पण त्याच 'प्रेमा'चा हा तिसरा कोन 'अनय' एवढ्या अलवारपणे काव्यवाचन स्वरूपात पहिल्यांदाच आपल्या समोर आला आहे.

वास्तवात पाहू गेल्यास कुठल्याही सर्वसामान्य पुरुषाला हा 'अनय' कितपत झेपेल? इथे मी फक्त पुरुष म्हणतोय कारण स्त्रीप्रेमाला जन्मतःच मातृत्व लाभलेलं असतं.

ते ममत्व तिला नवऱ्याच्या साऱ्या दोषांना स्वीकारायला भाग पाडतं. आणाभाका शपथा देऊन, कधी रूसून-रडून ती त्याला स्वतःसारखं करू पाहते. या प्रयत्नात ती आयुष्य वेचते. प्रेमात स्त्रीची 'राधा' अगदी सहज होते, पण कुणा पुरुषाला 'राधे' ला स्वीकारताना आपण कितीदा पाहिलं आहे ?

अरुणा ढेरे यांची ही कविता ऐकताना वाटतं... अनय एकटाच होता, राधेवर राधेसारखं प्रेम करणारा!

अरुणाताईंच्या या कवितेचं सादरीकरण केलं आहे सुप्रसिद्ध मराठी तारका शर्वरी कुलकर्णी यांनी. अनयच्या अव्यक्त प्रेमानंतर शर्वरीने स्वतःचीही एक सुंदर कविता आपल्यासाठी सादर केली आहे.

कधी शब्दांत गुंतलेल्या, कधी शब्द सारून गालांवर ओघळणाऱ्या, कधी मौनात व्यक्त होऊ पाहणाऱ्या प्रेमाची कविता... अव्यक्त प्रेमाची अजून एक गाथा तुम्हाला नक्की आवडेल.

**या दोन्ही कविता खालील QR code वर बघता येतील.**

# कुंकू ते मुंबई डायरीज्: मृण्मयीची वाटचाल

- राज जाधव



**मृण्मयी, तुझं बालपण पुण्यात गेलं. आम्हाला तुझ्याकडून ऐकायला आवडेल की पुण्यातून सुरू झालेला हा प्रवास अभिनेत्री होण्यापर्यंत कसा येऊन थांबला?**

माझं बालपण पुण्यात गेलं. बेसिकली पुण्यातून सुरू झालेला हा प्रवास होता. माझी गाडी कायमच रुळावर होती. मला लहानपणापासूनच माहीत होतं किंवा असं म्हणू की माझ्यापेक्षा माझ्या आईला जास्त माहीत होतं की माझी आवड कोणत्या क्षेत्रामध्ये आहे. त्यामुळे त्यांनी मी सहा वर्षांची असल्यापासून मला कथक क्लास लावला. माझ्या शाळेमध्ये मी सहावीत असल्यापासून सतार वाजवत होते, वक्तृत्व स्पर्धा, नाट्य स्पर्धा या सगळ्यांमध्ये पहिला नंबर होता माझा. त्या दरम्यान शाळेमध्ये असताना शाळेतल्या

बाईंनी खूप सांभाळून घेतलं. कॉलेजमध्ये गेल्यानंतर कॉलेजनंदेखील खूप सहकार्य केलं. आत्तापर्यंत मी जेवढ्या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला, त्यात मला अभिनय आणि दिग्दर्शनाचं प्रथम पारितोषिक मिळालं, अकरावीपासून ते टी.वाय.पर्यंत. त्यामुळे माझं कॉलेज संपलं आणि त्यानंतर तातडीनं माझ्या कामाला सुरुवात झाली, ‘अग्निहोत्र’ सिरियल मला मिळाली. अग्निहोत्र चालू झाली आणि लगेचच मला कुंकुसाठी विचारण्यात आलं. But I was always on track, जे करायचं होतं, ते आणि तसंच झालं.

**अभिनेत्री, नृत्यांगना, निवेदिका, दिग्दर्शिका, गायन या सर्वांची सांगड कशी घालतेस आणि यात सर्वात आवडती गोष्ट कोणती आहे ?**

मला असं वाटतं की **गीतम् वाद्यम् नृत्यम् त्रयम् संगीतमुच्यते** ही संगीताची व्याख्या आहे. या तिन्ही गोष्टी जेव्हा एकत्र येतात तेव्हा संगीताची, नादाची, चांगल्या गोष्टीची निर्मिती होते. अभिनय, नृत्य, निवेदिका या गोष्टी होऊन गेल्या, हे स्वप्न मी कधी पाहिलं नव्हतं. मला दिग्दर्शिका व्हायचं होतं. मला सगळ्यात जास्त आवडणारी गोष्ट ती आहे आणि दिग्दर्शन करताना नृत्य, नाट्य आणि संगीत ह्या तिन्हीचंही ज्ञान असल्याचा खूप फायदा होतो. मी माझ्या दोन्ही सिनेमांचं लेखनसुद्धा केलं आहे. कलेशी निगडित वेगवेगळ्या पैलूंना मला स्वतःला एक्सप्लोर करायला आवडतं, पण दिग्दर्शन हे माझ्या सगळ्यात जवळचं आहे.

**'मुंबई डायरीज' सारख्या वेब सिरीजचा भाग असणं आणि निखिल अडवाणीसारख्या दिग्दर्शकासोबत काम करणं हे खरं तर कुठल्याही कलाकारासाठी स्वप्नवतच असेल. त्यात एकंदर सिरीज हा प्रकार नेहमीच्या पठडीहून वेगळा, हाताळणी चित्रपटाहून वेगळी. या सगळ्यात तुझा अनुभव काय?**

‘मुंबई डायरी’ सिझन वनचा अनुभव सॉलिड होता. सिझन टू लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पण एवढ्या मोठ्या वेब सिरीजचा भाग मी सहज झाले. मला फोन आला, मी ऑडिशन दिली आणि त्यांचा कॉल आला की **'Congratulations, you are selected'**. आणि पुढची गोष्ट मला आठवते की मी निखिलच्या समोर बसले होते. तो म्हणाला, मी तुझी ऑडिशन पाहिली आणि नंतर मी दुसऱ्या कोणाकडे गेलोच नाही. निखिल अत्यंत मनस्वी असा दिग्दर्शक आहे आणि सेटवरती त्या त्या पद्धतीचं वातावरण तयार करणं त्याला आवडतं. मुंबई डायरीज ही सिरीज टेररिस्ट अटॅक संदर्भात होती. त्यातला हॉस्पिटलचा सेटच इतका खरा होता की तिकडे गेल्यानंतर आपण वेगळे कोणी आहोत, असं वाटलंच नाही. त्या सिच्युएशनमध्ये आम्हाला ॲक्टिंग करायला लागली नाही. एखाद्या माणसाला त्या वास्तवामध्ये नेऊन सोडलं तर तो कसा रि क्ट होईल असा त्या सिरीजचा अनुभव होता. नक्कीच हिंदी भाषेमध्ये एक खूप चांगली संधी मला मिळाली, एवढं मात्र नक्की.

**कुंकूची 'जानकी' ते मुंबई डायरीजची 'डॉक्टर सुजाता' चा प्रवास बघता आम्हाला प्रेक्षक म्हणून तुझा उत्तरोत्तर चढता आलेख दिसतो, तुला स्वतःला तू अभिनेत्री म्हणून किती आणि कशी बदललेली दिसतेस?**

थँक्यू, 'डॉक्टर सुजाता' म्हटल्याबद्दल, 'ट्रेनी सुजाता' नाही. अभिनेत्री म्हणून मी माझं कुंकूमधलं काम आत्ता पाहिलं तर मला एकदम धडकी भरते, की मी हे कसं केलं असेल आणि आत्ता कुंकू आलं असतं तर कसं काम केलं असतं? कारण प्रत्येक वर्षी तुम्ही माणूस म्हणूनसुद्धा बदलत जाता. तुम्ही वर्ल्ड कंटेंट पाहता, निरीक्षणामुळे ऑटोमॅटिकली सबकॉंशियसली शिकलं जाते. त्याच्यामुळे तुमचा अभिनय बदलत जातो, अर्थातच ते प्रत्येकाच्या बाबतीत वेगवेगळ्या प्रमाणामध्ये घडतं. माझी नेहमीच अशी इच्छा होती की, आपण अभिनय करतो आहे असं नाही वाटलं पाहिजे. तो कायम एक प्रयत्न असतो माझा. अभिनेत्री म्हणून माझ्यात चांगला बदल झाला आहे असं मला वाटतं. कारण जेव्हा मी माझे जुने सिनेमे पाहते, तेव्हा डबिंगमध्येसुद्धा मला फरक जाणवतो. 'मोकळा श्वास' किंवा त्यावेळेस आलेले माझे सिनेमे त्यातला माझा आवाज आणि आजचा आवाज यातसुद्धा जमीन अस्मानाचा फरक आहे. सो डेफिनेटली मी आजही शिकते आहे.

**'मुंबई डायरीज'सोबतच 'सोप्पं नसतं काही', या हटके मराठी सिरीजमध्येही तू काम केलंस? मराठी कंटेंटसाठीही वेब सिरीज हा प्लॅटफॉर्म खुला झालाय. त्याबद्दल तुला काय वाटतं?**

खूपच चांगली गोष्ट आहे. एखादा विषय किंवा एखादी गोष्ट डेली सोपमध्ये खूप ताणून सांगावी लागते, कारण तो फॉरमॅटच तसा आहे, तर कधीकधी सिनेमांमध्ये तीन तासात एखादी गोष्ट मावत नाही. पण काही गोष्टी ज्यांचा आवाका सिरीयलइतका मोठा नसतो आणि सिनेमाइतका छोटापण नसतो, अशा गोष्टीसाठी हे एक सुंदर माध्यम आहे. त्याच्यामध्ये तुम्हाला पाहिजे तसा तुम्ही विषय खुलवू शकता, त्यामुळे मला फारच आनंद आहे. मला वेब सिरीज हे माध्यम भयंकर आवडलेलं आहे त्यामुळे मला त्यात अजून एक्सप्लोर करायला आवडेल.

**दिग्पाल लांजेकरच्या 'शिवराज अष्टक' या एका महत्त्वाकांक्षी फ्रँचायजीचा तू भाग आहेस. 'फर्जंद', 'फत्तेशिकस्त' आणि 'शेर शिवराज' या चित्रपटात तू 'केसर' ही व्यक्तिरेखा साकारली आहेस. या ऐतिहासिक चित्रपटासाठी काय तयारी केलीस? हा एकंदर अनुभव कसा होता?**

एकंदर सिनेमांचा अनुभव अप्रतिम आहे. दिग्पाल माझा अत्यंत जवळचा मित्र आहे. 'फर्जंद', 'फत्तेशिकस्त' आणि 'शेर शिवराज' या चित्रपटांसाठी साहसदृष्यं आणि भाषा यावर खूप मेहनत घेतली गेलेली आहे. दिग्पाल एक उत्तम आणि अत्यंत आग्रही असा दिग्दर्शक आहे. चित्रपटातला तो टोन बरोबर येणं किंवा त्या शब्दातली ती अक्षरं बरोबर वजनानं पडणं, या बाबतीत त्याचा भयंकर अभ्यास आहे. त्याच्या कलाकारांकडूनदेखील त्याला तेच काम हवं असतं, जे त्याच्या डोक्यामध्ये असतं. तर एकंदर खूपच सुंदर अनुभव होता. अनेक आव्हानं आतापर्यंत टीमनं आणि सगळ्यात जास्त दिग्पालनं पेललेली आहेत. पण

त्यानं हे आठ सिनेमांचं शिवधनुष्य उचललेलं आहे आणि ते आतापर्यंत यशस्वीपणे पेललं आहे. त्यामुळे मला त्याचा खूप अभिमान आहे आणि ही जी एक ऐतिहासिक फ्रँचायजी आहे तिच्याकडे लोक फक्त एक चित्रपट मालिका म्हणून नाही तर एक माहितीपट म्हणून पाहतात. शाळांमध्ये शिकवले जात आहेत हे सिनेमे. दिग्पालचा इतिहासाचा अभ्यास फार अचूक आहे, कुठलाही चुकीचा संदर्भ सिनेमांमध्ये आतापर्यंत आलेला नाही. त्यामुळे पाठ्यपुस्तकांसारखे सिनेमे शाळांनासुद्धा दाखवले जातात तर अशा गोष्टींचा भाग असणं, कायमच अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट असते.

**मालिका, सिनेमे आणि अँकरिंगसोबतच तू 'मन फकिरा' आणि 'मनाचे श्लोक' मध्ये दिग्दर्शनाची धुरादेखील लीलया पेलली आहेस? हे आधीपासून ठरवलं होतंस की अचानक ठरलं? त्या अनुभवाबद्दल काही सांगशील...**

'मनाचे श्लोक' आणि 'मन फकीरा' हे सिनेमे लिहिलेसुद्धा मी आहेत, म्हणजे कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन मी केलं आहे आणि त्यात मी कामही केलं आहे. तर मला खूप आधीपासूनच डिरेक्शन करायचं होतं. मी फक्त योग्य वेळेची वाट बघत होते. इंडस्ट्रीत आल्या आल्या कोणीच मला तेवढ्या सिरीयसली घेतलं नसतं. 'मन फकिरा' हा आठ वर्षांपूर्वी लिहिलेला सिनेमा आहे आणि तो चार वर्षांपूर्वी फायनली शूट केला आणि रिलीज केला. ती पॅशन आहे, ते कसं काय केलं, मला नाही माहीत. ते माझ्याकडून सहज होऊन गेलं आणि मी खूपच जास्त एन्जॉय केलं एवढं मात्र नक्की.

**स्वतः दिग्दर्शनाची जबाबदारी हाताळल्यानंतर एक अभिनेत्री म्हणून, तुझ्या काम करण्याच्या पद्धतीत किंवा तुझ्या दृष्टिकोनात काही बदल झाला का?**

माझ्या काम करण्यात अभिनेत्री म्हणून काही फरक नाही पडला. दृष्टीकोनात काही बदल झालाय का? तर हो, डेफिनेटली, शॉट जास्त छान कळायला लागले आहेत. जेव्हा तुम्ही कॅमेऱ्याच्या पाठीमागे उभे राहून एखादी फ्रेम चेक करता, तेव्हा तुम्हाला तो अनुभव खूपच सुंदर असतो, की काय लेन्स लागली आहे, त्याच्यानंतर साधारणपणे काय दिसत असेल, दिग्दर्शकानं कट म्हटल्यानंतर तत्क्षणी बेरिंग सोडायचा नसतो, कधी कधी पुढचे तीन-चार सेकंद म्हणजे ऍक्च्युली तुमचा डीओपी शॉट कट करेपर्यंत जे काही फ्रॅक्शन ऑफ सेकंद असतात त्यातपण कधी कधी अप्रतिम शॉट असू शकतात. अशा बारीक बारीक आणि टेक्निकल बऱ्याच गोष्टी डायरेक्ट करताना शिकायला मिळाल्या आणि त्याचा टेक्निकली खूप फायदा होतो. बाकी कामाचं म्हणाल तर प्रत्येक सिनेमा हा त्या दिग्दर्शकाच्या माध्यमातून असतो, म्हणजे त्या दिग्दर्शकाला जसं काम पाहिजे तसंच काम मला करायचं असतं. त्यामुळे जेव्हा मी काम करते तेव्हा मी डिरेक्टर म्हणून डोकं कधीच लावत नाही, तेव्हा मी त्या दिग्दर्शकाची क्टर असते, एवढंच.

**गौतमी आणि तुझं खास बॉडिंग तर आहेच त्याबद्दल नक्कीच ऐकायचं आहे, पण सोशल मीडियावर तुमची जी नोकझोक चालू असते, ती फार भन्नाट असते. घरीदेखील तुम्ही अशाच आहात का?**

घरी आम्ही अशाच आहोत म्हणून सोशल मीडियावरतीसुद्धा आम्ही, गौतमी आणि मी तशाच आहोत. तर आम्ही हे जे काही व्हिडिओ तयार केले होते, ते याच्यासाठी केलेले नव्हते, कधीतरी भांडण करताना असे आईनं, गौतमीनं रेकॉर्ड केलेले व्हिडिओज होते, ते आम्ही टाकायला लागलो आणि गौतमी म्हणजे, जसं जुन्या गोष्टीत असायचं ना, 'राक्षसाचा प्राण पोपटात वगैरे असतो', तसा माझा जीव माझ्या धाकट्या बहिणीमध्ये, गौतमीमध्ये अडकलेला  आहे. ती म्हणजे माझं अख्खं आयुष्य आहे.

**तू पक्की पुणेकर आणि स्वप्निल मुंबईकर, त्यात तुमचं अरेंज मॅरेज, असं असूनही तुम्ही 'मेड फॉर इच अदर' वाटता. याचं गुपित काय?**

गुपित नाही माहीत, आम्ही डे वन ला **मॅट्रिमनी साईटच्या** माध्यमातून भेटलो.  त्याच्याआधी आम्ही हार्डली एक दोनदा व्हॉट्स पवर बोललो असू, पण आम्ही भेटलो आणि त्याच्या नंतरच्या दहाव्या मिनिटाला आम्हाला कळलं की आम्ही लग्न करणार आहोत, इतके ते जुळून गेले. त्यामुळे गुपित नाही माहीत, पण क्लिक झालो आम्ही एकमेकांना, असं वाटतं मला.

**लग्नापूर्वीची मृण्मयी आणि लग्नानंतरची मृण्मयी यात तुला स्वतःला काय फरक जाणवतो?**

लग्नानंतरची मृण्मयी खूप जास्त कॉन्फिडंट आहे, लग्नापूर्वी मी खूप भित्री आणि इन्सिक्योर होते, पण लग्नानंतर मी मेंटली खुश आहे, शिवाय एक कॉन्फिडन्स आहे सोबत असण्याचा. आता आम्ही एकमेकांबरोबर असतो आणि लग्नानंतर ज्या आयुष्याचं मी स्वप्न पाहिलं ते जगतेय. आम्ही आता महाबळेश्वरला आमच्या शेतावरती राहतोय. आम्ही आता आमचा 'नील अँड मोमो' नावाचा ब्रँड सुरू केला आहे, पूर्णतः ऑरगॅनिक, नॅचरल. हे आम्ही एकत्र पाहिलेलं स्वप्न आहे. आय थिंक लग्न हे असतं. मी जेव्हा स्वप्निलला भेटले होते तेव्हा मी त्याला विचारलं नव्हतं की तुझ्याकडे किती गाड्या आहेत की बंगला आहे. आमचं अरेंज मॅरेज होतं पण आमच्यात पैशांचा पहिल्यांदा विषय निघाला तो आमचं लग्न ठरल्यानंतरच्या आठ महिन्यांनी. तेव्हा आम्ही बोललो की आपण किती कमावतो, कसं आयुष्य फायनान्शियली प्लॅनिंग करायचं वगैरे. नाहीतर आम्ही एकमेकांत काय पाहतोय, एकमेकांना कशा पद्धतीनं पूर्ण करतोय, हेच महत्त्वाचं होतं. माझा दुसरा सिनेमा, मनाचे श्लोक याच विषयावर आहे. लग्नानंतर मी खूप जास्त कॉन्फिडंट झाले आहे. आम्ही कुठल्याही आव्हानासाठी तयार आहोत.

**अग्निहोत्र आणि कुंकूनं तुला खूप प्रसिद्धी मिळवून दिली. पुन्हा डेली सोपकडे वळावं असं वाटत नाही का?**

डेली सोपकडे वळावंसं वाटत नाही मला. तीन-तीन वर्षांची कमिटमेंट असते, ती मला थोडीशी त्रासदायक वाटते. म्हणजे आता इतकी वेगवेगळ्या पद्धतीची कामं चालू आहेत. काही लिमिटेड सिरीज असेल तर मला करायला आवडेल, पण आता मला एकच रोल तीन वर्ष, दोन-तीन वर्ष करायला कदाचित एवढी मजा नाही येणार. माझी ती मजा करून झाली 'कुंकू' आणि 'अग्निहोत्र'मध्ये, म्हणून डेली सोप कडे परत वळावं असं मला वाटत नाही. पण स्मॉल स्क्रीन मला कायमच खुणावत आलेला आहे. त्यात एखादी फिल्म किंवा काही वेगळं असेल तर नक्कीच करायला आवडेल.

**पुढील वाटचालीत आम्हाला तुझा कोणता वेगळा पैलू पहायला मिळेल? अजून काही वेगळं करण्याचा मानस आहे का?**

पुढच्या वाटचालीमध्ये वेगळा पैलू म्हणजे, आम्ही आमचा स्वतःचा ब्रँड सुरू केलाय, मी आणि स्वप्निलनं एकत्र येऊन 'नील अँड मोमो' नावाचा. स्वप्निलचा 'नील' आणि मला 'मोमो' म्हणतात. आधी सांगितल्याप्रमाणे आम्ही दोघे महाबळेश्वरला आमच्या शेतात शिफ्ट झालो.  या सगळ्या गोष्टींपासून आपण गेल्या 20 वर्षांमध्ये दूर आलेलो आहोत. स्वप्निल शिकवतोय लोकांना, मलासुद्धा पुढे जाऊन शिकवायचं आहे. अनेक वेगवेगळे पैलू आम्ही स्वतःमधले एक्सप्लोर करत आहोत आणि लोकांना सुद्धा शिकवण्याचा प्रयत्न करत आहोत. असे वेगवेगळे पैलू तुम्हाला नक्की पाहायला मिळतील.

**तुझ्या फॅन्सना, तुला हिंदी चित्रपटात पहायची संधी कधी मिळेल? कोणत्या दिग्दर्शकासोबत काम करायला आवडेल?**

मला इम्तियाज अली खूप आवडतो, त्याच्याबरोबर काम करायला आवडेल. मला अनुराग बासूबरोबरसुद्धा मनापासून काम करायला आवडेल. हे माझे आवडते दिग्दर्शक आहेत. मला गौरी शिंदेसोबत काम करायला आवडेल. ती माझी अत्यंत लाडकी दिग्दर्शिका आहे.

**छोट्या आणि मोठ्या पडद्यावर सध्या कोणते नवीन प्रोजेक्ट्स येत आहेत?**

वेब सिरीज परत लगेच पहायला मिळेल. चित्रपटांचं मी सांगेन लवकरच. छोट्या पडद्यावरती इतक्यात नाही पण मोठ्या पडद्यावरती माझा 'मनाचे श्लोक' हा सिनेमा येणार आहे, जो मी लिहिला आहे, दिग्दर्शित केला आहे आणि त्याच्यात मी कामही करते आहे. त्याची मात्र नक्की वाट बघा, कारण पुन्हा काहीतरी एक वेगळा भन्नाट विषय आणि मांडणी बघायला मिळेल आणि लोकांना तो आवडेल अशी मला आशा आहे.

# बनारस ते मुंबई व्हाया दिल्ली

# - जीवनाचा अर्थ शोधणारा प्रवास

- चित्तरंजन गिरी

(शब्दांकन : मृणाल काशिकर खडक्कर)



**चित्तरंजन गिरी**

आपण जन्माला येतो तेव्हाच एक हेतू आपल्यासाठी लिहिला गेलेला असतो. आपला जीवनप्रवास तो हेतू, तो जीवनाचा अर्थ शोधण्यासाठीच असतो आणि त्या प्रवासात आपण केवळ तो अर्थ शोधत नसतो, तर आपण स्वतःलाही गवसत जातो. माझा प्रवासही असाच... हा केवळ बनारस/वाराणसी ते मुंबई प्रवास नाही, तर तो जीवनाचा अर्थ शोधणारा प्रवास आहे... आणि आताशा तो अर्थ काहीसा गवसत आहे, माझा मी मला स्वतःला गवसत आहे माझ्या अभिनयातून, माझ्या कामातून!

माझा जन्म १० जून १९६७ सालचा, बनारस म्हणजेच वाराणसी, उत्तर प्रदेशातला. वाराणसी तसं सांस्कृतिक वारसा असलेलं शहर, पण मी १६ वर्षांचा होईपर्यंत माझा नाटक, सिनेमाशी काही विशेष संबंध आला नव्हता. त्या वयात इतर मुलांप्रमाणेच भावी आयुष्याचा विचार करायचो आणि तेव्हा आपण पुढे काय करायचं, इतरांसारखं त्याच मळल्या वाटेनं जायचं, का वेगळं काही करायचं हेच सतत डोक्यात असायचं. पण, माझं अंतर्मन मला सांगत होतं, की तुला काहीतरी वेगळं करायचं आहे आणि साधारण त्याच दरम्यान, एक नाटक बघण्याचा योग आला. त्या नाटकाचा माझ्यावर इतका प्रभाव पडला, की मला अभिनय करावा असं वाटू लागलं. त्या नंतरची दोन वर्ष, म्हणजे अठराव्या वर्षापर्यंत, मी मला जे जे करावं असं वाटलं ते ते करत होतो. अठराव्या वर्षी खऱ्या अर्थानं माझा नाटक आणि अभिनयाचा संघर्ष सुरु झाला. मी नाटक करू लागलो. मग त्यातील माझा अभिनय, त्यासाठी मिळणारं कौतुक, बक्षिसं असं करता करता मला उमजलं की मला पुढे हेच करायचं आहे. माझं प्राक्तन हेच आहे आणि जो जगण्याचा उद्देश मी शोधतो आहे तो हाच आहे, ही जाणीव खूप लवकरच झाल्यामुळे माझ्या आत्मशोधाच्या प्रवासालाही लवकर सुरुवात झाली... बनारसमधून!

**एन.एस.डी.!**

नाटक करता करता स्वतःचा शोध घेत मी बनारसहून मुंबईला आलो. ती तीन वर्ष, म्हणजे १९८३ ते १९८७ च्या काळात मी दोन्हीकडे सातत्यानं रंगभूमीवर काम करत होतो. आपल्याला काय आवडतं आहे आणि काय करायचं आहे याचा तर शोध लागला होता. पण, हेच क्षेत्र व्यवसाय म्हणून निवडू शकू का, यात आपण काय करू शकू, कसं करू शकू हे सगळे विचार मनात सुरूच होते. त्याच वेळी मला दिल्लीतील नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (एन. एस. डी.) बद्दल माहिती मिळाली. त्यावेळी मी मुंबई IFTA बरोबर काम करत होतो. एन. एस. डी. मध्ये ॲडमिशनसाठी मी तिथूनच अर्ज भरला. पण, दुर्दैवानं तो प्रयत्न अयशस्वी झाला. मला ॲडमिशन नाही मिळाली. अर्थातच मी खूप नाराज झालो. मुंबईहून बनारसला परत गेलो आणि पुन्हा नाटक करू लागलो. नंतर पुन्हा अर्ज भरला आणि यावेळी सुदैवानं मला एन. एस. डी.मध्ये ॲडमिशन मिळाली. आता माझा शोधाचा प्रवास दिल्लीकडे वळला.

एन. एस. डी. मधली शिक्षणाची तीन वर्षं, म्हणजे १९९०-१९९३ हा माझ्या आयुष्यातील अत्यंत प्रभावी काळ होता. तिथे मी आजवर उत्स्फूर्तपणे रंगमंचावर जे करत होतो त्या अभिनयाला दिग्गज गुरूंच्या मार्गदर्शनाखाली तंत्रामध्ये, क्राफ्टमध्ये कसं बसवावं, कसं बांधावं हे शिकलो. माझ्या आत्मशोधाला इथे शास्त्रशुद्ध पाया मिळाला. तरीही माझ्या मनात कधीही असं आलं नाही की मला जागतिक पातळीवर चित्रपटात काम करायचं आहे, चित्रपट दिग्दर्शन करायचं आहे किंवा फक्त पैशांसाठी काम करायचं आहे. यापैकी काही मनात आलं नाही, तरी मला अभिनयात सफलता मिळावी असं वाटायचं. माझ्या कामामुळे

मला ओळख मिळावी, लोकांनी माझ्या भूमिकांसाठी मला ओळखावं असं जरूर वाटायचं. अभिनयासाठीच आपला जन्म झाला असावा हे मला जाणवलं होतं.

मी कर्मवादी व्यक्ती आहे; त्यामुळे हे कर्म सातत्यानं करायचं आहे असं माझं अंतर्मन मला सांगायचं. १९९०-१९९३ या काळात एन. एस. डी.मध्ये शिक्षण घेतल्यानंतर पुढील तीन वर्ष मी एन. एस. डी.च्या रेपर्टरी कंपनीमध्ये काम करत होतो. ही नोकरी माझ्या आवडणाऱ्या कामाचीच होती, मी तिथे एक प्रोफेशनल ॲक्टर म्हणून नोकरी करत होतो. तिथे खूप नाटकांमध्ये खूप विविध प्रकारच्या भूमिका माझ्या वाट्याला आल्या. मी अनुभवसमृद्ध होत होतो. रेपर्टरीमध्ये काम करताना माझ्या कामाची ठरलेली वेळ सोडून थोडा मोकळा वेळ मिळायचा आणि तोसुद्धा सत्कारणी लावावा असं वाटत होतं. म्हणून मी काही नाटकांचं दिग्दर्शन करायला सुरुवात केली. दिग्दर्शन करताना माझ्यातल्या अभिनेत्याचा जो शोध होता तो आपोआपच नाटकाच्या इतर अंगांनीसुद्धा सुरु झाला जसं की नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगभूषा, वेशभूषा इ. तसं बनारसमध्येही मी थोडं दिग्दर्शन करत होतो. पण, त्याला खऱ्या अर्थानं इथे सुरुवात झाली, खतपाणी मिळालं. त्यावेळी मी *प्रतिबिंब, परिणीती,* ही नाटकं रेपर्टरीमध्ये दिग्दर्शित केली. ती खूप चांगली झाली, त्यांना प्रतिसादही चांगला मिळाला. त्यामुळे, कंपनीतर्फे त्याचे पब्लिक शोदेखील लावले गेले. एकूणच माझ्यासाठी तो काळ छान होता.

**बनारस- दिल्ली- मुंबई...**

पुढे १९९६ ला मी ती नोकरी सोडून मुंबईला आलो आणि माझा मुंबईतील संघर्ष सुरु झाला. मी इथे किरकोळ कामं करत होतो. पण, काही वर्षांनी आधीच्या दोन नाटकांच्या अनुभवामुळे मला रेपर्टरीतून बोलावणं आलं. त्यांनी मला एक नाटक दिग्दर्शित करण्यासाठी बोलावलं होतं. मी पुन्हा दिल्लीला गेलो आणि जयशंकर प्रसाद यांचं '*गुंडा*' हे नाटक रेपर्टरीमधीलच कलाकारांना घेऊन दिग्दर्शित केलं.

१९९६ ते २००२ या काळात मी काही सिरियल्समध्ये काम केलं. पण, त्या सिरियल्समधील भूमिकांमधून म्हणावं तसं काही माझ्या हाती लागत नव्हतं; समाधान किंवा माझ्या शोधाच्या प्रवासाचा काही टप्पादेखील! रंगमंचावर मी नेहमी प्रमुख भूमिका केल्या होत्या. आता सिरियल्स आणि चित्रपटांमधूनही त्या तशा मिळाव्यात अशी माझी अपेक्षा होती. पण, अद्याप मला हवी तशी मुख्य भूमिका वाट्याला येत नव्हती. आपल्याला हवं ते मिळेपर्यंतचा काळ संघर्षाचा असतो आणि तो तसा माझाही होताच. मुंबईत टिकून रहाण्यासाठी, आपलं घर चालवण्यासाठी, आपलं बस्तान बसवण्यासाठी मला काम करत राहणं आवश्यकच होतं आणि म्हणूनच सिरियल्स, चित्रपटांमध्ये ज्या काही लहान-मोठ्या भूमिका मिळाल्या त्या मी करत राहिलो. ६/७ वर्षं अशीच गेली. मग मात्र मी सिरियल्स करणं थांबवलं. कारण, मला आपण स्वतःला अभिनेता म्हणून वाया घालवू नये असं प्रामाणिकपणे वाटत होतं. १६व्या वर्षापासून

माझा जो स्वतःला शोधण्याचा प्रवास सुरु झाला होता, तो शोध काही पूर्णत्वाला जात नव्हता. मग मी स्वतःला थांबवलं आणि माझ्यातील अभिनेत्याच्या शोधावर लक्ष पुन्हा केंद्रित केलं. एखादं पात्र मी कशा पद्धतीने करू, अभिनयाचा वेगळ्या पद्धतीने विचार कसा करू याकडे मला लक्ष द्यायचं होतं, किंबहुना मला तेच करायचं होतं. मुंबईत फक्त थिएटर करणं फार अवघड जात होतं. सिरियल्समध्ये, चित्रपटात छोट्या मोठ्या भूमिका करताना माझ्यातल्या अभिनेत्याच्या शोधाला उत्तरं मिळत नसत आणि त्यामुळे मी अस्वस्थ होत होतो.

...आणि त्याचवेळी योगायोगानं मी टीचिंगमध्ये आलो. तेही असं टीचिंग की अभिनयक्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या, अभिनय शिकू इच्छिणाऱ्यांना अभिनयाचं प्रशिक्षण देण्याचं काम! ही नोकरी मला माझ्या संघर्षाच्या काळात उपयोगी पडली. एक तर ते माझं आवडीचं काम होतं आणि मी त्यामुळे माझं घरही चालवू शकत होतो. शिवाय, या दरम्यान मी मला हव्या तशा मोठ्या भूमिकेची वाटही बघू शकत होतो. त्या दरम्यान मला विशाल भारद्वाजचा '*मकडी*' हा चित्रपट मिळाला. मकडीचा विषय आणि माझी भूमिका हा अत्यंत उत्तम अनुभव होता. मग हे दोन्ही असं समांतर सुरु राहिलं. टीचिंग आणि चित्रपटात छोट्यामोठ्या भूमिका करत राहिलो. यात मध्ये-मध्ये मोठ्या गॅप होत होत्या. मी तरीही पूर्ण समाधानी नव्हतो. विशेष चांगली भूमिका हाती लागत नव्हती किंवा चांगली भूमिका करण्याची माझी भूक शमत नव्हती.

याच काळात, म्हणजे २००७ मध्ये मला एक चित्रपट मिळाला. '*१९७१*'! सागर पिक्चरचं बॅनर आणि दिग्दर्शक अमृत सागर असलेला हा चित्रपट भारत-पाक युद्धातील कैद्याच्या कथेवर आधारित होता. या सिनेमात मला पहिल्यांदा मोठी भूमिका मिळाली. सहा मुख्य पात्रं असलेल्या या कथेतील एक पात्र मी असणार होतो. तो चित्रपट करताना आम्ही खूप मेहनत घेतली होती. तो आलाही, पण काही कारणानं चालला नाही. पण, आश्चर्याची बाब अशी की तेव्हा थिएटरला न चाललेला चित्रपट लॉकडाऊनमध्ये मात्र करोडो प्रेक्षकांनी पाहिला. त्या चित्रपटाचं खूप कौतुक झालं. त्यातील माझी भूमिका, माझा अभिनय याचंदेखील कौतुक झालं. मला त्यावेळी एक गोष्ट प्रकर्षानं जाणवली, की आपण जर आपलं काम मन लावून केलं असेल, तर त्या मेहनतीची चांगली फळं कधी ना कधी मिळतातच!

त्यानंतर लक्ष्मीकांत शेतगावकर या माझ्या गोव्यात राहणाऱ्या मित्रानं मला घेऊन एक कोंकणी चित्रपट काढायचा ठरवला. '*पलतडचो मनीस*' [*द मॅन बियॉंड द ब्रिज*]. हा चित्रपट एनएफडीसीचा होता. मला पहिल्यांदाच चित्रपटात प्रमुख भूमिका करायला मिळाली. ती एका फॉरेस्ट ऑफिसरची भूमिका होती, एकटा जंगलात राहणाऱ्या माणसाची गोष्ट. कोंकणी भाषेतला हा चित्रपट वेगवेगळ्या चित्रपट महोत्सवात निवडला गेला. त्याचं खूप कौतुक झालं, अनेक पुरस्कार मिळाले.

**'लेथ जोशी'...**

या चित्रपटानं मला माझ्या आत्मशोधाच्या प्रवासात एका विशेष टप्प्यावर आणून ठेवलं होतं. आता माझा वयाच्या १६ व्या वर्षापासून सुरु झालेला प्रवास एका वेगळ्या पायरीवर जाऊन पोहोचला होता, बदलला होता. '१९७१' चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार, '*पलतडचो मनीस*'ला टोरांटो फेस्टिवलमध्ये क्रिटिक ॲवोर्ड, नॅशनल ॲवॉर्डही मिळालं. मला मिळालेल्या प्रत्येक कामामागे असलेला माझा संघर्षही वेगळा होता. त्याची फळंही वेगळ्या प्रकारे मिळत होती. चित्रपट मिळणं, त्यात आपल्याला हवी तशी भूमिका मिळणं, त्यासाठी तयारी करणं, स्वतःतील अभिनेत्याचा शोध घेणं इ. हे सातत्याने सुरु होतं. माझं टीचिंगही सुरु होतंच. 'द मॅन बियॉंड द ब्रिज'ची चर्चा विविध फिल्म फेस्टिवल्स आणि सिनेवर्तुळात सुरूच होती. मला आताही हिंदी चित्रपटात लहान सहान भूमिका मिळत होत्या, पण मी त्या नाकारत होतो. एकदा प्रमुख भूमिका मिळाल्यावर असं वाटत होतं, की प्रमुख भूमिका मिळते आहे तर लहानसहान भूमिका का स्वीकारायच्या? मी मला प्रमुख भूमिका मिळेल याची वाट बघत होतो.

एव्हाना माझ्या लहानपणापासूनच्या शोधाचं प्रतिबिंब आता माझ्या भूमिकांमध्येही दिसायला लागलं होतं . '*पलतडचो मनीस*' नंतर एक तरुण दिग्दर्शक माझ्यासाठी नवीन चित्रपट, नवीन भूमिका घेऊन आला. त्याचं नाव होतं मंगेश जोशी आणि चित्रपटाचं नाव होतं, ***'लेथ जोशी'***! त्या आधीच्या त्याच्या एका नावाच्या चित्रपटात माझी एक छोटीशी भूमिका होती. पण, *'लेथ जोशी'* मधली भूमिका ही मुख्य भूमिका असलेला माझा पहिला मराठी चित्रपट असणार होता. मला खूप आनंद झाला. आतापर्यंत जे प्रयोग मी करत आलो, जे विचार मी करत आलो, त्या सगळ्यांचा एकजिनसी वापर मला 'लेथ जोशी' हे पात्र करताना करता आला. आम्ही या चित्रपटातील आपापल्या भूमिकांवर खूप मेहनत घेतली. लेथ जोशी हे पात्र साकारण्यासाठी मी एक महिना रिहर्सल करत होतो. मंगेश जोशी या दिग्दर्शकानं मला या चित्रपटासाठी एक वेगळा दृष्टीकोन दिला, ॲक्टरचा एक वेगळा क्राफ्ट मला मिळाला. इंटेन्सिटी, स्पॉन्टेनिटी, लाइवलीनेस या अभिनयाच्या ज्या बाजू आहेत, त्या वेगळ्या पद्धतीनं मला इथे शोधता आल्या. नाटकात मी या सगळ्या गोष्टी वेगळ्या पद्धतीनं एन. एस. डी. पासूनच वापरत आलो होतो. पण, आता चित्रपटाच्या भाषेतही मला त्या सहजतेनं वापरता यायला लागल्या. एन. एस. डी.मध्ये निर्मल शर्मा यांच्या कादंबरीवर आधारित *'रोमियो जूलियट और अंधेरा'* हे नाटक मी केलं होतं आणि त्यात मी वास्तववादी अभिनयाच्या अगदी जवळ जाण्याचा प्रयत्न केला होता. काही प्रमाणात मला त्यात यशही मिळालं होतं. मुंबईत मात्र सिरियल्स इ. करताना मी वास्तववादी अभिनयाकडे न जाता काहीसा नाटकीय अभिनयाकडे जाऊ लागलो होतो. कारण, तो सहजपणा मी माध्यमांतर झाल्यानं वापरूच शकत नव्हतो. वास्तववादी अभिनय पद्धतीचा *'लेथ जोशी'* मध्ये मला परत विचार करता आला आणि आधी म्हटल्याप्रमाणे नाटकीय अभिनय मी करू लागलो होतो. मात्र विक्रम भटचा '*कसूर*' नावाचा चित्रपट

करताना मला दोन वेगळ्या प्रकारच्या अभिनय पद्धतींचा साक्षात्कार झाला. मला एक नवीन अनुभव मिळाला आणि माध्यम आणि अभिनय पद्धती यांचा शोध परत सुरु झाला.

'*१९७१*, अनुराग कश्यपचा '*गुलाल*', *'पलतडचो मनीस'*, *'लेथ जोशी'* या कामांनी मला अभिनेता म्हणून खूप बदललं. माझ्यात खूप फरक पडला. *'लेथ जोशी'* करताना मला दिग्दर्शकांकडून ज्या पद्धतीचा अप्रोच मिळाला त्यामुळे त्या भूमिकेत मी एक सशक्तपणा, गहिरेपणा आणू शकलो. या चित्रपटानंतर एक दोन वर्षांची गॅप झालीच. अर्थात 'लेथ जोशी' पाहून मला काही भूमिका मिळाल्या. त्यातील काही अगदी लेथ जोशी सारख्याच होत्या आणि त्या मी अगदी जाणीवपूर्वक नाकारल्या. मला साच्यात अडकायचं नव्हतं. 'लेथ जोशी'मुळे मला एक *'ब्लॅक लेबल'* नावाची शॉर्ट फिल्म मिळाली. या शॉर्ट फिल्ममध्ये मला प्रमुख आणि वेगळं पात्र साकारायला मिळत होतं. म्हणून मी ती भूमिका स्वीकारली. या भूमिकेसाठी माझं कौतुक झालं आणि काही पुरस्कारही मिळाले.

त्यानंतर एक अगदी वेगळ्या पद्धतीचा '*बारदोई*' नावाचा चित्रपट मला मिळाला. हा एक वेगळा प्रयोग आहे, वेगळी मांडणी आहे. कोल्हापूरचा करण चव्हाण नावाचा तरुण दिग्दर्शक आहे. त्यानं या चित्रपटात मला पुन्हा प्रमुख भूमिका दिली. मला अशा भूमिकेचा शोध होता आणि त्यामुळे, मी नवीन चित्रपटासाठी नवीन लोकांसोबत, नवीन अप्रोचनं पात्राच्या शोधात नव्या उत्साहानं कामाला लागलो. आता हा चित्रपट पूर्ण झाला आहे आणि तो ही वेगवेगळ्या चित्रपट महोत्सवात जाताना तुम्हाला दिसेल. त्याला प्रेक्षकांचा, समीक्षकांचा कसा प्रतिसाद मिळतो, काय मत मिळतंय याबाबत मला नक्कीच उत्सुकता आहे.

**'लेथ जोशी' नंतर...**

'*लेथ जोशी*' अगोदर जेव्हा माझ्या हातात काहीच ठोस काम नव्हतं, तेव्हा तो मोकळा वेळ मी लिखाणासाठी कामी आणला. मी लिहीत होतो. त्या दरम्यान मी तीन-चार स्क्रिप्ट्स् लिहिली आणि त्याचे चित्रपट होऊ शकतील का याच्यावर विचार सुरु केला, त्यासाठी खटपट सुरु केली. माझा माझ्यातील अभिनेत्याला शोधण्याचा प्रवास आता अधिक पुढच्या टप्प्यावर पोहोचला होता. आता मला चित्रपट तयार करायचा होता. मी अभिनेता होतो, नाट्यदिग्दर्शकही होतो, पण चित्रपट दिग्दर्शक आणि '***अवकाश***' पर्यंत कसा पोहोचलो ते सांगतो.

मी मधल्या संघर्षाच्या काळात अनेक हिंदी चित्रपटांमध्ये छोट्या मोठ्या भूमिका केल्या. यामध्ये कमर्शियल आणि वेगळे प्रोजेक्ट्स दोन्हीचा समावेश होता; जसे की ***बाबा***, ***सुपर ३०*** , ***भोंसले***, ***गुलाल***, इ. आणि त्या-त्या दिग्दर्शकांकडून नवनवीन गोष्टी शिकतच होतो. २०१२ नंतर माझ्या मनात एक विचार घोळत होता की अभिनयाची, फिल्म मेकिंगची मी माझी अशी एक वेगळी परिभाषा बनवू शकेन का?

माझी अशी काही पद्धत शोधू शकेन का? आतापर्यंत मी अभिनय केलेले चित्रपट फेस्टिवल्समध्ये बरेचदा गेले आहेत. मीदेखील सातत्यानं अनेक फेस्टिवल्सना आवर्जून जात राहिलो, चित्रपट बघत राहिलो, त्यातून शिकत आलो. जागतिक पातळीवरचे वेगवेगळे सिनेमे मी अजूनही सातत्याने बघत असतो. माझ्यासाठी तो एक अभ्यास आहे आणि तो सुरूच आहे. त्यातून जे ज्ञान मिळालं आणि मिळत आहे, ते आधी माझ्याकडे नव्हतं. या फिल्म फेस्टिवल्समुळे मी माझ्यामध्ये, माझ्या अभिनयामध्ये एक सामान्य माणूस म्हणून एक सहजता, साधेपणा शोधू लागलो.

याच दरम्यान हर्ष चौहानने माझ्याबरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली. हर्षला मी आधीपासून ओळखत होतो. यापूर्वी मी केलेल्या एका चित्रपटाचा तो सहायक दिग्दर्शक होता. आता तो  दिग्दर्शक म्हणून पुढचं पाउल टाकत होता. मी त्याच्याशी चर्चा करताना मी लिहिलेल्या स्क्रिप्ट्सपैकी एक त्याला दिली आणि त्यावर आमचा '*कर्मण्ये*' हा चित्रपट तयार झाला. या चित्रपटाची कथा बनारसच्या पार्श्वभूमीवर घडते. आध्यात्मिकता, नैतिकता आणि माणसाला कोणत्या तरी गोष्टीमुळे येणारा अपराधीपणा असा या चित्रपटाचा विषय आहे. '*कर्मण्ये*' प्रदर्शनासाठी आता तयार आहे आणि वेगवेगळ्या फिल्म फेस्टिवल्समध्ये पाठवला जातो आहे. या चित्रपटालाही कसा प्रतिसाद मिळतो याबाबत मी उत्सुक आहे.

**मी आणि चित्रपटनिर्मिती- '*अवकाश*'**

'*कर्मण्ये*'मध्ये माझी प्रमुख भूमिका आहे. या चित्रपटाच्या संपूर्ण प्रोसेसमध्ये मला असं लक्षात आलं की, व्यवस्थित विचार केला तर आणि चांगली टीम तुमच्याबरोबर असेल तर कमी बजेटमध्येही एक चांगला चित्रपट तयार केला जाऊ शकतो!

मला जाणवलं की मी हे तर सगळं नाटकाबाबत करतच आलोय. तिथे मी आजवर सगळी डिपार्टमेंट सांभाळत आलो आहे. तर मग चित्रपटाचीही सघन आणि उत्तम निर्मिती आपण का करून बघू नये? हा प्रयोग आपण का करू नये? मला लक्षात आलं की, डिजिटल माध्यमात मी चित्रपट करू शकतो. मोठया बजेटचा चित्रपट करताना अडचणी आल्यास अवघड होईल. त्यापेक्षा आपण आपल्या बजेटमध्ये बसेल, आपल्या आवाक्यात असेल असा चित्रपट केला तर? हे विचारांचं मोहोळ अनेक दिवस डोक्यात घोंगावत होतं. मी माझ्या पत्नीशी, अश्विनीशी चर्चा केली आणि आम्ही चित्रपट निर्मितीचा निर्णय घेतला. माझ्याकडे दोन स्क्रिप्टस् तयारच होती. माझ्या डोक्यात दोन बहिणींची कथा घोळू लागली. त्यात अभिनेत्री म्हणून एक अश्विनी गिरी, म्हणजे माझी पत्नी डोळ्यासमोर होती आणि दुसऱ्या भूमिकेसाठी पुण्याच्या लक्ष्मी बिरासदारचं नाव डोक्यात होतं. तिने रंगभूमीवर खूप काम केलेलं होतं आणि तिलाही माझ्याबरोबर काम करण्याची इच्छा होती. सुरुवातीला कमी पात्रं, कमी लोकेशन्स अशी कथाच डोक्यात होती. विचार करता करता संहिता आकार घेऊ लागली. स्त्रिया त्यांच्या आयुष्यात वेगवेगळ्या भूमिका पार पाडत असतात.

प्रत्येक घटनेकडे त्या कसं बघतात, कशा व्यक्त होतात यासाठी आम्ही खूप चर्चात्मक अभ्यास केला. याबरोबरच माझ्या परिचयातील, घरातील स्त्रिया एखाद्या घटनेबाबत कशा व्यक्त होत याचं निरीक्षणही खूप कामी आलं.

त्याबरोबरच मी कशाप्रकारे स्क्रिप्ट लिहितोय, अभिनेत्यांबरोबर कसं काम करू शकेन याची डोक्यात एक वेगळीच प्रोसेस तयार करायला लागलो. ती तयार झाली आणि घडली '***अवकाश***'!

**टीम 'अवकाश'**



**अश्विनी गिरी**

कथानक लिहिताना मला अश्विनीशी केलेल्या चर्चा खूप उपयोगी पडल्या. पण, हे सगळं कागदावर संहितारुपात उतरवण्यासाठी माझा वाराणसीचा विद्यार्थी हर्ष गुप्ता मदतीला आला. हर्षनं त्यावेळी एन.एस.डी.मधून सिनेमॅटोग्राफीचा कोर्स केलेला होता आणि त्यानं माझ्याबरोबर काम करण्याची तयारी दाखवली. त्याला सोबत घेऊन स्क्रिप्ट लिहिल्यानं त्याच वेळी शूट कसं करायचं याचीही चर्चा आणि दिशा ठरत होती. त्याचा नंतर खूप उपयोग झाला. दोन्ही अभिनेत्रींना संहिता लिखाण दाखवत मी नवीन काही शोधत होतो. संहिता होता होता आता तिसऱ्या भूमिकेसाठी नचिकेत देवस्थळीची निवड केली. चित्रपटासाठी तीन गुणी कलाकार मिळाले.

संहिता करताना मी ती अनेक अनुभवी आणि दिग्गजांना दाखवत होतो. सुमित्राताई भावे, आमचे गुरु समर नखाते यांना संहिता ऐकवली. त्यांनी काही मोलाच्या सूचना केल्या. त्यांच्या सूचना समजून घेत होतो आणि उत्तम संहिता होण्यासाठीची ही धडपड होती.

आता संवाद लिहायचे होते. मी पडलो हिंदी भाषिक. मराठी संवाद, ते देखील स्त्री पात्रांचे, त्यांच्याच तोंडून, ह्रदयातून आल्यासारखे असे मराठी संवाद मला जमतील का? अशी शंका मला होती. म्हणूनच मराठी संवाद लिहिण्यासाठी मला स्त्री संवाद 'लेखिका' हवी होती आणि ती मधुरा डाळींबकरच्या रूपानं आम्हाला मिळाली. मधुरानं अतिशय संयतपणे आम्हाला जसे अपेक्षित होते तसे संवाद लिहून दिले. तिचा हा संवाद लेखिका म्हणून पहिलाच चित्रपट आहे आणि तिनं उत्तम काम केलं आहे.

चित्रपटक्षेत्रातील अनेक दिग्गजांनी मला चित्रपटाबाबत मार्गदर्शन केलं. संहिता फायनल झाल्यानंतर आम्ही टीमकरता एक कार्यशाळा घेतली. त्यात संहिता वाचन, त्यात सुधारणा, भूमिका, इ. यावर चर्चा व्हायची. FTII मधून एडिटिंगचं प्रशिक्षण घेतलेला अनिकेत काळे यानं या चित्रपटाच्या एडिटिंगची जबाबदारी घेतली. त्यानंच चित्रपटाला योग्य लोकेशनदेखील शोधलं. अशी आमची सर्व उत्साही तरुण मंडळींची छोटीशी टीम खूप चांगला आउटपुट मिळण्याकरता कामाला लागली.

चित्रपटाचं शूटिंग ज्या लोकेशनला झालं, ते घर आहे मेदिनीताई अभ्यंकर यांचं! अनिकेतमुळेच आम्हाला हे सुयोग्य लोकेशन मिळालं. मेदिनी अभ्यंकर यांचे तर मानावे तितके आभार कमीच आहेत. केवळ लोकेशन दिलं म्हणून नाही, तर संपूर्ण शूटिंगच्या दरम्यान आपुलकीनं आणि प्रेमानं आम्हा सर्वांना आपल्या हातचं जेवू घातलं. त्यांच्या या अपार मायेसाठी मी खरच ऋणी आहे.



**अवकाश मधील एक क्षण**

कलादिग्दर्शन आशिष हेमंत देशपांडे यांनी सांभाळलं, मदन वाघमारे यांनी प्रोडक्शनची संपूर्ण जबाबदारी घेतली आणि निश्चय अटल यानं उर्वरित सगळ्या जबाबदाऱ्या उचलल्या. ही सर्व तरुण समविचारी मंडळी आणि ज्यांना थोडं वेगळं काम करायचं आहे, अशी टीम एकत्र आल्यानं आमचं बजेट कमी असूनही *अवकाश* तयार झाला. *अवकाश*ची निर्मिती हा खूप समृद्ध अनुभव होता.

हा चित्रपट तयार करताना मला हे पक्कं माहीत होतं, की मी उत्तम दिग्दर्शक आहे हे सिद्ध करण्यासाठी मी हा चित्रपट करत नाहीये. म्हणूनच त्यात उणीव राहू नये यासाठी मी निःसंकोचपणे आमच्या क्षेत्रातील अनुभवी ज्येष्ठ मंडळींचं मार्गदर्शन आणि सूचना विचारात घेतल्या. ज्येष्ठ लेखक दिग्दर्शक सुनील सुखटणकर, वरूण नार्वेकर यांचा परीसस्पर्श या चित्रपटाला झाला आहे. संवाद, दोन सीन्समधील कंटिन्यूटी यासाठी वरूण नार्वेकर यांनी काही सूचना केल्या. त्यांच्या सूचनांनुसार बदल करत हा चित्रपट अधिक चांगला झाला. सुनील सुखटणकर यांना मी विनंती केली की त्यांनी या चित्रपटासाठी दोन गाणी लिहावीत. त्यांनी ती मान्य केली आणि अतिशय समर्पक अशी दोन गाणी या चित्रपटामध्ये आल्यानं चित्रपट अजूनच सुंदर झाला. मी त्यांचा मनापासून ऋणी आहे. या गीतांना सुंदर असा स्वरसाज दिला सारंग कुलकर्णी यांनी. सारंग कुलकर्णी यांनी अवकाशचे पार्श्वसंगीतही केले आहे. एक गीत गायलं आहे अंजली मराठे यांनी आणि दुसरं गीत गायलं आहे विजय बर्वे यांनी.

पुण्याच्या तुषार ताजणे यांनी चित्रपटाची सुंदर पोस्टर्स करून दिली आणि फिल्म फेस्टिवल्सना फिल्म पाठवता यावी यासाठी आनंद चाबुकस्वार यांनी इंग्रजी सबटायटल्स करून दिली. असे अनेक आपापल्या क्षेत्रात निपुण असलेल्या लोकांचे हात चित्रपटाला लागल्यानं चित्रपट थोडा अधिक चांगल्या पातळीवर पोहोचला. एन.एस.डी.च्या फेस्टिवल मध्ये २०२० साली 'अवकाश' पोहोचला आणि तिथून अनेक देशांतील फेस्टिवल्समधेही '*अवकाश*' पोहोचला, त्याचं कौतुक झालं, पुरस्कारही मिळाले.

'*अवकाश*'च्या निमित्तानं मला अजून काही लोकांचे आभार मानायचे आहेत, ज्यांच्याशिवाय हा आत्मशोधाचा प्रवास होऊच शकला नसता. बनारसमध्ये ज्यांच्यासोबत नाटक शिकलो, करत राहिलो ती नागरी नाटक मंडली, गोकुळ आर्ट्स आणि वाराणसीचेच सगळे रंगकर्मी आहेतच; पण विशेष करून भोलेन्द्र शर्मा, सुधांशू मोहन, पियुष गौड, अंबरीश सक्सेना, यांच्यामुळे मला खूप काही शिकता आलं, करता आलं... आज या निमित्तानं त्यांचे मनापासून आभार मानतो.

एन.एस.डी. मधले शिक्षक, mentors - त्यापैकी देवेंद्रराज अंकुर, कीर्ती जैन, बॅरी जॉन, प्रसन्नजी, राम गोपाल बजाज, अर्जुन रैना, जैन कौसल, अनामिका हक्सर यांच्याकडून मी खूप शिकलो आहे. अनवधानानं कोणाचं नाव घ्यायचं राहून गेलं असेल, तर क्षमस्व.

या सर्वांमुळे मी जो शोध घेत आलो त्यात गोष्टी सुकर होत गेल्या आणि हा प्रवास खूप सुखकर होत गेला.




**'अवकाश' नंतर...**

*'अवकाश'* एक समृद्ध करणारा अनुभव आहे. त्यातून खूप काही शिकलो आहे आणि यापुढील चित्रपटनिर्मितीत या सर्व अनुभवांचा नक्कीच उपयोग होईल. मला मी किती चांगला दिग्दर्शक आहे हे दाखवायचं नसून, आतापर्यंत जे क्रिएटीव, शिक्षित अभिनेता, वीस पंचवीस वर्षांचा या क्षेत्रातला अनुभव किती प्रभावीपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचवू शकतोय ते माझ्यासाठी महत्त्वाचं आहे. या निर्मितीतून पैसा कमावण्याचा हेतू नव्हता, नसेल. पण, मला यातून एक वेगळी ओळख निर्माण करायची आहे. वयाच्या सोळाव्या वर्षापासून स्वतःचा जो शोधाचा प्रवास आहे तो प्रेक्षकांपर्यंत पोहोचावा, त्यांना तो आवडावा, त्यांनी त्याचं कौतुक करावं, माझे चित्रपट बघणाऱ्यांच्या आयुष्यात काही भर पडावी असं मला वाटतं. आणि जर प्रेक्षकांना माझ्या कामात काही त्रुटी जाणवली तर ती जाणून घेऊन मी पुढच्या चित्रपटाच्या प्रोसेसमध्ये त्या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करेन. सातत्यानं सुधारणा करत राहण्याची ही प्रोसेस अशीच सतत चालू रहावी अशी माझी इच्छा आहे. मला हे चांगलंच माहीत आहे की, फिल्म मेकिंग अवघड आहे, खूप खर्चिक आहे, त्यात पैसा जास्त द्यावा लागतो. तरी जे फायनल प्रोडक्ट तयार झाल्याचा जो आनंद असतो, तो शब्दातीत असतो.

'अवकाश' हा आमचा पहिला प्रयत्न होता. सुदैवानं त्याच्या निर्मितीचा अनुभव सुखद होता, कारण आम्हाला एक उत्तम टीम मिळाली. जगभरातील आठ-नऊ फेस्टिवल्समध्ये त्याची निवड झाली, पुरस्कारही मिळाले. माझ्या व्यक्तिगत आयुष्यात मी जे जगतो, बघतो, त्यावर एक अभिनेता म्हणून विचार करतो ते माझ्या कामामध्ये प्रतिबिंबित होतं. चित्रपट दिग्दर्शित करताना माझा दृष्टीकोन एक दिग्दर्शक म्हणून कमी, पण अभिनेत्याच्या नजरेतून, चष्म्यातून जास्त ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. मला तो दृष्टीकोन प्रेक्षकांच्या समोर मांडून त्यांच्याशी संवाद साधायचा आहे. माझा हा प्रयत्न कायमच असेल.

अवकाशच्या पुढील प्रवास कसा असेल, माझा हा शोधाचा प्रवास मला काय अनुभव देईल मला माहीत नाही. पण, आता नवीन सिनेमाची मोर्चेबांधणी सुरु झाली आहे. माझा हा आत्मशोधाचा प्रवास मला काय अनुभव देतो हे बघण्यासाठी मी उत्सुक आहे.

शुभं भवतु.


# Meet Our Team



*Amol Udgirkar*



*Neelesh Vilekar*



*Sucheta Phule*



*Shellee*



*Kalpesh Gosavi*



*Raj Jadhav*



*Tushar Damgude*



*Sumeet Gurav*



*Mrinal Kashikar Khadakkar*



*Shahuraj Kshirsagar*